सुचक :- श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदक :- श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

<u>सुधारणा प्रस्ताव</u>

दि. २६.४.२००२ रोजीच्या महासभेच्या कार्यसूचीवर विषय क्र.१ ''प्रभाग समित्त्यांची स्थापना करणे बाबत'' असा आहे. त्याअर्थी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ (अ) प्रमाणे शहरातील लोकसंख्येच्या आधारे प्रभाग समित्त्यांची स्थापना करणे कामी प्रशासनातर्फे पूढील प्रभागांचा समावेश असलेल्या ४ प्रभाग समित्त्यांची पूर्नः स्थापना करणेस प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | प्रभाग समिती कार्यालय | प्रभाग क्रमांक | एकूण प्रभाग |
|---|---|---|---|
| १ | गोल मैदान | १ ,२ ,३ ,४ ,५ ,२० ,२१ | ७ |
| २ | यात्री निवास | ६ ,७ ,८ ,२२ ,२३ ,२५ | ६ |
| ३ | व्हि.टी.सी. मैदान | १५ ,१६ ,१७ ,१८ ,१९ ,२४ | ६ |
| ४ | पाणी पुरवठा | ९ ,१० ,११ ,१२ ,१३ ,१४ | ६ |

प्रशासनाचा प्रस्ताव कलम २९ (अ) च्या तरतुदी प्रमाणे प्रस्तावित आहे असे वाटत नाही म्हणून त्यामध्ये सुधारणा करणे करिता पुढील प्रभागांचा समावेश असलेल्या ४ प्रभाग समित्त्यांची पुर्नः स्थापना करणेस सुधारित प्रस्ताव मान्यतेसाठी प्रस्तुत आहे.

| अ. क्र. | प्रभाग समिती कार्यालय | प्रभाग क्रमांक | एकूण प्रभाग |
|---|---|---|---|
| १ | गोल मैदान | १ ,२ ,३ ,४ ,५ ,२० ,२१ | ७ |
| २ | यात्री निवास | ६ ,७ ,८ ,२२ ,२३ ,२४ ,२५ | ७ |
| ३ | व्हि.टी.सी. मैदान | ९ ,१४ ,१५ ,१७ ,१८ ,१९ | ६ |
| ४ | पाणी पुरवठा | १० ,११ ,१२ ,१३ ,१६ | ५ |

--२--

<u>महासभा ठराव क्र. ४ अ</u> <u>दि.२६.४.२००२.</u>

हि महासभा वरील सुधारणा प्रस्तावास मान्यता देत नाही.

<u>बहुमताने मंजुर</u>

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषय:- मागील सभेच्या ठराव क्र. ६ अन्वये माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समितीवर श्रीमती. मिनू दासानी यांची नेमणुक झाल्यानंतर त्यांनी राजीनामा दिला असुन त्यांच्या ऐवजी इतर कोणत्त्याही सदस्यांची नेमणूक करणे बाबत.

प्रस्तावना:-

दि. २६.४.२००१ च्या विशेष महासभेतील ठराव क्र. ६व्दारे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये ८ विशेष समित्त्यांची नेमणुक करण्यात आली होती. प्रत्त्येक समितीत ९ पालिका सदस्यांचा समावेश आहे. त्यामधील पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समितीच्या ९ सदस्यांपैकी श्रीमती. मिनु दासानी या सदस्यांनी दि. ३.५.२००१ रोजी या समितीतून राजीनामा दिला आहे. त्यामुळे त्या समितीत एका सदस्याचे पद रिकामे झाले आहे.

त्याअर्थी श्रीमती मिनु दासानी ह्या पालिका सदस्याऐवजी नवीन सदस्य पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समितीत नेमणुक करणेस या महासभेपुढे प्रस्तावित.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ९ दिनांक:-२४/५/२००१.

सुचकाचे नाव :-श्रीमती. ज्योती कालानी

अनुमोदकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

हि महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता श्री. महेंद्र मुलचंदानी यांना माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समितीवर श्रीमती. मिनु दासानी यांच्या जागी नेमणूक करित आहे.

तसेच पूढील सभेकडून कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता वरील ठरावा अंर्तगतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकांची सही/-

अनुमोदकांची सही/-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- श्री. जेठानंद शर्मा व श्री. शंकर मालवणकर या महापालिकेच्या कर्मचा-यांविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे तरतुदी अनुसार खटला भरणेस मंजूरी देणे बाबत.

प्रस्तावनाः-

श्री. अशोक छाब्रिया रा. उल्हासनगर-३ यांच्या मालकीची जागा बॅरेक नंबर ९९८ रूम नंबर ५ शिट नंबर २७ ही जागा श्री. दिनेश मोरंदमल जवरानी उल्हासनगर १ बिल्डर यानात्याने विकसित केलेली आहे.

दिनांक २६.६.२००१ रोजी बांधकामाच्या ठिकाणी सकाळी ११.३० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेतील अतिक्रमण विभागातील काम करणारे बीट इन्सपेक्टर श्री. जेठानंद शर्मा व श्री. शंकर मालवणकर यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करणारे श्री. दिनेश जव्हरानी यांचा भाऊ श्री. नरेश जवरानी यांना विचारले की सदर विकसित केलेले बांधकाम हे २ ते ३ फुटांनी जास्त आहे. करीता ज्यादा बांधकाम केले म्हणुन पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करू असे श्री. जेठानंद शर्मा यांनी संबधितास सांगितले तसेच सदरचे बांधकाम हे नकाशा प्रमाणे नसल्यामुळे महापालिकेकडे तक्रार केल्यास सदरचे बांधकाम पाडण्यात येईल असे देखिल त्यांनी सांगितले.

सदरचे बांधकाम वाचविणेसाठी श्री. जेठानंद शर्मा व श्री. शंकर मालवणकर यांनी तक्रारदार यांच्याकडुन रक्कम रूपये बारा हजार लाचेची मागणी केली त्यावेळेस तक्रारदार यांनी १ ला हप्ता म्हणून रक्कम रूपये पाच हजार तक्रारदार यांचा भाऊ श्री. नरेश जवरानी यांच्या समक्ष दिले तक्रारदार श्री. दिनेश मोरंदमल जवरानी यांनी दिनांक ३.७.२००१च्या पत्रान्वये मा. पोलीस निरिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय ठाणे यांच्याकडे तक्रार नोंदविली त्यानुसार लाचलुचपत प्रतिबंधक अधिकारी यांनी दिनांक ३.७.२००१ रोजी सापळा रचून श्री. शंकर मालवणकर यांना व्दारकानाथ अपार्टमेंट महालक्ष्मी कन्स्ट्रक्शन येथे उर्वरीत रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडले आहे. अशा प्रकारे श्री. जेठनंद शर्मा मुकादम व श्री. शंकर मालवणकर बीट इन्स्पेक्टर यांनी महानगरपालिका उल्हासनगर पाहिलेचे नौकर या नात्त्याने पदाचा व अधिकाराचा दुरूप्योग व गैरवापर करून स्वतःचा आर्थिक फायदा केलेला आहे. यास्तव लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे येथील अधिकारी यांनी सेंट्रल पोलीस स्टेशन उल्हासनगर ३ यांजकडे गुन्हा रजि नंबर II-९-२००१ ला प्र. का. सन १९८८ चे कलम ७,१२,१३, (१(ड)सह १३ (२) प्रमाणे दिनांक ४.७.२००१ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे.

भारतीय राज्य घटनेच्या कलम ३११ नुसार लोकसेवकास नोकरीवरून कमी करण्याचे त्यांना पुन्हा नेमणुक करण्याचे अधिकार असलेल्या सक्षम अधिकारी यांच्या परवानगीची आवश्यकता आहे तसेच लाचलुचपत प्रतीबंधक कायदा सन १९८८ चे कलम १९ (१)(क) अन्वये न्यायालयात खटला दाखल करणेस नियुक्ती प्राधिका-याची मंजुरी आवश्यक आहे. त्या अनुषंगाने मा. पोलीस उपआयुक्त / पोलीस अधिक्षक (२) ॲन्टीकरप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य

मुंबई, यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक सीआ/२३०/ठाणे/२०१/६४८ / दिनांक १९.१.२००२ अन्वये श्री. जेठानंद शर्मा, मुकादम व श्री. शंकर मालवणकर कर बीट इन्स्पेक्टर यांच्यावर खटला दाखल करणे कामी महानगरपालिकेकडे विनंती केली आहे.

संबंधीत कर्मचारी श्री. जेठानंद शर्मा व श्री. शंकर मालवणकर हे महापालिकेचे स्थायी कर्मचारी असून लाचलूचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८चे कलम १९ (१)नुसार संबंधितांविरूध्द खटला दाखल करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ अन्वये, उल्हासनगर महानगरपालिका नियुक्ती प्राधिकारी या नात्त्याने सक्षम आहे. म्हणून संबंधितांविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८चे कलम १९ (१) अन्वये खटला दाखल करणेची मंजुरी मिळणेसाठी सदर प्रस्ताव प्रस्तावित आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ७ दिनांक:-२४/७/२००२.

सुचकाचे नाव :-श्री. भालेराव गौतम.

अनुमोदकाचे नाव :-श्री. रूपानी चिमन.

हि महासभा वरील गुन्हयाचे संदर्भात श्री. जेठानंद शर्मा व श्री. शंकर मालवणकर हे महापालिकेचे स्थायी कर्मचारी असून त्यांना उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेतून काढुन टाकण्याचे अधिकार महासभेला प्रदान करण्यांत आलेले असून श्री. जेठानंद शर्मा व श्री. शंकर मालवणकर यांच्यावर वरील नमुद केलेल्या कृत्त्यांमुळे प्रस्तावित होणा-या अपराधांसाठी लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७,१२,१३ (१)(ड) सह १३ (२) प्रमाणे सक्षम न्यायालयात खटला भरणेस मंजुरी देत आहे.

सुचकांची सही/-

अनुमोदकांची सही/-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषय:- उल्हासनगर महानगरपालिकेची मैदाने व उद्याने यांचे भुईभाडे पुर्न:निश्चित करणे व त्यासंबंधी पूर्वीच्या महासभा ठराव क्र. ८ व १७ मध्ये आवश्यक ते फेरबदल किंवा रदद करणे बाबत.

प्रस्तावना:-

उल्हासनगर महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ८, दिनांक ३०.६.२००० अन्वये उल्हासनगर महापालिका मालकीची मैदाने व उद्याने यांचे भुईभाडे निश्चित केलेले आहे. तसेच उल्हासनगर महापालिका सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक. १७, दिनांक १९.१.२००० अन्वये उल्हासनगर महापालिकेची मालकीची उद्याने व मैदाने नोंदणीकृत ट्रस्ट व नोंदणीकृत संस्था व इतरांना केवळ सार्वजनिक पुजा अर्चा, सार्वजनिक धर्मदाय प्रयोजनासाठी किंवा राजकीय पक्षांच्या सभेसाठी तसेच खेळांच्या स्पर्धासाठी इत्त्यादीसाठी किंवा त्यांच्या वापरासाठी किंवा फायदा मिळविण्यासाठी वापरण्याचा उददेश नाही अशा कामासाठी अर्जदाराच्या वेळोवेळच्या गरजेनुसार आयुक्त ठरवतील अशा कालावधीस, अटी व शर्तीवर विनामुल्य देण्यास मंजुरी दिलेली आहे.

उपरोक्त उल्हासनगर महानगरपालिका सर्वसाधारण ठराव क्रमांक १७, दि.१९.१.२००० व ठराव क्रमांक ८, दि. ३०.६.२००० हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका आधिनियम १९४९ चे कलम ७९ शी परस्पर विरोधी आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका आधिनियम १९४९ अन्वये महापालिकेच्या जागा, मैदान इत्त्यादी विनामुल्य देण्याबाबत कायद्यात्मक तरतुद नाही.

सबब सदरचा उपरोक्त महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीशी विसंगत असल्याने रदद करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच महानगरपालिकेस सर्वसाधारण ठराव क्रमांक ८, दिनांक ३०.६.२००० अन्वये महानगरपालिका मालकीची मैदाने, उद्याने यांचे भुईभाडयाचा उल्लेख असलेले दर १९८७ रोजी तत्त्कालीन नगरपालिका ठराव क्रमांक ६५४, दिनांक १९.११.८७ अन्वये ठरविलेले होते. सदर भुईभाडे हे सध्याच्या बाजारमुल्यापेक्षा फारच कमी असल्याने तत्त्कालीन भाडयामध्ये प्रतिवर्ष १० टक्के भाडेवाढ गृहित धरल्यास महापालिका मालकीची मैदाने व उद्यानाचे भुईभाडे खालीलप्रमाणे येत आहे.

| अ. क्र. | ठिकाण | प्रतिदिन भाडे | प्रतिवर्षी १० टक्के भाडेवाढ | एकुण वर्षे १५ प्रमाण वाढीव १० टक्के भाडेवाढ | प्रस्तावित प्रतिदिन भाडे (२४ तासांसाठी) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | साधु वासवानी उद्यान, निलकमल अपार्टमेंट समोर, उल्हासनगर-१ | १००० | १०० | १५०० | २५०० |
| | अ) साधु वासवानी उद्यान, सतनाम डी समोरील भाग, उल्हासनगर-१ | ७५० | ७५ | ११२५ | १८७५ |
| | ब)साधु वासवानी उद्यान, गुलमोहर अपार्टमेंट, उल्हासनगर-१ | १००० | १०० | १५०० | २५०० |
| | क)साधु वासवानी उद्यान, भगवंती नावानी स्टेज | १००० | १०० | १५०० | २५०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | समोर, उल्हासनगर-१ | | | | |
| | ड)साधु वासवानी उद्यान, भगवंती नावानी स्टेज समोर, उल्हासनगर-१ | १५०० | १५० | २२५० | ३७५० |
| २ | म्युन्सिपल बाल उद्यान, बोटक्लब, पवई चौक, उल्हासनगर-३ | ३००० | ३०० | ४५०० | ७५०० |
| ३ | अ) लायन उद्यान, सपना टॉकीजच्या बाजुला | १००० | १०० | १५०० | २५०० |
| | ब)लायन उद्यान, सपना टॉकीजच्या जवळ | १००० | १०० | १५०० | २५०० |
| | क) लायन गार्डन, अ व ब | १५०० | १५० | २२५० | ३७५० |
| ४ | म्युन्सिपल लॉन (महापालिका मुख्यालय मागील भाग ) | १५०० | १५० | २२५० | ३७५० |
| ५ | उद्यान कम यात्री निवास, कलानी महल समोर, उल्हासनगर-२ | १००० | १५० | २२५० | ३७५० |
| ६ | पप्पु सोसायटी समोरील उद्यान, उल्हासनगर-३ | ४०० | ४० | ६०० | १००० |
| ७ | दसरा मैदान, उल्हासनगर-३ | १००० | १०० | १५०० | २५०० |
| ८ | दसरा मैदान, उल्हासनगर-३ विवाहा व्यतिरिक्त अन्य व्यापारीसमारंभ/कार्यक्रमांसाठी | १५०० | १५० | २२५० | ३७५० |
| ९ | जिजामाता उद्यान, उल्हासनगर-४ | ७५० | ७५ | ११२५ | १८७५ |
| १० | गगन बालाजी उद्यान, उल्हासनगर-४ | ४०० | ४० | ६०० | १००० |
| ११ | बॅ.नं १६३ जवळील उद्यान, उल्हासनगर-४ | ४०० | ४० | ६०० | १००० |
| १२ | कुर्ला कॅम्प उद्यान, वार्ड न. २८ उल्हासनगर-५ | ७५० | ७५ | ११२५ | १८७५ |
| १३ | स्वामी भोजराज उद्यान, वार्ड ३७ उल्हासनगर-५ | ४०० | ४० | ६०० | १००० |
| १४ | बॅ. नं. १८२२ जवळील उद्यान उल्हासनगर-५ | ५०० | ५० | ७५० | १२५० |
| १५ | स्वामी प्रीतमदास उद्यान, उल्हासनगर-५ | ४०० | ४० | ६०० | १००० |
| १६ | दसरा मैदान, उल्हासनगर-५ | ७५० | ७५ | ११२५ | १८७५ |



उपरोक्त उद्याने, मैदाने नागरिकांच्या सार्वजनिक वापरासाठी उपलब्ध रहावीत म्हणुन विनामुल्य देण्यात येवू नयेत. तसेच त्यांचे भुईभाडे अधिकतम ठेवल्यास एकतर महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्न मिळेल व भाडे अधिक असल्याने ते वापरण्यासाठी मागण्याची प्रवृत्ती कमी होईल.

म्हणुन उपरोक्त उद्याने /मैदाने नोंदणीकृत ट्रस्ट व नोंदणीकृत संस्था व इतरांना तसेच केवळ सार्वजनिक पुजा , अर्चा सार्वजनिक धर्मदाय प्रयोजनासाठी किंवा राजकीय पक्षांच्या सभेसाठी तसेच खेळाच्या स्पर्धेसाठी किंवा त्यांच्या वापरासाठी फायदा मिळविण्याचा उददेश नाही अशा कामासाठी दिल्यास उपरोक्त परिशिष्टामधील रकाना क्रमांक ६ प्रमाणे भाडे आकारणी करण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे.

उपरोक्त मैदाने / उद्याने लग्न समारंभ/ मुंजा/वाढदिवस / व्यापारी कामासाठी / कार्यक्रमासाठी देण्याचे झाल्यावर ५ पट भाडे आकारणी करण्याचे प्रस्तावित आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ (२५)व (२६) प्रमाणे खालील उददेशासाठी किंवा महापालिकेतर्फे आयोजित कार्यक्रमासाठी विनामुल्य देण्यासाठी महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करणेत येत आहे.

सदरचे मैदाने / उद्याने उपरोक्त भाडयाने दिल्यास वापराबाबत पुढील अटी शर्ती शिवाय योग्य त्या अटी शर्ती टाकण्याचे अधिकार महापालिका आयुक्तांना राहतील. तसेच मैदाने / उद्याने यांचे व महापालिकेच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्यांची भरपाई देण्याचे बंधन वापरणारावर राहील व ती रक्कम वसुल करण्याचा आयुक्तांना अधिकार राहील.

१. उद्याने /मैदाने नोंदणी करते वेळेस १ भाडे व भाडया एवढया अनामत रक्कमेचा रोख भरणा करावा लागेल.
२. ज्या उददेशासाठी परवानगी देण्यात आलेली आहे त्या उददेशा करिताच मैदानाचा वापर करण्यात यावा.
३. संस्थेने /परवानाधारकाने विद्युत पुरवठा हा स्वत:च्या खर्चाने घ्यावा.
४. उद्याने /मैदानातील रस्ते, लॉन्स इत्त्यादी ठिकाणी खड्डे खोदु नयेत.
५. वीज पुरवठा हा महानगरपालिकेच्या खांबावरून न घेता महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या परवानगीने वीज मंडळाच्या मुख्य खांबावरून घ्यावा.
६. ध्वनी प्रदुषण होणार नाही याची काळजी घ्यावी.
७. अग्निशमन प्रतिबंधक उपाययोजना करण्यात यावी.
८. परवानगी समाप्त होताच जागेवर कुठल्याही प्रकारचा कचरा वा टाकावु वस्तु/ अवशेष ठेवु नयेत.
९. सदर कार्यक्रमास पोलीस विभागाची परवानगी घेण्यात यावी.
१०.सदर जागेवर कोणतेही बांधकाम करू नये.
११.कार्यक्रमाच्या ठिकाणी शांतता /सुव्यवस्था व सुरक्षा राखण्याची जबाबदारी परवाना धारकावर राहील.
१२.परवानगीची मुदत संपल्यावर सकाळी ११ वाजेच्या आत मैदान खाली करण्यात यावे अन्यथा प्रती तास २०० रू. दंड आकारण्यात येईल.
१३. अंतर्गत सुशोभिकरण करताना मंडप ठेकेदाराने उद्यानाच्या / मैदानाच्या /रस्त्त्याच्या ठिकाणी खड्डे खोदु नये.



१४. वापरातील जागेवर कचरा टाकल्यास, खड्डे केल्यास किंवा महापालिकेच्या मालकत्तेचे नुकसान केलेले असल्यास तेवढी रक्कम किंवा त्याबददलचा खर्च किंवा नुकसान भरपाई म्हणून अनामत रक्कमेमधुन वसुल केला जाईल.

उपरोक्त प्रस्तावास महासभेची मान्यतेस सादर करण्यात येत आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ८ दिनांक:-२४/५/२००२.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्रसिंह भुल्लर.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार पुर्वीच्या महासभा ठराव क्र. ८ दि. ३०.६.२००० व ठराव क्र. १७ दि. १९.१.२००० मध्ये बदल करून वरील अटी शर्ती व निर्बंध आणि त्याव्यतिरिक्त आयुक्त ठरवतील अशा अतिरिक्त अटी शर्ती व निर्बंधांवर उल्हासनगर महानगरपालिकेची प्रत्येक उद्याने व मैदाने यांचे समोरील उक्त

कोष्टकातील ६ व्या स्तंभात निर्दिष्ट केलेल्या रक्कमेचे भुईभाडे आकरणेस मान्यता देत आहे.

परंतु ——

१. उपरोक्त उद्याने / मैदाने नोंदणीकृत ट्रस्ट व नोंदणीकृत संस्था व इतरांना सार्वजनिक पूजा-अर्चा किंवा सार्वजनिक धर्मादाय प्रयोजनासाठी किंवा राजकीय पक्षांच्या सभेसाठी किंवा खेळाच्या स्पर्धांसाठी ज्यांचा फायदा मिळविण्याचा उददेश नाही अशा वापरासाठी स्तंभ क्र.६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या रक्कमे ऐवजी केवळ ५०० रू. भुईभाडे आकारण्यांत येईल.

२. लायन उद्यान व जिजामाता उद्यान कुठल्याही प्रयोजनासाठी भाडयाने देता कामा नये.

३. उपरोक्त मैदाने / उद्याने लग्न समारंभ किंवा व्यावसायिक कामासाठी किंवा इतर कुठल्याही कार्यक्रमाच्या वापरासाठी स्तंभ क्र.६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या रक्कमे ऐवजी त्याच्या ५ पट रक्कम भुईभाडे म्हणुन आकरण्यांत येईल.

४. उपरोक्त मैदाने / उद्याने फनफेअर, जुगार आणि अवैध वापरासाठी देता कामा नयेत.

५. उपरोक्त मैदाने / उद्याने मुंज किंवा वाढदिवसाच्या प्रयोजनासाठी स्तंभ क्र. ६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या रक्कमेच्या आकाराप्रमाणे वापरण्यास देण्यात येतील.



६. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ६६ (२५) व (२६)मध्ये नमुद केलेल्या प्रयोजनासाठी आणि महानगरपालिके तर्फे आयोजित कार्यक्रमासाठी विनामुल्य देणेस आयुक्तांचे स्वइच्छाधीन राहील.

सुचकांची <u>सही/-</u>

अनुमोदकांची <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

शोक प्रस्ताव :-

१० फेब्रुवारी २००२ मध्ये झालेल्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या दुस-या सार्वत्रिक निवडणूकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या तिकीटांवर प्रभाग क्र. ४ अ मधून निवडून आलेले सन्माननिय सदस्य श्री. मुलचंदानी महेंद परसराम यांचे चुलते श्री. मुलचंदानी चंदीराम यांचे दि. १५.५.२००२ रोजी निधन झाले.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ६ अ <u>दिनांकः-१७.५.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. ठाकुर नरेंद्रकुमार.

अनुमोदकाचे नाव :- श्री. पंजाबी नारायण

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. मुलचंदानी महेंद परसराम यांचे चुलते श्री. मुलचंदानी चंदीराम यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर्र पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>शोक प्रस्ताव :-</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या अतिक्रमणे व अनाधिकृत बांधकामे नियंत्रण विभागात कार्यरत असलेले श्री. मुरली दामोदर भोईर हे उल्हासनगर ३ येथे एक अनाधिकृत बांधकाम निष्कासनाचे काम करत असताना दि. ६.६.२००२ रोजी विजेच्या धक्याने त्यांचे अकस्मित निधन झाले. तसेच उल्हासनगर महानगरपालिकेचे नगरसेवक श्री. जमनादास पुरस्वानी यांच्या मातोश्री श्रीमती ईश्वरीबाई खुबचंद पुरस्वानी यांचे पण दि. २.६.२००२ रोजी निधन झाले.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ९ अ <u>दिनांक:-२०६.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. रमेश चव्हाण.

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. मुरली दामोदर भोईर तसेच श्रीमती. ईश्वरीबाई खुबचंद पुरस्वानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

**विषय :-** सन २००२-२००३ करिता करांचे दर निश्चित करणे आणि स्थायी समितीच्या अर्थसंकल्पिय अंदाजास अंतिम स्विकृती देणे बाबत.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u>१० <u>दिनांक:-२७६.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. अशोक ठाकुर.

हि महासभा स्थायी समितीच्या दि. १४६.२००२ रोजीच्या ठराव क्र. १७ च्या तरतुदी अन्वये पाणीपट्टी, मालमत्ताकर, वगळता जकात कराधान संबंधीच्या काही वस्तुंवरील दर वाढीचा प्रस्ताव विचारात घेवून त्यात फेरफारासह सोबत जोडलेल्या सुचीतील वस्तु समोर स्तंभ क्र. ६ वर दर्शविलेला दर दि. १८.२००२ पासून बसविणेस निश्चित करित आहे. आणि स्थायी समितीने २००२-२००३ करिता सादर केलेला अर्थसंकल्पिय अंदाज विचारात घेवून त्यात चर्चेअंती काही आवश्यक त्या फेरफारासह रू. ५,२८,०००/- शिल्लक दर्शविणा-या अर्थसंकल्पीय अंदाजास अंतीमरित्त्या स्विकृती देत आहे.

उक्त अंदाजपत्रक छापून प्रत्येक पालिका सदस्यास त्याची प्रत पाठविण्याची व्यवस्था मुख्य लेखा अधिकारी करतील व छापील अंदाजपत्रक या ठरावाचा भाग मानला जाईल.

परंतु..................

१. नगरपालिका करिता शासनाने जकात अभिकर्त्ता नेमण्यासंबंधी ठरविलेल्या अटी व शर्तींवर आणि खालील अतिरिक्त अशा अटी व शर्तींवर पूढील एका वर्षाच्या कालावधी करिता जकात वसुली अभिकर्त्ता नेमणेस आयुक्तांना प्राधिकृत करित आहे.
   अ. जकात अभिकर्ता म्हणुन निविदा भरणा-या व्यक्तीने आधीच्या ३ वर्षाचे लेखापरिक्षण झालेले लेखा विवरण पत्र सादर केलेले असावे.
   ब. जकात अभिकर्त्ता म्हणुन निविदा भरणा-या व्यक्तीस आधीच्या किमान एक वर्षाचा जकात वसुली/ पथकर वसुली किंवा तत्सम वसुलीचा अनुभव असावा.

   क. जकात अभिकर्त्ता म्हणून निविदा भरणा-या व्यक्तीची भांडवली स्थिती किमान देकार रक्कमेच्या ५ टक्के एवढी असावी.

   ड. जकात वसुलीची किमान देकार रक्कम रू. ५७ कोटी एवढी असेल.

--२--

२. सद्या कार्यरत असलेल्या जकात अभिकर्त्यांचा कालावधी संपल्या पासून आणि पूढील जकात अभिकर्ता नेमणे पर्यंतच्या कालावधीसाठी आयुक्तांनी जकात वसुलीची कर्तव्ये पार पाडण्यासाठी महापालिका अधिका-यांची / कर्मचा-यांची व्यवस्था व इतर अनुषंगिक पुर्तता करावी.

तसेच पूढील सभेकडून कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता वरील ठरावा अंर्तगतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>बहुमताने मंजुर</u>

पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- महानगरपालिकेच्या मालकीचे भाजी मार्केट मधील गाळे /ओटे /दुकाने भाडेपटट्याने देणे बाबत व भाडे निश्चित करणे बाबत.

प्रस्तावनाः-

तत्कालीन नगरपालिका व सद्याच्या महानगरपालिका मालकीची भाजी मार्केट १,२,३, व ५ मधिल गाळे / ओटे हे उल्हासनगर मधील नागरीकांना भाडे पटट्याने देण्याबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ व कलम ३३४ अन्वये खालील तपशिलाप्रमाणे भाजीमार्केट मधिल गाळे/ओटे हे भाडे पटट्याने देण्याचे प्रस्तावित आहे.

१. जय भवानी भाजीमार्केट, उल्हासनगर-१

सदर भाजी मार्केट मधील ८४ ओटे रू. ३०० किमान दरमहाभाडे व अनामत रक्कम रू. ५००० प्रस्तावित करण्यात येत आहे.

२. झुलेलाल भाजी मार्केट, उल्हासनगर-२

सदर भाजी मार्केट मधील एकुण ३२ गाळे /ओटे रू. ५०० किमान दरमहा भाडे व अनामत रक्कम रूपये ५००० प्रस्तावित करण्यात येत आहे. उपरोक्त, गाळयांपैकी २५ गाळे हे भाजी पाल्यांसाठी असून उर्वरीत ७ गाळे मटन व मच्छी विक्रीकरिता उपलब्ध आहेत.

३. इंदीरा गांधी मार्केट, उल्हासनगर-३

सदर भाजी मार्केट मध्ये एकुण १८२ गाळे /ओटे आहेत. सदर गाळयापैकी १५० गाळे हे भाजीपाली विक्रीसाठी असून २७ गाळे मटन विक्रीसाठी आहेत. तसेच ३ गाळे कॅंटीन करीता असून २ गाळे जनरल स्टोअर्ससाठी उपलब्ध आहेत.

सदरचे गाळे रू. ३०० किमान दरमहा भाडे व अनामत रक्कम ५००० रूपये प्रस्तावित करण्यात येत आहे.

४. भाजी मार्केट, उल्हासनगर-५

सदर भाजी मार्केट मध्ये एकुण ६५ गाळे / ओटे असून रू. ३०० किमान दरमहा भाडे व रू. ५००० अनामत रक्कम प्रस्तावित करण्यात येत आहे.

उल्हासनगर महानगरपालिका हददीतील भाजी मार्केट/ मटन/मच्छी मार्केट येथील गाळे /ओटे दुकाने भाडे तत्त्वावर देण्याबाबतच्या शर्ती व अटी खालील प्रमाणे :-

१. उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीचे तपशिलमध्ये नमुद केलेप्रमाणे उल्हासनगर भाजीमार्केट १,३व ५ हे मासिक भाडेपटटा रूपये ३०० प्रमाणे व भाजीमार्केट उल्हासनगर-२ साठी मासिक भाडेपटटा रूपये ५०० प्रमाणे ५ या मुदतीकरीता आज करार झालेल्या दिनांकापासुन देण्यात येत आहे.



२. सदर दुकान/गाळा/ओटा याची अनामत रक्कम रूपये ५०००/- ही महानगरपालिकेकडे बिनव्याजी राहील.

३. महानगरपालिका गाळयाचे /दुकानाचे /ओटयाचे भाडे करारनाम्याच्या तारखेपासून लागू राहील व आर्थिक वर्षात १५ एप्रिल व १५ ऑक्टोबर या दोन टप्प्यात अगाऊ भाडे महानगरपालिकेच्या कार्यालयात मालमत्ता विभागामध्ये भरावे लागेल. न भरल्यास प्रत्यक्ष भाडे भरण्याच्या दिनांकापर्यंत थकीत भाउयाच्या रक्कमेवर १५ टक्के व्याज

आकारणी करून थकीत रक्कम मालमत्ता कराची थकीत रक्कम समजुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमांतर्गत तरतूदी अन्वये वसूल करण्याचे अधिकार महानगरपालिकेकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

४. गाळेधारक यांना व्यवसाय करण्यापूर्वी महानगरपालिकेच्या राज्य शासनाच्या, केंद्र शासनाच्या प्रचलीत नियमाप्रमाणे आवश्यक असलेली परवाना पत्रे स्वखर्चाने प्राप्त करावी लागतील.

५. भाडेपटट्याची मुदत संपताच वापरात असलेला गाळा /दुकान/ओटा जागेसह महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात येईल. असा ताबा देताना भाडेकरू महानगरपालिकेकडून कोणत्त्याही प्रकारची नुकसान भरपाई मागणार नाही. गाळयाचा ताबा देत असताना भाडेकरू कोणत्त्याही स्वरूपात विशेषतः कुळ भाडेकरू या नात्त्याचा हक्क सांगणार नाही हे भाडेपटटेदारांना मान्य आहे.

६. सदर भाडेपटटा मुदत संपण्यापूर्वीच भाडेपटटादारास दुकानगाळा, ओटा नको असल्यास किंवा दुकाने, गाळा, ओटा सोडण्याचा इरादा करून जागेचा खुला कब्जा महानगरपालिकेस दिल्यास अथवा करारातील अटी व शर्तींचा भंग झाल्यामुळे अगर कोणत्त्याही कायदयात्मक मार्गाव्दारे दुकानगाळा/ओटा यांचा कब्जा महानगरपालिकेने घेतल्यास कोणत्त्याही प्रकारची नुकसान भरपाई मागण्याचा अधिकार हक्क भाडेपटटा करार लिहुन देणा-यास असणार नाही.

७. भाडेपटटा मुदत संपल्यापूर्वीच, वापरात दिलेल्या दुकान/ओटा/गाळा यांची भाडेपटटा धारकांस आवश्यकता नसल्यास मालमत्ता विभागास तसे लेखी कळविले पाहिजे. तसेच भाडेपटटा मुदत संपण्यापुर्वीच महानगरपालिकेस पूर्व सूचना देऊन जागा ताब्यात घेता येईल व कोणत्त्याही प्रकारची नुकसान भरपाई मागण्याचे अधिकार हे भाडेपटटा करार लिहुन देणा-यास असणार नाही.

८.भाडेपटट्याने वापरावयास दिलेल्या दुकान/ओटा/गाळा यांची विद्यूत वापराची बिले भाडेपटटेदारांनी स्वखर्चाने महाराष्ट्र राज्य विद्यूत मंडळाकडे भरावयाची आहेत. आणि गरज पडल्यास विद्यूत मंडळाकडे पूर्व सुचना देवून विद्यूत कनेक्शन बंद करण्याचा महानगरपालिकेस अधिकार राहील.

९. महानगरपालिकेने भाडेपटट्याने दिलेला दुकान गाळा, ओटा अगर त्त्यांचा कोणत्त्याही स्वरूपाचा भाग कोणत्त्याही परिस्थितीमध्ये दुस-या अन्य इसमांना पोटभाडयाने देता येणार नाही किंवा पोटकुळ/लायसेन्सी ठेवून कोणत्त्याही व्यक्तीस अथवा संस्थाच्या नावे हस्तांतरीत करता येणार नाही. तसेच कोणत्त्याही वित्तिय संस्थेकडे, बॅकेकडे अथवा अन्य कोणाकडे परस्पर गहाण किंवा तारण ठेवता येणार नाही. अशा कोणत्त्याही प्रकारची कृती केल्याचे आढळून आल्यास त्याबाबतचा करारनामा रदद करून दुकान/गाळा/ओटा महानगरपालिकेतर्फे कोणत्त्याही प्रकारची पुर्वसूचना न देता, कोणत्त्याही प्रकारची नुकसान भरपाई न देता ताब्यात घेण्याचे अधिकार महानगरपालिकेस असतील.

१०. महानगरपालिकेसोबत लेखी करार केल्यापासुन १ महिन्याचे आत व्यवसाय सुरू करावा लागेल तसे न केल्यास करारपत्र रदद करून कोणत्त्याही पूर्व सुचनेशिवाय दुकान/गाळा/ओटा/महानगरपालिकेतर्फे ताब्यात घेतला जाईल.



११.भाडेपटटाधारक व महानगरपालिका यांच्यात कोणत्त्याही प्रकरणात वाद उपस्थित झाल्यास उल्हासनगर येथील योग्य त्या न्यायालयामध्ये दाद मागता येईल.

१२.महानगरपालिकेने संमती दिलेल्या व्यवसायाव्यतिरिक्त इतर कोणत्त्याही स्वरूपाचा अनैतिक व बेकायदेशिर व्यवसाय भाडेपटटाधारकास करता येणार नाही.

१३. भाडेपटटयाने दिलेले दुकान/गाळा/ओटा यांची रंगरंगोटी, किरकोळ दुरूस्ती इत्त्यादी भाडेपटटाधारकाने स्वखर्चाने करावयाची आहे. तसेच भाडेपटअयाने दिलेल्या इमारत/गाळा/ओटा यांचेवर कोणत्त्याही स्वरूपाचे पक्के बांधकाम महानगरपालिकेच्या पुर्व परवानगीशिवाय करता येणार नाही. व महानगरपालिकेने जागा ताब्यात घेतल्यानंतर सदर खर्चाची कोणत्त्याही स्वरूपाची नुकसान भरपाई महानगरपालिकेकडून दिली जाणार नाही.

१४.भाडेपट्टयाने दिलेल्या दुकान/गाळा/ओटा यांची आरोग्याचे दृष्टीने स्वच्छता भाडेपट्टाधारकाने ठेवावयाची असून नैसर्गिक अथवा इतर कोणत्त्याही प्रकारे भाडेपट्टाधारकाचे अथवा इतर कोणाचेही आर्थिक नुकसान किंवा जिवित हानी झालेस त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. व कोणत्त्याही प्रकारची महापालिकेकडून नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.

१५. वरील प्रमाणे वर करारामध्ये उल्लेख केलेल्या सर्व अटी व शर्ती या करार लिहून देणार यांस मान्य व कबुल असून त्यांचे करारनामा लिहून देणार यांनी काटेकोर पालन करणेचे आहे. करारातील कोणत्त्याही अटी शर्तीचा भंग झालेस व प्रसंगी आयुक्त यांनी ठरविल्यास योग्य त्या कायदेशिर मार्गाने दुकान/गाळा/ओटा यांचा कब्जा महानगरपालिका घेईल.

१६. सध्याचे गाळा धारक लिलावामध्ये भाग घेवू इच्छित असल्यास त्यांचेकडे असलेली थकबाकी व त्यावेळच्या शर्तीप्रमाणे विहित केल्याप्रमाणे ९ टक्के दराने सरळ व्याजाची रक्कम त्यांनी महानगरपालिका फंडात जमा करणे आवश्यक असून तसे केल्यानंतरच त्यांना लिलावामध्ये भाग घेता येईल.

१७. देकार निविदेमध्ये भरण्यात आलेली देकार रक्कम स्विकारणे अगर नाकारणे याचा अधिकार प्रशासनाने राखून ठेवला आहे.

वरील प्रमाणे अटी व शर्ती सह उल्हासनगर कॅम्प क्रमांक १ ,३ ,व ५ मधील भाजी मार्केटसाठी मासीक भाडे किमान ३००/- रूपये व कॅम्प क्रमांक २ मधील भाजी मार्केटसाठी किमान मासीक भाडे ५००/- रूपये ही देकार रक्कम ठेवून बंद लिफाफ्यामध्ये देकार रक्कम मागवून लिलाव करण्याचे प्रस्तावित करणेत येत आहे. मासिक भाडयाची कमाल देकार रक्कम देणा-यांचे नावे लिलाव मंजूर करणेसाठी महासभेच्या मान्यतेसाठी गोषवारा सादर करणेत येत आहे.

--४--

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u>  ११  <u>दिनांकः-१९.७.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीचे कॅम्प क्र. १ ,२ ,३ व ५ चे भाजी मार्केट मधील गाळे, ओटे / दुकाने वरील प्रस्तावनेत सुचविल्याप्रमाणे भाडे, अनामत रक्कम आणि अटी शर्तीवर भाडेपट्टयाने देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

**विषयः-** उल्हासनगर शहरात फेरीवाला व ना फेरीवाला क्षेत्र घोषित करणेस व फेरीवाल्यांना परवाना देणे बाबत.

**प्रस्तावनाः-**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यावर हातगाडीवाले तसेच कायम स्वरूपी एका विशिष्ट जागेवर बसणारे फेरीवाले, विक्रेते मोठ्या प्रमाणावर महापालिकेच्या सार्वजनिक रस्त्यांचा तसेच सार्वजनिक जागांचा वापर करतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर कचरा, ध्वनी प्रदुषण होते तसेच रहदारीस अडचण येते. त्यामुळे नागरिकांना, वाहनांना असुविधा निर्माण होवून वाहतुकीची कोंडी इत्यादी प्रश्न उदभवतात तसेच प्रदुषणात भर पडते.

सबब नागरिकांच्या हितासाठी बॉम्बे पब्लिक कन्व्हिनिअन्स ॲक्ट १९२० (बॉम्बे VII १९२०) अन्वये तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३८४ अन्वये उल्हासनगर शहरातील खालील रस्ते हे ना फेरीवाला क्षेत्र म्हणुन घोषित करण्यास महासभेपुढे प्रस्तावित.

| अ. क्र. | ना फेरीवाला क्षेत्राचे नांव | कॅम्प नं. | रस्ता विभाग | | ना फेरीवाला क्षेत्राची एकूण लांबी रूंदी (चौरस मीटर) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासुन | पर्यंत | लांबी (मी.) | रूंदी (मी) | क्षेत्रफळ (चौ.मी.) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | उल्हासनगर | ३ | शांतीनगर जकात नाका | साईबाबा मंदिर, कल्याण अंबरनाथ रोड | ३००० | २५.०० | ७५००० |
| २ | उल्हासनगर | ३ | शिवाजी चौक | नेहरू चौक | ६५० | १८ | ११७०० |
| ३ | उल्हासनगर | २ | नेहरू चौक | गोलमैदान | २७० | १८.३० | ४९४१ |
| ४ | उल्हासनगर | १ | गोलमैदान, बीपीएल गॅलरी | २४ स्कुल | २७० | १३.७२ | ३७०४ |
| ५ | उल्हासनगर | १ | कॅम्प १ बस स्टॉप | बिर्लागेट | १८० | १०.६० | १९०८ |
| ६ | उल्हासनगर | १ | नेहरू चौक | कॅम्प नं. १ बस स्टॉपपर्यंत | ९४५ | १०.६० | १००१७ |
| ७ | उल्हासनगर | २ | नेहरू चौक | अमन टॉकीजपर्यंत | ३३० | १३.७५ | ४५३८ |
| ८ | उल्हासनगर | ३ | शास्त्री चौक | हिराघाट व पुढे पवई चौकापर्यंत | ७०० | १८.२९ | १२८०३ |
| ९ | उल्हासनगर | ३ | शास्त्री चौक | महापालिका ते चोपडा कोर्ट | ५१६ | १४.६७ | ७५७० |
| १० | उल्हासनगर | ४ | ओटी कॅम्प ४ | मुख्य बाजारपेठे पासनु व्हिनस चौक | ९७५ | १३.७५ | १३४०६ |
| ११ | उल्हासनगर | ४ | व्हिनस सिनेमा चौक | नेताजी चौक | ३५० | २५ | ८७५० |
| १२ | उल्हासनगर | ५ | लालचक्की ते मठमंदिर जुन बस स्टॉप | दुधनाका कैलास कॉलनी | ९२५ | १४.५० | १३४१३ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | उल्हासनगर | २ | नेहरू चौक | फॉलवर लाईन चौक (सेंन्ट्रल हॉस्पीटल रोड) | ११०० | १८.२९ | २०११९ |
| १४ | उल्हासनगर | २ | बँक ऑफ बरोडा | मोनिका मॅरेज हॉल | १८५ | १२.१९ | २२५५ |
| १५ | उल्हासनगर | २ | प्रजापती ब्रम्हकुमारी आश्रम | गार्डन नं.४४४ व पुढे कैलास बिल्डींग पर्यंत | १८० | १२.१९ | २१९४ |
| १६ | उल्हासनगर | ३ | उल्हास रेल्वे स्टेशन | संतु बिल्डींग | ५५० | १८.२९ | १००६० |
| १७ | उल्हासनगर | ३ | संतु बिल्डींग | शिवाजी चौक | ६२५ | १०.६० | ६६२५ |
| १८ | उल्हासनगर | २ | भारत चौक | साधुबेला स्कुल, झुलेलाल स्कुल, आवतमल चौक, शिरू चौक | १२५० | १०.६० | १३२५० |
| १९ | उल्हासनगर | १ | गोलमैदान, संत निरंकारी हॉल | भारत चौक | ४७५ | १०.६० | ५०३५ |
| | | | | | १३८७६ | ३०१.१३ | २३२१६३ |

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> १२ <u>दिनांकः-१९.७.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंदसिंह भुल्लर.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार वर नमुद केलेले रस्ते हे ना फेरीवाला क्षेत्र म्हणुन घोषित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>विषयः-</u> उल्हासनगर महानगरपालिकेचे गॅरेज मॅकेनिक आणि मालमत्ता व्यवस्थापक या पदाच्या अधिका-यासाठी ५ वे वेतन लागू करणे बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

महाराष्ट्र शासन निर्णय वित्त विभाग क्र. वेपुरा/१२९८/प्र.क्र. १६/९८/सेवा १० दिनांक ५ जानेवारी,१९९९ अन्वये शासनाने शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना दिनांक १ जानेवारी,१९९६ पासून पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू केल्या आहेत.

त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेने महापालिका अधिकारी /कर्मचारी यांना पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी प्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याचा सविस्तर प्रस्ताव महापालिकेच्या ठरावासह इकडिल दि. ८.६.१९९९च्या पत्रान्वये शासनाकडे सादर केला होता.

त्यानुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. उमपा/२२९९/१७४९/प्र. क्र८२/९९/नवि-३३/दिनांक १३ ऑक्टोबर, १९९९ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका अधिकारी/ कर्मचारी यांना पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करणेस दि. १ जानेवारी, १९९६ पासून मान्यता दिलेली आहेत. त्यामध्ये गॅरेज मॅकेनिक व मालमत्ता व्यवस्थापक या पदाचा समावेश केलेला नव्हता.

उपरोक्त शासन निर्णयान्वये खालील पदांना सुधारीत वेतनश्रेणी दि. १ जानेवारी, १९९६ पासून लागू करणेस महासभेपुढे ठेवणेस प्रस्तावित आहे.

| पदाचे नांव | पाचव्या वेतन आयोगानुसार सुधारीत देय असलेली वेतनश्रेणी |
|---|---|
| १. गॅरेज मॅकेनिक | रू. ४०००-१००-६००० |
| २. मालमत्ता व्यवस्थापक | रू. ५५००-१७५-९००० |

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र. १३</u>                <u>दिनांक:-१९.७.२००१.</u>

सुचकाचे नाव :-श्री. मोहन वेहरानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. नरेंदकुमार ठाकुर.

--२--

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर महानगरपालिकेचे गॅरेज मॅकेनिक व मालमत्ता व्यवस्थापक या पदाच्या अधिका-यांसाठी ५ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी अन्वये दि. १ जानेवारी ९६ पासून सुधारीत वेतन श्रेणी लागु करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात नर्सींग होम रजिस्ट्रेशन करणे कामी मुंबई नर्सींग होम ॲक्ट १९४९ ची व्याप्ती वाढविणेस आणि उल्हासनगर क्षेत्रास लागू करण्यास शासन अधिसूचना प्रसिध्दी संबंधी आरोग्य परिक्षण व वैद्यकीय सहाय्य समितीचा दि. ११.६.२००२ रोजीचा ठराव क्र. १ कायम करणे बाबत.

प्रस्तावना

महाराष्ट्र मेडिकल कॉन्सील रजिस्ट्रेशन ॲक्ट अनुसार खाजगी नर्सिंग होम अथवा रुग्णालय यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे नोंदणी करणे अत्त्यावश्यक असून ती त्यांची नैतिक जबाबदारी आहे. परंतु कारणपरत्त्वे नोंदणीकृत नसलेली असंख्य खाजगी रुग्णालये अस्तित्त्वात असून, सदरहू रुग्णालयात शासकिय कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय आकस्मिकता प्रसंगी उपचार करुन घेत असतात. परिणामी केवळ खाजगी रुग्णालये नोंदणीकृत नसल्याने, त्यांची देयके पारित होण्यास अडचणी येतात. त्यामुळे महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी शुश्रषागृहांवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने मुंबई नार्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ ची व्याप्ती वाढवून राज्यातील सर्व महानगरपालिकांना लागु करण्यांत यावी असे महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे.

त्याअर्थी महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या दिनांक ४.११.९३ च्या शासकिय राजपत्रात अधिसूचना प्रसिध्दी द्वारे ठाणे, नासिक, औरंगाबाद, कोल्हापूर, कल्याण , अमरावती, पिंपरी-चिंचवड, आणि नवी मुंबई या महानगरपालिका क्षेत्रात सदर अधिनियमांची व्याप्ती वाढवून दि. १५.११.९३ पासुन लागु करण्यांत आली.

उल्हासनगर शहरातील खाजगी नर्सिंग होम अथवा रुग्णालय यांची उल्हासनगर महानगरपालिकेकडे नोंदणी करणे,नोंदणीद्वारे नोंदणी फी वसूल करणेस आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने मुंबई नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ ची व्याप्ती वाढवून उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात लागू करणे आवश्यक आहे. त्याअर्थी आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडुन अधिसूचना प्रसिध्द करण्यास शिफारस व्हावी असे प्रस्तावित.

--१--

आरोग्य परिक्षण व वैद्यकिय सहाय्य समिती :-१ दिनांक :-११.६.२००२

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती मिना सोंडे

ही आरोग्य परिक्षण व वैद्यकिय सहाय्य समिती वरील प्रस्तावने अनुसार महासभेच्या अधिन राहून मुंबई नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ ची व्याप्ती वाढवून उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात लागु करण्यास, आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना अधिसूचना प्रसिध्द करणेस शिफारस करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजूर

सभापती / पिठासीन अधिकारी
आरोग्य परिक्षण व वैद्यकिय सहाय्य समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> १४ <u>दिनांक:-१९.७.२००१.</u>

सुचकाचे नाव :-श्रीमती. मिनु दासानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी.

हि महासभा आरोग्य परिक्षण व वैद्यकीय सहाय्य समितीचा वर नमुद केलेला दि. ११.६.२००१ रोजीचा ठराव क्र. २ अंतर्गतचा निर्णय कायम करीत आहे.
तसेच पूढील सभेकडून कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता वरील ठरावा अंर्तगतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

.

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>विषय:-</u> किर्लोस्कर योजने अंतर्गत उल्हासनगर शहरात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. २ राबविण्यास मंजूरी देणे बाबत.

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर शहर हे अत्त्यंत जुने शहर म्हणून ठाणे जिल्हयांत ओळखले जाते. सन १९४८ पूर्वी येथे लष्करी छावणी होती व त्या वेळेस शहरांत बदलापुर येथील बॅरेज हेड वर्क्स मधून पाणी पुरवठा होत होता. वेळोवेळी म्हणजे सन १०६७, सन १९७७ व सन १९८१ मध्ये येथील लोकसंख्या वाढीनुसार पाणी पुरवठा योजनेत किरकोळ सुधारणा करण्यांत आल्या.

सदर उल्हासनगर पाणी पुरवठा योजना, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (शासनाचा अंगिकृत व्यवसाय) यांचेकडून दिनांक १९.१२.१९९४ रोजी तत्त्कालीन नगरपालिकेकडे शासन निर्णयानुसार हस्तांतरीत करण्यांत आली. उल्हासनगर शहर हे कॅम्प १ ते ५ अशा उत्तर व दक्षिण भूखंडावर विस्तारीत झाले आहे व उंचसखल भागात विभागले गेले असल्यामुळे शहरास आहे त्यास्थितीत सम प्रमाणात पाणी पुरवठा करणे शक्य होत नाही. त्याकरिता महाराष्ट्रजीवन प्राधिकरणामार्फत ''किर्लोस्कर कन्सल्टन्सी'' यांच्या सहाय्याने उल्हासनगर शहर सुधारीत पाणी पुरवठा योजना तयार करण्यांत आली असून योजनेच्या पहिल्या टप्प्यातील ७० टक्के काम पुर्ण होत आले असून यांत

शहराच्या विविध भागात आठ उंच जलकुंभ बांधणे तसेच मुख्य जलवाहिन्या टाकण्याचे काम समाविष्ट आहे. पहिल्या टप्प्यातील अंदाजे खर्च रू. १८८० कोटी अपेक्षित आहे.

उल्हासनगर शहराची वितरण व्यवस्था अत्यंत जुनी असल्यामुळे तसेच वितरण नलिका खुप ठिकाणी सडल्या असल्याने व गंजल्या असल्यामुळे जलवितरणात दुषित पाण्याचा समावेश होऊन रोगाचा प्रादुर्भाव यापुर्वी झालेला आहे व यापुढे होण्याची शक्यता नाकारता येणार नाही, त्यामुळे जुन्या जलवाहिन्या वारंवार दुरूस्त करण्याचा खर्च वाढत चालला आहे व लोकसंख्या वाढीमुळे वितरण व्यवस्था अपुरी पडत आहे.

उपरोक्त सर्व अडचणींवर मात करण्याकरिता दि. ३.१२.२००० रोजी मा. श्री. रामानंद तिवारी, प्रधान सचिव (नगरविकास) यांचे अध्यक्षतेखाली मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांचे दालनात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी यांचे समवेत बैठक घेण्यांत आली, त्यावेळेस उल्हासनगर शहरातील पाण्याच्या वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्याच्या दृष्टीने चर्चा करण्यांत आली.

सदर बैठकीत प्रधानसचिव (नगरविकास) यांनी असे आदेश दिलेत की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेव्दारे रक्कम रू. ४१ कोटी (ढोबळ) उल्हासनगर सुधारीत पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. २ त्वरीत राबविण्यात यावी, ज्यामुळे उल्हासनगर शहराच्या रहिवाशांना समप्रमाणात मुबलक पाणी पुरवठा करता येईल.



त्याप्रमाणे उल्हासनगर सुधारीत पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. २ या ठराव तातडीने महासभेपुढे ठेवून ठराव क्र. ३० दि. २०.१२.२००० व्दारे मंजुर करून घेण्यांत आला व त्याची प्रत संदर्भित पत्र क्र. २ नुसार मंडळास पाठविण्यांत आली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने संदर्भित पत्र क्र. १ व्दारे उल्हासनगर सुधारीत पाणी पुरवठा टप्पा क्र. २ बाबतच्या ठरावात सुधारणा करून खालीलप्रमाणे विहित नमून्यांत मागितला आहे.

-:ठराव:-

१. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, ठाणे यांनी उल्हासनगर शहरासाठी तयार केलेल्या सुधारणा पाणी पुरवठा टप्पा क्र. २ या योजनेच्या रू. ३,४८९ लक्षनिव्वळ व रू. ४,१०० लक्ष ढोबळ खर्चास ही महानगरपालिका मान्यता देत आहे. योजनेची किंमत (खर्च) वाढल्यास व योजनेत सुधारणा करण्यात आल्यास जास्तीचा आर्थिक भार सोसण्यास ही महानगरपालिका तयार आहे. तसेच योजनेच्या (२३.३३ टक्के शासकीय अनुदान, १० टक्के लोक वर्गणी व ६६.६७ टक्के कर्ज) यांस ही महानगरपालिका मान्यता देत आहे.

२. प्रस्तुत योजनेच्या रू. ४,१०० लक्ष ढोबळ खर्चाच्या १० टक्के म्हणजे रू. ४१० लक्ष इतकी रक्कम योजनेस प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर लोक वर्गणी पित्त्यर्थ भरण्यास उल्हासनगर महानगरपालिका तयार आहे.

३. प्रस्तुत योजना पुर्ण झाल्यानंतर शासनाच्या / मंडळाच्या आदेशानुसार ती एक महिन्याच्या आत ताब्यात घेवून राबविण्यास उल्हासनगर महानगरपालिका तयार आहे.

४. योजना स्वयंपुर्ण होण्याच्या दृष्टीने ही महानगरपालिका आवश्यक ती पाणी पटटी बसविण्यास व आवश्यकता असल्यास पाणी पटटीच्या दरांत वाढ करण्यास तयार आहे.

५. योजना राबवितांना अस्थायी आस्थापना खर्चाच्या तसेच यंत्र, घसारा, मशिनरी दुरूस्ती वगैरे खर्चासाठी ही महानगरपालिका शासनाकडून कोणत्याही अनुदानाची मागणी करणार नाही. ही उल्हासनगर महानगरपालिका हा खर्च योग्य ती पाणी पटटी कर बसवून भागविण्यास तयार आहे व त्यासाठी लागणारा निधी राखून ठेवील.

६.	जर महानगरपालिकेने वरील बाबींचे अनुसरण न करता योजना ताब्यात घेण्याची व राबविण्याची जबाबदारी टाळल्यास सदर योजना राबविण्याच्या व्यवस्थेसाठी/ मंडळाचा /शासनाचा झालेला खर्च उल्हासनगर महानगरपालिका शासनाकडुन मिळणा-या पैशातून किंवा अनुदानातून शासनाला परस्पर वळता करून घेण्यास ही महानगरपालिका मान्यता देत आहे.

७.	योजना पुर्ण झाल्यानंतर येणारा देखभाल व दुरूस्ती व कर्ज फेडीसाठीचा वार्षिक बोजाही महानगरपालिकेस मंजुर आहे.

उपरोक्त अटींच्या आधिन राहून उल्हासनगर सुधारीत पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. २ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेतर्फे राबविण्यासाठीचा प्रस्ताव मंजुरीकरिता महासभेपुढे सादर.



<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.१५</u>		<u>दिनांक:-१९.७.२००१.</u>

सुचकाचे नाव :- श्रीमती. ज्योती कालानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. धनंजय बोडारे.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार वर नमुद केलेल्या अटींच्या आधिन राहून उल्हासनगर शहरात किर्लोस्कर कन्सल्टंन्सीच्या अहवालानुसार सुधारित पाणी पुरवठा टप्पा क्र. २ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे तर्फे राबविण्यासाठीच्या प्रस्तावास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत काही कामांस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावनाः-

दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत सन २००१-२००२ मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेने शहरातील अनुसूचित जातीच्या प्रभागांमध्ये १५ कामांचे रू. १,३८,४०,७००/- एवढयाच रक्कमेचे प्रस्ताव इकडील पत्र क्र. उमपा/साबा/शआ/२९/०२ दिनांक २८.३.२००२ नुसार शासनाकडे मान्यतेसाठी व निधी उपलब्ध करून देण्यासाठी निवडूणक प्रक्रिया सुरू असल्याने महासभेची मंजुरी न घेता पाठविण्यांत आला होता. शासकीय मार्गदर्शक तत्त्वानुसार सदर कामांना महानगरपालिकेच्या महासभेकडुन मंजुरी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार यादीत प्रस्तावित केलेल्या कामांना महानगरपालिकेच्या महासभेकडुन मान्यता मिळण्यासाठी प्रस्तावित करण्यांत येत आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. १६ दिनांकः-१९.७.२००२.

सुचकाचे नाव :- श्री. अनिल जयसिंघानी

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार सन २००१-२००२ करिता दलितवस्ती सुधारणा योजने अंर्तगत सोबत जोडलेल्या यादी मधील दलित विकास कामांच्या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

| अनुक्रमांक | कामाचे नांव | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | उल्हासनगर-३ येथील भैयासाहेब नगर, रमाबाई आंबेडकर नगर, हनुमान नगर, येथे रस्ता बी.एम. व ए सी आणि नाली बनविणे (प्रभाग क्रमांक ७) | ४७७०८०० |
| २ | उल्हासनगर-२ येथील बजरंग आईस फॅक्टरी मार्बल कारखाना येथे रस्ता एम. ३५० ने बनविणे (प्रभाग क्र. ८) | १४२०५०० |
| ३ | उल्हासनगर-२ येथील बालकनजी बारी येथे रस्ता एम.२५० ने बनविणे आणि चंद्रशेखर आझाद शाळेजवळ साकव आणि रस्ता एम. | ३८४३०० |

| | | |
|---|---|---|
| | ३५० ने बांधणे (प्रभाग क्र.९) | |
| ४ | उल्हासनगर -३ येथील सम्राट अशोक नगर येथे व महावीर किराणा स्टोर जवळ १० बैठकीचे शौचालय बांधणे. | ३८४३०० |
| ५ | उल्हासनगर -३ येथील चर्चजवळ वडोल गाव येथे १० बैठकीचे शौचालय बांधणे. | ४४१८०० |
| ६ | उल्हासनगर-३ येथील सेंट जोसेफ शाळा वडोलगांव येथे १० बैठकिचे शौचालय बांधणे. | ४४१८०० |
| ७ | उल्हासनगर-३ येथील रेणुका सोसायटी जवळ सम्राट अशोक नगर येथे १० बैठकीचे शौचालय बांधणे. (प्रभाग क्र. १३) | ३८४३०० |
| ८ | उल्हासनगर-४ येथील ब्लॉक ११८ ते ओ १२४ येथे नाली बनविणे, आणि डांबरीकरण करणे (प्रभाग क्र. १६) | ५४७४०० |
| ९ | उल्हासनगर-४ येथील ब्लॅक ओ. १३३ ते ब्लॉक ओ १३० येथे नाले बनविणे आणि डांबरीकरण करणे (प्रभाग क्र. १६) | ४३९९०० |
| १० | उल्हासनगर-४ येथील ब्लॉक ओ. १४० आणि ब्लॉक ओ. १४२ नाली बनविणे आणि डांबरीकरण करणे (प्रभाग क्र. १६) | ४५९९०० |
| ११ | उल्हासनगर-५ येथील महात्मा फुले नगर, गणेश मंदिर ते प्रेमनगर, वॉटर टॅक येथे नाली बनविणे आणि डांबरीकरण करणे (प्रभाग क्र. २०) | ११११९००० |
| १२ | उल्हासनगर-५ येथील गॅस गोडाऊन ते बॅ.नं. २०८६ मागे नाला बनविणे (प्रभाग क्र.२०) | ३५०१०० |
| १३ | उल्हासनगर-४ येथील सुनिल शिंगारे यांचे निवासस्थान ते बुध्द विहार ते दहा चाळ येथे आणि ब्लॉक ओ. ३०१ समोर रस्ता एम. २५० ने बनविणे. | ३७५००० |
| १४ | उल्हासनगर-३ येथील साईबाबा नगर येथे रस्ता एम-२५० ने बनविणे (प्रभाग क्र. ३०) | ८७५५०० |
| १५ | उल्हासनगर-३ येथील माताराणी फ्लोअर मिल ते भगवान फ्लोअर मिल, मंगलमुर्ती दवाखाना, दत्त मंदिर येथे रस्ता सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे (प्रभाग क्र. ३१) | १४४११५० |
| | | १३८४०७०० |

# <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>विषयः-</u> गरजु व निराधार विद्यार्थ्यांना रेनकोट पुरविणे
कामी महिला व बालकल्याण समितीचा
दि. २५.६.२००२ रोजीचा ठराव क्र. २ कायम
करणे बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

उल्हासनगर शहरात ब-याच ठिकाणी गरीब वस्त्त्या आहेत व त्यामध्ये रहाणारी मुले-मुली शालेय शिक्षण घेत आहेत. परंतु त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे यामुलांचे पालक त्यांच्या आवश्यक त्या शालेय गरजा पुर्ण करू शकत नाहीत ते निराधार असल्यामुळे पावसाळयात शाळेत जाताना या मुलांकडे रेनकोट नसल्याने पावसात भिजून ती आजारी पडतात त्यामूळे त्यांच्या पालकांवर औषधोपचाराचे आणखी आर्थिक ओझे वाढते व मुलांची शाळेमधील गैरहजेरी वाढत असल्याने शिक्षणावर त्याचा विपरीत परिणाम होत असतो. ही मुले भारताचे भवितव्य आहे. यामुलांचे शोषण होवू नये म्हणुन महापालिकेकडून त्यांच्यासाठी शालेय साहित्त्याची मदत मिळावी किंवा रेनकोट उपलब्ध करून दयावे असे वाटते.

उल्हासनगर शहरात एकुण २५ बहुसंख्य प्रभाग आहेत. प्रभाग क्र. २५ वगळता प्रत्त्येक प्रभागात ३ जागा आहेत. आणि प्रभाग २५ मध्ये ४ जागा आहेत. एकुण बहुसंख्य २५ प्रभागातील जागांची संख्या ७६ होते. वयोगट ६ ते ९ वर्षाचे हे विद्यार्थी महापालिकेच्या शाळेमधील असोत किंवा इतर शाळांमधील असोत प्रत्त्येक बहुसंख्य प्रभागातील एका जागेमधील क्षेत्रातील संबंधित पालिका सदस्याची खात्री पटल्यावर आणि आयुक्त ठरवतील व लादतील अशा अटी व पध्दतीस अधिन राहुन अशा शिक्षण घेणा-या १०० गरीब, गरजु व निराधार मुलांना रिलायबल कंपनीने उत्त्पादीत केलेले रेनकोट पावसाळयापूर्वी उपलब्ध करून देणे योग्य राहील.

रिलायबल कंपनीचा अधिकृत दर प्रत्त्येक रेनकोटला रू. १४०/- असा आहे. आणि सर्व बहुसंख्य प्रभागातील एकुण ७६ जागांचे क्षेत्रातील प्रत्त्येक जागेकरिता १०० रेनकोट पुरविण्यास एकुण रू.१०,६४,०००/- इतका अंदाजित खर्च अपेक्षीत आहे. त्याअनुसार एकुण ७६०० रेनकोट खरेदी करणे आणि उपरोक्त मुलांना पुरविणेस प्रस्तावित आहे.

<u>महिला व बालकल्याण समिती ठराव क्रः-२</u> <u>दिनांक :-२५.६.२००२</u>

सुचकाचे नाव :-श्रीमती. भावना रामचंदानी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. कोमल भठिजा.

ही महिला व बालकल्याण समिती वरील प्रस्तावने अनुसार महासभेच्या अधिन राहून ६ ते ९ वर्ष वयोगटाच्या गरीब, गरजु व निराधार विद्यार्थ्यांना प्रत्त्येक बहुसंख्य प्रभागातील जागांमधील संबंधित नगरसेवकाची खात्री पटल्यावर व आयुक्त ठरवतील, लादतील अशा शर्तीस व पध्दतीस अधिन राहुन रिलायबल



या अधिकृत कंपनीचे अधिकृत दराने रेनकोट खरेदी करण्यास व उपरोक्त शालेय मुलांना पुरविण्यास मान्यता देत आहे.

तसेच वरील रेनकोट खरेदी व पुरविणे करिता अनुषंगिक कार्यवाहीची पुर्तता करणेस प्रशासनास निर्देशित करित आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजूर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
महिला व बालकल्याण समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--------------------------------------------------------------------

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.१७</u> <u>दिनांक:-१९.७.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्रीमती. नीना नाथानी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. रेखा कारीरा.

हि महासभा महिला व बालकल्याण समितीचा वर नमुद केलेला दि. २५.६.२००२रोजीचा ठराव क्र. २ अंतर्गतचा निर्णय कायम करीत आहे.

तसेच पूढील सभेकडून कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता वरील ठरावा अंर्तगतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>बहुमताने मंजुर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>विषय:-</u> उल्हासनगर महानगरपालिकेच्या निलंबित कर्मचा-यांना बिना काम वेतन देण्याऐवजी कामावर घेणे बाबत सन्माननिय सदस्य श्री. शांताराम निकम व श्री. देवेंद्रसिंग खेमाणी यांचा प्रस्ताव विचारात घेणे बाबत.

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर महापालिकेची आर्थिक स्थिती डबघाईस आलेली आहे. अशा प्रसंगी महापालिका काही कर्मचा-यांना भ्रष्टाचार, सेवा व अटींचा भंग तसेच फौजदारी स्वरूपाच्या दोषारोपात न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असल्याच्या मुद्यांवरून विना काम वेतन देत आहे.त्यामुळे महापालिकेस अशा कर्मचा-यांच्या सेवांपासून वंचित रहावे लागून सुध्दा त्यांना नियमानुसार ७५ टक्के वेतन द्यावे लागत आहे. त्यामुळे अशा कर्मचा-यांच्या वेतन व भत्त्यांचा आर्थिक बोजा महापालिकेवर विनाकारण पडत आहे.

सबब महापालिकेने विभागीय चौकशी व न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहण्याच्या अटींवर अशा निलंबित कर्मचा-यांना महापालिकेच्या सेवेत पुर्नस्थापित करून घ्यावे. त्यामुळे महापालिकेस या कर्मचा-यांच्या सेवांचा लाभ घेता येईल व विना काम द्यावा लागणा-या वेतनाचा आर्थिक बोजा कमी होईल.

तरी सदर प्रस्ताव आपण आगामी महासभेत चर्चेस घ्यावा, हि विनंती.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> <u>दिनांकः-१९.७.२००२.</u>

सुचकाचे नाव :-

अनुमोदकाचे नाव :-

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>आयत्त्यावेळचा विषय :-</u>

<u>विषयः- सन २००२-२००३साठी जकात अभिकर्ता नेमणे बाबत.</u>

<u>प्रस्तावनाः-</u>

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ (अ) अनवये जकात वसुलीचे कर्तव्य महापालिकेने स्वत: पार पाडणे किंवा अभिकर्त्यामार्फत करावयाचे असल्यास त्यासाठी महासभेला अधिकार आहेत. त्यानुसार सर्वसाधारण महासभेने ठराव क्रमांक १०, दिनांक २७.६.२००२ अन्वये खाजगी अभिकर्त्यामार्फत जकात वसुली करणेसाठीचा ठराव पारीत केला. सदर ठरावात शासनाने नगरपालिकेकरिता विनिर्दीष्ट केलेल्या अटी व शर्ती व्यतिरिक्त अतिरिक्त ३ अटी व शर्तींचा अंतर्भाव महासभेने केला होता. जकात अभिकर्ता नेमणेकरिता किमान देकार रक्कम ५७ कोटी ऐवढी ठेवण्यात आली होती.

सदर ठरावाची अंमलबजावणी करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिकेने सन २००२-२००३ करिता जकात वसुलीकामी अभिकर्ता नेमणेसाठी निविदा सूचना क्रमांक ३.७.२००२ अन्वये जाहीर निविदा विविध आठ वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदा दिनांक १५ जुलै २००२ रोजी सायंकाळी ५.०० वाजता आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांच्या दालनांत उघडणेबाबत कार्यवाही करण्यात आली. सदर वेळेस अधिकारी व निविदाधारकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द केलेल्या जाहिर निविदेला प्रतिसाद म्हणुन चार निविदा प्राप्त झाल्या होत्त्या. त्यांचा तपशिल पुढीलप्रमाणे.

१. बालाजी फॅब्रिक्स २. जयहिंद कॉंट्रॅक्टर्स प्रा. लि

३. कोनार्क इं. प्रा. लि. ४. ओमजी फायनान्स प्रा. लि.

निविदा सुचनेत जाहीर केल्याप्रमाणे प्रत्येक अभिकर्त्यांच्या लिफाफ्यातील लिफाफा क्रमांक १ सर्वासमक्ष उघडण्यात आला व निविदा सुचनेमध्ये घालुन दिलेल्या अटी व शर्तीचे सर्वा समक्ष तपासणी केली असता बालाजी फॅब्रिक्स यांच्या निविदेतील लिफाफा क्रमांक १ मध्ये मागील एक वर्षाचा अनुभव व मागील ३ वर्षाची ऑडिटेड बॅलेंस शिट या बाबीची पुर्तता होत नसल्याचे दिसून आल्याने संबधिताचा लिफाफा क्रमांक २ उघडण्यात आला नाही. तथापि उर्वरित ३ निविदाधारक यांचे लिफाफा क्रमांक १ उघडुन कागदपत्रांची तपासणी केली असता सर्व अटींची पुर्तता करीत असल्याचे दिसुन आल्याने संबंधिताचे लिफाफा क्रमांक २ उघउण्यात आला असता संबंधितांनी खालीलप्रमाणे देकार रक्कमेची बोली नमुद केल्याचे दिसुन आले.

| | | |
|---|---|---|
| १. जयहिंद कॉंट्रेक्टर्स लिमीटेड | - | रू. ५१,११,११,१११ |
| २.कोनार्क इं. प्रा. लि. | - | रू. ५४,२१,२१,१११ |
| ३. ओमजी फायनान्स कंपनी | - | रू. ५२,५५,५५,५५५ |



तथापि प्राप्त झालेल्या चार निविदांपैकी मे. कोनार्क इं. प्रा. लि. यांची निविदा अधिकतम असल्याने परंतु किमान देकार रक्कमेपेक्षा कमी असल्याने त्यांना दिनांक १६.७.२००२ रोजी पत्र देवून दिनांक १७.७.२००२ रोजी महापालिका आयुक्त, उल्हासनगर यांच्या दालनात वाटाघाटीने देकार रक्कम वाढविणेसाठी बोलविण्यात आले होते.

आयुक्तांनी सदर कंपनीच्या प्रतिनिधींना त्यांनी सादर केलेली देकार रक्कम रू. ५४,२१,२१,१११ ही महापालिकेने निश्चित केलेली देकार रक्कम ५७ कोटी यापेक्षा कमी असल्याने वाढ करणेसाठी विनंती केली असता सदर कंपनीच्या प्रतिनिधींनी जास्तीत जास्त रू. ५४. ५० कोटी एवढी देकार रक्कम देण्याचे लेखी मान्य केले. परंतु सदरची देकार रक्कमही कमी असल्याने यापुढील देकार रक्कम इतर निविदाधारकांसमवेत सिलबंद लखोटयात दिनांक १८ जुलै २००२ रोजी सादर करावी असे निर्देश ३ निविदाधारकांना देण्यात आले. त्यानुसार दिनांक १८ जुलै २००२ रोजी सिलबंद लखोटा उघडल्यावर मे कोनार्क इं. प्रा. लि. यांनी रू. ५४,५४,५४,३३३ जयहिंद कॉंट्रेक्टर्स यांनी ५२.७५ कोटी व ओमजी फायनान्स यांनी ५४.३० कोटी एवढया देकार रक्कमेची निविदा भरलयाचे दिसुन आले. सदरच्या निविदा ही महापालिकेने निर्धारित केलेली किमान देकार रक्कम ५७ कोटी रू. पेक्षा कमी असल्याने सदरची निविदा स्विकृती योग्य नाही. अशा परिस्थितीत आयुक्तांपुढे पुढील दोन पर्याय उपलब्ध आहेत.

१. महापालिकेच्या कर्मचा-यांमार्फत जकात वसुलीचे काम सुरू ठेवण्यात यावे.
२. जकात वसुली अभिकर्ता नेमणुकीसाठी फेरनिविदा काढण्यात यावी.

तथापि जकात वसुली अभिकर्ता नेमणुकीसाठी फेरनिविदा काढल्यास महासभेने सु चविलेल्या अटी व शर्तीमुळे सदरच्या निविदेस अपेक्षित रक्कम प्राप्त होईल याची खात्री देता येत नाही. तसेच महापालिकेच्या कर्मचा-यांमार्फत जकात वसुलीचे काम सुरू आहे, त्यामध्ये मागील ठेकेदारांएवढी २ जुलै ते १८ जुलै पर्यंतची सरासरी वसुली आहे. तथापि कर विभागातील कर्मचारी व इतर विभागातील कर्मचारी जकातीच्या कामासाठी वर्ग करण्यात आल्याने मालमत्ता कर वसुलीवर परिणाम झालेला आहे व मालमत्ता कर वसुलीत महापालिका कर्मचा-यांमार्फत जकातीचे काम हाती घेतल्यापासुन घट निर्माण झालेली आहे हि वस्तुस्थिती आहे. जकात वसुली आस्थापना खर्चात सुमारे वर्षाला २ कोटी भार पडणार आहे.

अशा प्राप्त परिस्थितीत फेरनिविदा जर मागवण्याचे महापालिका ठरवणार असल्यास पुर्वीच्या अटी व शर्ती नुसार मागवाव्यात की त्यामध्ये काही अटी शर्ती शिथील कराव्यात किंवा महापालिकेमार्फत जकात वसुलीचे कर्तव्य पार पाडायचे यासाठी महासभेपुढे निर्णयासाठी प्रस्तावित.

--३--

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u>     १८          <u>दिनांक:-१९.७.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. रोहडा श्यामसुंदर

अनुमोदकाचे नाव :- श्री. जमनादास पुरस्वानी.

ही महासभा वरील प्रस्ताव व सर्व परिस्थिती विचारात घेता आयुक्त देतील त्या कार्यआदेशाच्या तारखे पासून पूढील एक वर्षाच्या कालावधीसाठी जकात वसुली करणे कामी मे कोनार्क इन्फास्ट्रक्चर प्रा. लि. यांना आलेल्या निविदांनंतर वाटाघाटी अंती रू. ५४,५४,५४,३३३/- या फेर निश्चित किमान देकार रक्कमेवर जकात अभिकर्ता म्हणुन नेमणेस मान्यता देत आहे.

## कारण:-

१. जकात अभिकर्ता नेमण्यासाठी पुर्वीच्या महासभा ठराव क्र. १० दिनांक २७.६.२००२ अन्वये किमान ५७ कोटीची देकार रक्कम प्राप्त होणे शक्य नाही.

२. वरील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे दिनांक २.७.२००२ ते १८.७.२००२ पर्यंत महानगरपालिके तर्फेची जकात वसुली विचारात घेता त्यातून असे आढळते की मागील वर्षाच्या निश्चित केलेल्या किमान देकार रक्कमेपेक्षा जास्त वाढ दिसुन येत नाही आणि जकात वसुली आस्थापना खर्चात वर्षाला सुमारे २ कोटी अधिक भार पडणार आहे.

३. महानगरपालिके मार्फत ५७ कोटी एवढी जकात जमा करून देण्याची खात्री दिसून येत नाही.

४. जगभरातील आर्थिक मंदीची परिस्थिती विचारात घेता मागील देकार रक्कमेमध्ये १० टक्के वाढ धरून जी ५७ कोटी रूपये देकार रक्कम निश्चित केली आहे ती अयोग्य आहे.

५. महाराष्ट्र शासनाने दोन दिवसापूर्वी गुटख्यावर राज्यात बंदी घातली असल्याने गुटखा आयात होणार नसल्याने काही प्रमाणात जकात उत्पन्नावर परिणाम होईल.

--४--

म्हणुन वरील प्राप्त झालेल्या देकार रक्कमे प्रमाणे पुर्वीचा ठराव क्र. १० दि. २७.६.२००२ मध्ये अंशत: फेरबदल करून जकात अभिकर्त्यांसाठी किमान देकार रक्कम रू. ५४,५४,५४,३३३/- ही किमान देकार रक्कम फेर निश्चित करण्यांत येत आहे.

तसेच पूढील सभेकडून कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता वरील ठराव अंतर्गतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

प्रस्तावकाचे नांव :- श्री. राज असरोंडकर.

अनुमोदकाचे नांव :- श्री. धनंजय बोडारे.

<u>प्रस्तावनाः-</u>

महिला व बाल कल्याण समिती मार्फत राबवावयाच्या योजनांची यादी संचालक, महिला व बाल कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांनी त्यांच्या पत्र क्रमांक मबाकसं /जिपयोजना/ ता. मंजुरी/२१७/९५-९६ दि. १७/७/१९९५ अन्वये सर्व जिल्हा परिषदांना कळविली आहे. त्यापैकी काही योजना, ज्या विशेषतः ग्रामीण भागांसाठी आहेत. त्या वगळुन, शहरी भागातील नोकरदार, गरजु, निराधार, विधवा, परित्यक्त्या, अल्प उत्पन्न गटातील महिलांना स्वयंपुर्ण, निरोगी तसेच सामाजिकदृष्ट्या सुरक्षित करण्याच्या दृष्टीने, आवश्यक योजनांचा अंगिकार उल्हासनगर महापालिकेने करावा, असे वाटते. त्या योजनांची यादी पुढीलप्रमाणे आहे.

अ)प्रशिक्षणाच्या कालावधी १ वर्षापर्यंत
ब)परिचारीका, संगणक, टंकलेखन, बालवाडी
क)प्रत्येक लाभार्थीवर रू. ४०००पर्यंत खर्च

२)महिला मंडळामार्फत किंवा स्वयंसेवी संस्थामार्फत लहान मुलांना सांभाळण्यासाठी पाळणाघर चालवणे.
अ)किमान दहा मुले असावीत.
ब)आयात मानधन (प्रतिमाह कमाल ४०० रू) व मुलांच्या आहारावर (प्रतिदिन प्रत्येकी २ रूपये) यावर खर्च करावा. उर्वरित आहार पालकांनी दयावा.

३)पूरक आहार पुरवण्यासाठी उत्पादन केंद्र सुरू करणे.
अ) शेगडी, भांडी इत्त्यादी साहित्य खरेदीवर खर्च करावा.
ब) महिला मंडळ जितक्या अंगणवाडयांना आहार पुरवते, त्यासाठी प्रति अंगणवाडी रू. २००० इतके अनुदान द्यावे.

४) मुलींना जूडो, कराटेंचे प्रशिक्षण
अ) आठवडयातील किमान दोन दिवस रोज किमान एक तास प्रशिक्षण, असा किमान सहा महिन्यांचा कालावधी.
ब)प्रशिक्षकाला रू. २००० प्रतिमाह मानधन व प्रशिक्षणार्थीना गणवेशासाठी प्रत्येकी ३०० रू. खर्च करावा.

५)महिला व मुलींसाठी रोगनिदान शिबिरे घेणे.
एकूण खर्चापैकी प्रसिध्दी, पेंडॉल इ. वर १० टक्के पेक्षा जास्त खर्च नसावा व औषधावर किमान ९० टक्के खर्च असावा.

६)हुंडा निमुर्लनासाठी सामूहिक विवाह आयोजित करणे.
अ) प्रति जोडपी खर्च रू. २००० पेक्षा जास्त नसावा.
ब)किमान १० जोडप्यांचे विवाह.



७)अनाथ मुलांना दत्तक घेणा-या पालकांना प्रोत्साहन अनुदान.
अ)रू. २००० पर्यंत अनुदान दयावे.
ब)दत्तक घेण्याबददल कोर्टाचे आदेश असावेत.

८)महिलांना शिलाई मशिन पुरविणे.
अ)रू. २००० पर्यंत अनुदान दयावे.
ब)लाभार्थीचा १० टक्के हिस्सा असावा.

९)अपंग मुली व महिलांना कृत्रिम अवयव बसवणे.
अ)कृत्रिम अवयव व उपकरणांवर प्रत्येकी रू. ५००० पर्यंत खर्च करावा.
ब)लाभार्थीकडून १० टक्के हिस्सा
क)लाभार्थीचे वार्षिक आर्थिक उत्पन्न रू. २४०००/- च्या आत असावे.

१०)महिला मंडळामार्फत प्रौढ शिक्षण शिबिर घेणे.
अ)किमान १० महिलांच्या गटाला रू. १०००/- पर्यंत अनुदान.
ब)खर्च साहित्य व शिक्षणाच्या मानधनवार असावा.

११)शाळेत जाणा-या मुलींना सायकली पुरवणे.
अ)घर ते शाळा अंतर किमान २ कि. मी.
ब)प्रत्येकी रू. १५०० पर्यंत खर्च व लाभार्थींना १० टक्के हिस्सा.

उपरोक्त नमूद योजनां व्यतिरिक्त नाशिक महापालिकेच्या धर्तीवर **विशेष दिन** साजरे करता येतील व त्यादिवशी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करता येईल जसे.

| | | |
|---|---|---|
| २ ते ७ मार्च | सांस्कृतिक सप्ताह | क्रिडा स्पर्धा, सामाजिक कार्यासाठी पुरस्कार साहित्य संम्मेलन |
| ८ मार्च | जागतिक महिला दिन | साहित्य संम्मेलन |
| ३१ मार्च | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | महिलांच्या सुरक्षिततेबाबत जनजागरण |
| ७ एप्रिल | जागतिक आरोग्य दिन | |
| १४ एप्रिल | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | शिक्षण प्रसार |
| १ मे | महाराष्ट्र दिन | गुणवंत महिला कामगार पुरस्कार |
| १२ मे | जागतिक परिचारिका दिन | उत्कृष्ट परिचारिकांना पुरस्कार |
| २३ जून | राष्ट्रीय लसीकरण दिन | लसीकरण, जनजागृती आदर्श माता गौरव, व्याख्यानमाला |
| ११ जुलै | लोकसंख्या दिन | एक मुलगा - मुलगी असणा-या दांम्पत्यांचा सत्कार. |
| १ ते ७ ऑगस्ट | स्तनपान सप्ताह | स्तनपानविषयक आरोग्य शिक्षण व तपासणी शिबिर |
| १५ ऑगस्ट | स्वातंत्र्य दिन | मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम व |

| | | |
|---|---|---|
| | | क्रिडा स्पर्धा. |

--३--

| | | |
|---|---|---|
| ५ सप्टेंबर | शिक्षक दिन | घरेलू महिला कामगारांसाठी प्रशिक्षण महिला बचत गटाचे प्रशिक्षण शिक्षिकांसाठी विविध कार्यक्रम. |
| १ ते ७ सप्टेंबर | सकस आहार सप्ताह | परिसंवाद प्रदर्शन, जनजागृती झोपडपट्टी भागात 'स्वच्छ साधे घर' योजना, बक्षिस समारंभ. |
| १५ ऑक्टोबर | जागतिक अंध दिन | अंध मुले स्त्रीयांसाठी विविध कार्यक्रम |
| ९ नोव्हेंबर | कुटूंब कल्याण दिन | कुटूंब कल्याणाचे कार्यक्रम प्रचार व प्रसार. |
| १४ नोव्हेंबर | बाल दिन | मुला-मुलीकरता व्याख्यानमाला, व्यक्तिमत्त्व विकास शिबिर, बाल चित्रकला स्पर्धा. बालमहोत्सव |
| २४ डिसेंबर | भारतीय ग्राहक दिन | ग्राहक हक्कांबाबत जागृती |
| ३ जानेवारी | महिला मुक्तीदिन सावित्रीबाई फुले जयंती | पौढ महिलांना शिक्षण व प्रमाणपत्र वाटप. अंधश्रध्दा निर्मूलन. |
| २६ जानेवारी | प्रजासत्ताक दिन | विज्ञान प्रदर्शन व अन्य विविध कार्यक्रम. |
| २८ फेब्रुवारी | राष्ट्रीय विज्ञान दिन | |

नाशिक महानगरपालिका साजरे करीत असलेल्या 'विशेष दिन' व्यतिरिक्त महिला बाल कल्याण समितीस योग्य वाटतील असे इतरही 'राष्ट्रीय विशेष दिन' साजरे करता येतील व त्या दिवशी महिला, मुली, बालके यांच्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करता येईल.

त्याशिवाय राज्य शासनाच्या व केंद शासनाच्या महिला व बाल कल्याणच्या विविध योजनाचा प्रचार व प्रसार समितीला करता येईल तसेच योजनांच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने पुढाकार घेता येईल.

महिला व बाल कल्याण विभागाची उल्हासनगर महापालिकेत स्वतंत्रपणे स्थापना करता येईल व त्या विभागांतर्गत सुवर्ण जयंती योजना, संयुक्त राष्ट्रे लोकसंख्या निधी प्रकल्प व महिला व बाल कल्याणच्या राज्य, केंद्र व महापालिकेच्या योजनांचा समन्वय साधता येईल, जेणे करून सदर समितीचे कामकाज परिणामकारकपणे घडून येईल व समितीच्या स्थापनेमागचा मूळ हेतू साध्य करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर चर्चा विनिमय करण्यासाठी सर्वपक्षीय समिती नेमून चर्चा विनिमयाव्दारे प्रस्तावास अंतिम स्वरूप देवून पूढील महासभेत मंजुरीसाठी सादर करण्याबाबत व शासनाच्या मंजुरी नंतर त्याची अंमलबजावणी करण्याबाबत तसेच महिला व बालकल्याण समितीने सादर केलेला रेनकोट खरेदीचा प्रस्ताव फेटाळण्याबाबत महासभेपुढे प्रस्तावित करीत आहे.

--४--

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र. १६ अ</u> <u>दिनांकः-१९.७.२००१.</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार कार्यसूचीवरील विषय क्र. ९. गरजु निराधार विद्यार्थ्यांना रेनकोट पुरविणे कामी महिला व बालकल्याण समितीचा दि. २५.६.२००२ रोजीचा ठराव क्र. २ कायम करणे या प्रस्तावास समांतर असणा-या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देत नाही.

<u>बहुमताने मंजुर</u>

महापौर्र पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>शोक प्रस्ताव :-</u>

रिलायन्स उद्योग समुहाचे अध्यक्ष आणि जगदविख्यात उद्योगपती श्री. धीरूभाई अंबानी याचे शनिवार दि. ७. ७.२००२ रोजी रात्री ११. ५० वाजता निधन झाले.

ब्रीज कॅन्डी रूग्णालयात २३ जून रोजी दाखल करण्यात आलेले धीरूभाई बरे होवूनच घरी परततील असा विश्वास त्यांच्या कुटूंबियांबरोबरच त्यांच्या हितचिंतकांनाही होता. पंधरा दिवसापुर्वी आलेल्या अर्धांग वायुच्या झटक्यावर त्यांनी अशीच मात केल्याचा दाखला यावेळी देण्यात आला होता परंतु यावेळी मात्र काळाने सगळयांच्याच अशा वादावर मात केली त्यामुळे रविवारी सकाळी आगमन झाले ते धीरू भाईंच्या पार्थीवाचे.

तसेच उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २००२ मध्ये प्रभाग क्र.२२ क चे विद्यमान नगरसेवक श्री. होशियारसिंग लबाना यांचे वडिल श्री. हरीसिंग मुलसिंग लबाना यांचे दि. १७.७.२००२ रोजी निधन झाले.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्त्म्याच्या आत्त्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> १० अ <u>दिनांकः-१९.७.२००२</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. शांताराम निकम.

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. धीरूभाई अंबानी व श्री. हरिसिंग मुलसिंग लबाना यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

## सर्वानुमते

महापौर्र पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

**अभिनंदन प्रस्ताव :-**

भारताच्या क्षेपणास्त्र प्रगतीत मोठा सहभाग असलेले, असामान्य बुध्दीचे वैज्ञानिक, सामान्य राहणीमान व उच्च विचारसरणीचे तसेच भारताला सर्वच क्षेत्रांत अग्रेसर बनविण्याचे स्वप्न उराशी बाळगणारे ए.पी. जे. अब्दुल कलाम यांची दि. १८.७. २००२ रोजी भारताचे १२ वे राष्ट्रपती म्हणून प्रचंड मतांनी निवड झाली. डाव्या आघाडीच्या पाठिंब्यावर उभ्या असलेल्या कॅप्टन लक्ष्मी सेहगल यांचा त्यांनी ९,२२,८८४ विरूध्द १,०७,३६६ मतांनी पराभव केला.

कलाम यांना ४,१५२ तर सेहगल यांना ४५९ मते मिळाली. या मतांचे मूल्य अनुक्रमे ९,२२,८८४ व १,०७,३६६ एवढे होते.

राष्ट्रपतीपदाच्या निवडणूकीत ४७८५ खासदार व आमदारांनी मतदान केले. त्यापैकी १७४ मते अवैध ठरली. सुमारे तीन तास चाललेल्या मतमोजणीनंतर राज्यसभेचे सेक्रेटरी जनरल आर.सी. त्रिपाठी यांनी डॉ. कलाम यांच्या विजयाची घोषणा केली. आर.सी. त्रिपाठी हेच निर्वाचन अधिकारी म्हणून काम पाहात होते.

श्री. ए. पी. जे. अब्दुल कलाम हे भारताचे बारावे राष्ट्रपती म्हणुन निवडुन आलेले आहेत, ठाणे जिल्हयाचे खासदार श्री. प्रकाश परांजपे, उल्हासनगरचे आमदार श्री. पप्पु कालानी व आमच्या सभागृहातील सर्व राजकीय पक्षांतर्फे त्यांचे अभिनंदन करण्याचे प्रस्तावित आहे.

**सर्वसाधारण महासभा ठराव क्र. १० ब दिनांक:-१९.७.२००२**

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. नथु सोनावणे.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार भारताचे बारावे राष्ट्रपती म्हणून निवडून आलेले श्री. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे अभिनंदन करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

## सर्वानुमते

महापौर्र पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

**अभिनंदन प्रस्ताव :-**

गुटख्यामुळे हजारो तरूणांना कर्करोगाची लागण झाली आहे तर काही या गुटखा नियमित सेवनामुळे नपुसंक होण्याची शक्यता निर्माण झाली होती. याशिवाय गुटखा निर्मितीसाठी हजारो वृक्षांची होणारी अमर्याद वृक्षतोड यामुळे नैसर्गिक समतोलही ढासळत होता . या बाबींचा विचार करून राज्य मंत्रीमंडळाने ऐतिहासिक निर्णय घेत गुटखा व पान मसाला यांच्यापासुन दरवर्षी २५ कोटी रू. मिळणा-या महसुलावर लाथ मारून राज्यातील युवा पिढीला व्यसनाधीनतेपासुन वाचविण्यासाठी येत्त्या लोकमान्य टिळक पुण्यतिथीपासून म्हणजेच दि. १ ऑगस्ट २००२ पासुन पुढील पाच वर्ष संपुर्ण महाराष्ट्रभर गुटखा व पानमसाला यांच्या उत्त्पादनावर व विक्रीवर बंदी घालण्याचा महत्त्वपुर्ण निर्णय राज्य मंत्रिमंडळात मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी घेतला.

मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी अतिशय महत्त्वपुर्ण असा निर्णय घेतला आहे. त्यासाठी सुध्दा ठाणे जिल्हयाचे खासदार श्री. प्रकाश परांजपे, उल्हासनगरचे आमचे आमदार श्री. पप्पु कालानी, उल्हासनगर महानगरपालिकेतील सर्व राजकीय पक्ष यांचेवतीने मा. मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांचे अभिनंदन करण्याचे प्रस्तावित आहे.

**सर्वसाधारण महासभा ठराव क्र. १० क दिनांकः-१९.७.२००२**

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी राज्यात पाच वर्षासाठी गुटख्यावर आणलेल्या बंदी बाबत त्यांचे अभिनंदन करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

**सर्वानुमते**

महापौर/ पिठासिन अधिकारी<br>
सर्वसाधारण महासभा<br>
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

**शोक प्रस्ताव :-**

उल्हासनगर महानगरपालिकेचे नगरसेवक श्री.राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर यांच्या वडीलांचे श्री. विरसिंह भुल्लर यांचे नुकतेच निधन झाले.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्त्म्यास चिरशांती लाभावी अशी

प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ११ अ <u>दिनांक:-५.८.२००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. बच्चाराम रूपचंदानी.

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. विरसिंह भुल्लर यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>सर्वानुमते</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>शोक प्रस्ताव :-</u>

उल्हासनगर महानगरपालिकेत लिपिक या पदावर असलेले श्री. तानाजी पतंगराव यांच्या बंधुचे श्री. यांचे दि. रोजी निधन झाले.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.११ ब</u> <u>दिनांक:-५.८.२००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. बच्चाराम रूपचंदानी.

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>सर्वानुमते</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>शोक प्रस्ताव :-</u>

भारताचे उपराष्ट्रपती श्री. कृष्णकांत करूणानिधी यांचे नुकतेच निधन झाले.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ११ क <u>दिनांकः-५ ८ २००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. बच्चाराम रूपचंदानी.

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार भारताचे उपराष्ट्रपती श्री. कृष्णकांत करूणानिधी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>सर्वानुमते</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>शोक प्रस्ताव :-</u>

भारताचे जेष्ठ संगितकार श्री. सुधीर फडके यांचे नुकतेच निधन झाले.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी

प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ११ ड <u>दिनांकः-५.८.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. बच्चाराम रूपचंदानी.

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार भारताचे जेष्ठ संगितकार श्री. सुधीर फडके यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>सर्वानुमते</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>विषयः-</u> उल्हासनगर महानगरपालिका नागरी क्षेत्रासाठी वृक्ष प्राधिकरण स्थापन करणे बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडाचे जतन अधिनियम १९७५ अन्वये नागरी क्षेत्रातील झाडाचे जतन करण्यासाठी क्षेत्रात समुचित प्रमाणात नविन झाडे लावणेची तरतुद करणे व त्यांच्याशी संबंधित बाबींची तरतुद करणे यासाठी शासनाने अधिनियम तयार केलेले आहेत.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. जी. ईएन-१५८६/४७/सीआर/२६/९६-युडी-२४ दिनांक २१.१०.१९९६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसूचनेनुसार उल्हासनगर नगरपालिकेचे रूपांतर महानगरपालिकेत झालेले आहे. महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे जतन अधिनियम १९७५ चे कलम २ (फ) अन्वये उल्हासनगर महानगरपालिका नागरी क्षेत्र म्हणुन संबोधणेत येते.

उल्हासनगर महानगरपालिकेव्दारे नागरी क्षेत्रातील झाडांचे जतन करण्यासाठी त्याक्षेत्राचे समुचित प्रमाणात झाडे लावण्यासाठी व त्याच्याशी संबंधित बाबींची तरतूद करण्यासाठी व झाडे तोडण्यासाठी नियमन करून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी ''वृक्ष प्राधिकरण'' स्थापन करणे आवश्यक आहे. ''वृक्ष प्राधिकरण'' स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे जतन अधिनियम १९७५ चे कलम ३ (१) मध्ये नागरी स्थानिक प्राधिकरणाने ''वृक्ष प्राधिकरण'' स्थापन करण्याची तरतुद आहे.

नागरी स्थानिक प्राधिकरणाने ''वृक्ष प्राधिकरणासाठी त्या प्राधिकरणातील आपलया सदस्यांमधून कमीत-मी पाच व जास्तीत जास्त १५ व्यक्तीचे मिळून वृक्ष प्राधिकरणाची रचना केली पाहिजे व महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) अधिनियम १९७५ चे कलम ३ (२) अन्वये महानगरपालिका क्षेत्रांसाठी ''वृक्ष प्राधिकरणाचा सभापती म्हणून मा. आयुक्त, हे असतील.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडाचे जतन अधिनियम १९७५ चे प्रकरण ३ कलम ५ (१) अन्वये कोणत्त्याही नागरी क्षेत्रात हा अधिनियम अंमलात आणल्यानंतर शक्य तितक्या लवकर पोट कलम (२) च्या अधिन राहून एका अधिका-याची या अधिनियमाच्या प्रयोजनासाइी (वृक्ष अधिकारी) म्हणून नेमणुक केली पाहिजे. उक्त नियम व कलमान्वये शहर अभियंता, यांची वृक्ष अधिकारी म्हणुन नेमणुक करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

तसेच उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात झाडाचे जतन करण्यासाठी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ अन्वये ''वृक्ष प्राधिकरणाची'' स्थापना करणेसाठी सदर प्रस्ताव महासभेसमोर प्रस्तावित करणेत येत आहे.

--२--

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> २० <u>दिनांकः-३१.८.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी.

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर महानगरपालिका नागरी क्षेत्रासाठी खालील प्रमाणे वृक्ष प्राधिकरणाची स्थापना करित आहे.

| | | |
|---|---|---|
| | आयुक्त<br>उल्हासनगर महानगरपालिका | सभापती |
| १. | श्री. मोहन साधवानी | सदस्य |
| २. | श्री. विनोद ठाकुर | --''-- |
| ३. | श्री. वनवारी किशोर | --''-- |
| ४. | श्री. पंजाबी नारायण | --''-- |
| ५. | श्रीमती. दासानी मिनु | --''-- |
| ६. | श्री. खेमाणी दर्शनसिंग | --''-- |
| ७. | श्री. पवार नाना | --''-- |
| ८. | श्री. ठाकुर नरेंदकुमार | --''-- |
| ९. | श्री. वदरीया राजेश | --''-- |
| १०. | श्री. टाले प्रमोद | --''-- |
| ११. | श्री. चव्हाण रमेश | --''-- |
| १२. | श्री. पाटील विश्वनाथ | --''-- |
| १३. | श्री. पंजाबी लाल | --''-- |
| १४. | श्री. पुरस्वानी जमनु | --''-- |
| १५. | श्री. वेहरानी ठाकुर | --''-- |

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- विशेष नियोजन प्राधिकरणाने तयार केलेल्या सुधारीत प्रारूप विकास योजनेची कार्यवाही पुर्णतः रदबादलचा प्रस्ताव शासनास शिफारस करणे बाबत.

प्रस्तावनाः-

शहराची ऐतिहासिक स्थिती :-

स्वातंत्र्यपूर्व काळात सन १९४२ मध्ये भारत सरकारने लष्करी सैनिकांच्या वसाहतीसाठी सुरक्षित व योग्य ठिकाण म्हणून उल्हासनगरची निवड करून वसाहतीसाठी १२०० हेक्टर जमीन संपादीत केली. सदर जमिनीचा विकास करून त्यामध्ये ११७३ बॅरेक्स बांधुन सुमारे ६००० सैनिकांना राहण्यासाठी देण्यात आले सन १९४७ मध्ये हिंदुस्थानची फाळणी होऊन भारत व पाकिस्थान ही दोन राष्ट्रे निर्माण झाली या फाळणीमुळे सिंधप्रांतातून निर्वासिताचे लोंढे भारतात येऊ लागले तर निर्वासिताचे पुर्नवसन ११७३ बॅरेक्सचाच संक्रमण छावण्या म्हणून उपयोग करून सुमारे ९४.४०० निर्वासितांची व्यवस्था उल्हासनगरमध्ये केली होती.

शहराची भौगोलिक स्थिती :-

भौगोलिकदृष्टया उल्हासनगर हे १० अंश व १४ अंश उत्तर अक्षांश व ७३ अंश ८ अंश पुर्व रेखांशमध्ये येते. शहराची उत्तर दक्षिण लांबी ७ कि. मी. असून पूर्व पश्चिम लांबी ३ कि. मी. आहे.

प्रारूप सुधारीत विकास योजना रदद करण्याची कारणे :-
१) विकास योजनेबाबत माहिती :-

भारत सरकारने एप्रिल, १९४८ च्या सुमारास उल्हासनगर शहरातील सैनिकांसाठी बांधलेल्या छावण्यामध्ये निर्वासितांचे पुर्नवसन करून त्यांना उपजिविकेसाठी लागणा-या सोयी सुविधा पुरविल्या. दरम्यानच्या कालावधीमध्ये मुंबई शहरामध्ये औद्योगिक विकास झपाटयाने होत होता. सदर विकासावर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने निर्बंध घातल्यामुळे तसेच मुंबईची लोकसंख्या झपाटयाने वाढत असल्यामुळे मुंबईतील जागेची किंमती भरमसाठ वाढल्या त्याचा एकंदरीत परिणाम म्हणुन उद्योजकाचे व मध्यम वर्गीयांचे लक्ष मुंबईतील उपनगराकडे वळले. तसेच उल्हासनगर हे मुंबई महानगरपासून जवळ असल्यामुळे तसेच शहरातून जाणारे कल्याण-बदलापूर, कल्याण-मूरबाड महामार्ग व मध्य रेल्वेच्या मुंबई-पुणे मार्गावर विठ्ठलवाडी व उल्हासनगर ही रेल्वे स्थानके मध्यवर्ती ठिकाणी असल्यामुळे दळणवळणास सोयीचे ठिकाण म्हणुन उद्योजक व मध्यमवर्गीयांचा लोंढा उल्हासनगरकडे वळला. त्यानुसार १९५३-५४च्या दरम्यान अमर डायकेम, इंडियन डायस्टक व मे सेंच्युरी रेयॉन सारख्या कंपन्या उल्हासनगर मध्ये उभारण्यात गेल्या त्यामुळे शहराची लोकसंख्या झपाटयाने वाढू लागली.



उल्हासनगर महापालिकेची स्थापना १९६० मध्ये करण्यात आली. उल्हासनगर शहरासाठी शासनातर्फे सन १९७४ मध्ये विकास योजना तयार करून प्रसिध्द करण्यात आली प्राधिकरणाचा दर्जा देणे योग्य आहे. जेणेकरून स्थानिक स्वराज्य संस्था लोकांचा विकास व शहराचा वस्तुस्थितीचा विचार करून योग्य ते विकास

आराखडा तयार करून प्रसिध्द करेल. तरी वरील प्रमाणे शासनाचा प्रस्ताव सादर करणेसाठी शिफारस करण्यात येत आहे.

तसेच या अधिसूचित क्षेत्रांतर्गत येणा-या सर्व नगरपालिकांमधील नागरीकांच्या मुलभूत नागरी गरजा पुरविण्याच्या दृष्टीन तसेच राहणीमानाची समपातळी प्रस्थापीत करण्याच्या उददेशाने लोकसंख्या व क्षेत्रात्त्मक दृष्टया उल्हासनगर परिसरासाठी तळनिर्देशांक हा किमान ३ तरी असणे आवश्यक वाटते.

३) या अधिसूचित क्षेत्रांतर्गत केलेल्या १९९१ च्या सर्वेक्षणानुसार उल्हासनगर महानगरपालिका मधील लोकसंख्येची स्थुल घनता ही २७७ प्रति हेक्टर दिसून येते त्याच बरोबर हेक्टरी २७७ या घनतेस प्रारूप विकास योजनेतील मानकाप्रमाणे या अधिसुचित क्षेत्रातील सर्वोच्च घनता असे संबोधले जाते या वरून उल्हासनगर शहर हे अतिशय दाट लोकवस्तीचे शहर असल्याचे दिसून येते.

४) उल्हासनगरमधील अपु-या घरबांधणीचाच परिणाम म्हणून १९९७ च्या सर्वेक्षणनुसार उल्हासनगरमध्ये असलेल्या १०५ झोपडपटटयांमध्ये ३,३७,००० एवढे लोक राहत असल्याचे आढळून आले तथापि ही लोकसंख्या १०९१ च्या जनगणनेच्या अगदी जवळपास आढळून येते यावरून उल्हासनगर मध्ये होणारी झोपडपटटया सुध्दा दाट वस्तीची निर्मितीची कल्पना येते.

५) १९९१ च्या सर्वेक्षणानुसार उल्हासनगर शहरातील ९७ टक्के क्षेत्र विकसीत आहे तर सन २०१६ ची लोकसंख्या विचारात घेता त्यांच्या सुखसोईच्या दृष्टीने शहारात जागा शिल्लक नसल्याने प्रकर्षाने जाणवते व यावर उपाय म्हणुन उंच इमारतीचे बांधकाम हे शहरातील तळनिर्देशांक (एफ. एस. आय) वाढवून करणे अपरिहार्य ठरते.

६) वरील सर्व बाबींचा विचार करता उल्हासनगर शहर हे दाट वस्तीच्या क्षेत्रात मोडत असल्याचे दिसुन येते. तरी प्रारूप सुधारित विकास नियोजन नियमावलीमध्ये वरील बाबीचा विचार करून व उल्हासनगर महानगरपालिका हददीतील बॅरेक, ब्लॉक याची हदद / आकार मर्यादित असल्यामुळे या भागावरिल सामाजिक अंतरे, इमारतीची उंची, तसेच चटई क्षेत्र निर्देशांक इ. बाबत वेगळा निकष लावून वस्तूस्थितीचा विचार करून प्रारूप सुधारित विकास नियंत्रण नियमावली तयार करणेसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करणे गरजेचे आहे.

७) या अधिसुचित क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरणाने सन २०१६ पर्यंत विचारात घेतलेली लोकसंख्या प्रस्तावीत क्षेत्र त्याच बरोबर रहिवास वापरासाठी आवश्यक असलेल्या क्षेत्रांचा तुलनात्त्मक तक्ता पुढील पानावर जोडलेला आहे.



तरी वरील सर्व बाबींचा विचार करता विद्यमान स्वरूपात उल्हासनगर शहराचे एकुण क्षेत्र सुमारे १३०० हेक्टर असल्याने नागरी सुविधा पुरविणे आणि रहिवास वापराचे नियोजन करून नियोजनबध्द विकास करणे तुटपुंज्या क्षेत्रात शक्य नसल्याने उल्हासनगर शहराची / महानगरपालिकेची हदद वाढ करून खालील गावांचा समावेश झाल्यानंतर एकत्रितरित्त्या सुधारित (वाढीव क्षेत्रासह) विकास योजना तयार करण्याचे काम हाती घेतल्यास या शहराची समस्या कायम स्वरूपी मार्गी लागण्याची शक्यता आहे.

उल्हासनगर शहराच्या हददीमध्ये वाढ करून समावेश करावयाचा गावाचा तपशिल

| मौजे | सन १९९१ च्या | क्षेत्र हेक्टरमध्ये (वाढीव |
|---|---|---|

| | जनगणनेनुसार | हदद) |
|---|---|---|
| १ म्हारळ (भाग) | ९६६० | १८९.५९ |
| २. वरप | १०५६ | १८८.३५ |
| ३. कांबे | ३४४० | ७३५.३८ |
| ४ ज़ावसई (भाग) | १२०० | २५०.०० |
| ५आणे | ०४४५ | २८८.३५ |
| ६. नाळंबी | ०४१५ | ३३९.१२ |
| ७. भिसोळ | ०७४६ | १३८.५४ |
| | १७,८२४ | २१२३.३३ |

तरी विद्यमान क्षेत्र १३०० व वाढीव गावांचे क्षेत्र २१२३.३३ हे असे एकूण सुमारे ३४२३.३३ हे या क्षेत्राचा विचार करून नियोजनबध्द विकास करण्यासाठी शासन स्थरावर फेरविचार करून धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. विशेष नियोजन प्राधिकरणाने तुटपुंज्या क्षेत्रासाठी दि. १०.५.२००१ रोजी प्रारूप स्वरूपात प्रसिध्द केलेली विकास आराखडा योजना रदद करणेसाठी शासन स्थरावर आदेश होणेस प्रस्ताव शासनास पाठविण्यापुर्वी महासभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे. म्हणुन सदर विषय महासभेपुढे मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

--४--

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> २१ <u>दिनांक:-३१.८.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. हरदास माखिजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

ही महासभा वरील प्रस्तावाप्रमाणे या ठरावाव्दारे उल्हासनगर शहराच्या अधिसुचनेत विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यांनी दिनांक १०.५.२००१ रोजी प्रसिध्द केलेल्या सुधारित प्रारूप विकास योजनेची कार्यवाही पुर्णत: रदद बादल करणे कामी शासनास शिफारस करित आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>बहुमताने</u>

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- विकास नियंत्रण कामी छाननी शुल्क, विकास शुल्क, छज्जा अधिमूल्य, जीना अधिमुल्य, इत्त्यादीचे निश्चितीबाबत व शहरातील विद्यमान अनाधिकृत बांधकामे नियमित करणे कामी प्रस्ताव, शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहून मान्य करणे बाबत.

प्रस्तावनाः-

शहर विकास-विकास प्रस्ताव विभागामध्ये सध्या विकास प्रस्तावासाठी विकास नियंत्रण नियमावली व नगर रचना अधिनियम यांच्या तरतुदीनुसार जे अधिमुल्य वा शुल्क वसूल करण्यांत येते त्याचे दर हे सन १९९४-९५ मध्ये ठरविण्यात आले होते. त्यांनतर त्यात सुधारणा झालेली नसल्यामुळे ते सुधारित करणे आवश्यक आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे सुधारित दराने आकारणीची शिफारस करण्यात येते.

१. अ)छाननी शुल्क (वापर, बदल, एकत्रीकरण, विभाजन, अभिन्यास)

| | |
|---|---|
| १. रू. १०००/- रहिवास व वाणिज्य वापरासाठी २५० चौ. मी. पर्यंत, त्यापेक्षा जास्त क्षेत्रास रू. ४/- चौ.मी. | ३००० चौ.मी. ला १५०/- रू. या ऐवजी |
| २. १००० चौ.मी. पर्यंत औद्योगिक वापरासाठी रू. २५००/- त्यापेक्षा जास्त क्षेत्रास रू. ४/- प्रती चौ.मी. | ३००० चौ.मी. ला १५०/- रू. या ऐवजी |

ब)छाननी शुल्क (टी. डी. आर, डी. आर. सी. ट्रान्सफर, युटीलायझेशन)

| | |
|---|---|
| रू. ५/- चौ.मी. | सद्यस्थितीत दर लागु नाहीत. |

२) इमारत परवाना छाननी शुल्क :-

| | |
|---|---|
| निवासी रू. ५/- प्र. चौ.मी. | २ रू. प्रति चौ.मी. या ऐवजी |
| रू. १०/- चौ.मी. व्यापारी व औद्योगिक वापर | ४ रू. प्रति चौ.मी या ऐवजी |

३)नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था याकरिता छाननी शुल्कः-

| | |
|---|---|
| नविन प्रस्तावित फीच्या ५० टक्के एवढी फी कमीत कमी रू. २०००/- | कमीत कमी १०० रूपये आणि जास्तीत जास्त २५०० रूपये या ऐवजी |

४) वैद्यकीय, शैक्षणिक व धर्मदाय संस्था यांच्याकरिता छाननी शुल्क

| | |
|---|---|
| प्रस्तावित मूळ दराच्या २५ टक्के एवढे शुल्क कमीत कमी रू. १०००/- | कमीत कमी १०० रूपये जास्तीत जास्त २५०० रूपये या ऐवजी |

५)कुंपण, उपसा टाकी, पंप हाऊस, गॅरेज व विद्युत पुरवठा उपस्थानक करिता शुल्क :-

| | |
|---|---|
| रू. ५००/-प्रती प्रस्तावासाठी | कंपाऊंड भिंतीसाठी कमीत कमी १० रू. या ऐवजी |

६)सुधारीत नकाशाचे फी बाबत.

| | |
|---|---|
| अ)रू. ५००/- चटई क्षेत्रात वाढ होत नसल्यास | कमीत कमी १०० रूपये या ऐवजी |
| ब)अ.क्र. २ प्रमाणे चटई क्षेत्रात वाढ होत असल्यास वाढीव क्षेत्रासाठी परंतु कमीत कमी | सद्यस्थितीत लागू नाही. |

कमी रू. ५००/-

७)पुर्नमंजुरीबाबत (नुतनीकरणाबाबत) फी :- १०० रू. प्रतिमाह या ऐवजी

| रहिवास उपयोगासाठी | बिगर रहिवासी |
|---|---|
| अ)मुदत संपल्यानंतर एक महिन्यापर्यंत अर्ज आल्यास रू. ५००/- | मुदत संपल्यानंतर एक महिन्यापर्यंत अर्ज आल्यास रू. १०००/- |
| ब) एक महिन्यानंतर अर्ज आल्यास एक महिनापर्यंत रू. ५००/- तदनंती रू. २००/- प्रती महिना | एक महिन्यानंतर अर्ज आल्यास एक महिनापर्यंत रू. १०००/- तदनंतर रू. ५००/- प्रती महिना |

८. विकास शुल्क :-

| | |
|---|---|
| ग्रामीण भागातील २५००चौ.मी. खालील भूखंडावर | इतर भागात ५०० चौ.मी पेक्षा जास्त क्षेत्राचे भूखंड |
| जमिनीसाठी रु. २०/- प्रति चौ.मी. | रु४०/-प्रति चौ.मी |
| निवासी रु. ४० प्रति चौ.मी. | रु. ६०/- प्रति चौ.मी |
| औद्योगिक रु. ६० प्रति चौ.मी. | रु. ९०/- प्रति चौ.मी. |
| व्यापारी रु. ८०/- प्रति चौ.मी. | रु. १२०/- प्रति चौ.मी. |

९. छज्जा अधिमूल्य रु :-

रु. ३०००/- ५.०० चौ.मी. पर्यंत व पुढील प्रत्त्येक २५ चौ.मी.ला रु. १५००/- रु. ६०००/- ५.०० चौ.मी. पर्यंत व पुढील २५ चौ.मी.ला रु. ३०००/- अनाधिकृतरित्त्या बंदिस्त केलेल्या आढळल्यास वरील दराच्या दुप्पट दरात अधिमूल्य लावण्यात येईल.

१०. जिना अधिमूल्य :- | सद्यस्थितीत लागू नाही.

सदरचे अधिमूल्य हे सज्जा अधिमूल्याच्या दराप्रमाणे करण्यांत येत आहे. रु. २०००/- ५ चौ.मी. पर्यंत व पुढील प्रत्त्येक २५चौ.मी. ला रु. १०००/-रहिवास क्षेत्रासाठी वरीलप्रमाणे.

औद्योगिक व व्यापारी वापरासाठी रू. ६०००/- ५ चौ.मी. पर्यंत व पुढील प्रत्त्येक २५ चौ.मी. ला रू. ३०००/-

११)औद्योगिक जमिनीचा वापर बदलाबाबत अधिमुल्य

--३--

रू. १०,०००/- प्रति प्रस्तावास सद्यस्थितीत लागू नाही.

१२)औद्योगिक ना हरकत प्रमाणपत्र अधिमुल्य

रू. २०००/- प्रत्त्येक युनिट २०००रू. प्रति १० अश्वशक्ती एच.पी. या ऐवजी

१३)(किफायतशीर / वापरापोटी अधिमुल्य)

रू. १५०/-प्रति चौ.मी. हॉटेलसाठी

रू. १००/- प्रति चौ.मी. नर्सिंग होम डिस्पेन्सरी, क्लिनिक इत्त्यादी साठी.

रू. १००/- प्रति चौ.मी. पेट्रोल पंपासाठी

रू. २० प्रति चौ.मी. आसनास सिनेमागृहासाठी

रू.२०००/- प्रति युनिट पिठाची चक्की

१४) सदर पाच संस्थासाठी (कॅम्प) खालील प्रमाणे अधिमुल्य आकारावे.

आर-१ विभाग अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक १ साठी खालीलप्रमाणे विभागांनिहाय दर लागु होतील.

| मुल्य विभाग | अधिमुल्य दर प्रति चौ.मी. |
|---|---|
| कॅम्प -१ | रू. ३०००/- |
| कॅम्प - २ | रू. ५०००/- |
| कॅम्प -३ | रू५०००/- |
| कॅम्प -४ | रू. ३०००/- |
| कॅम्प - ५ | रू. ३०००/- |

आर-२ विभाग - वाणिज्य व औद्योगिक विभाग
यासाठी अनुक्रमे वरील दराच्या दीडपट, दुप्पट व दीडपट दर लागु होईल. तसेच अ चटई क्षेत्र निर्देशांक १ पेक्षा जास्त असल्यास त्या प्रमाणांत वाढीव दर लागू होईल.

१५)पार्कींग तरतुदीबाबत सूट देण्याच्या सद्यस्थितीत लागू नाही.

प्रकरणांत अधिमुल्य
बाजारमुल्याप्रमाणे सवलत दिलेल्या पार्कींग क्षेत्रावर बाजारमूल्य वर दिलेल्या अ. क्र. १४ प्रमाणे.

१६) परवानगी अनामत :-
रू.१०/- प्रति चौ.मी.

१७)तळघर अनामत (ना परतीचे):-
अनुक्रमांक १४ च्या दराप्रमाणे
१८)अस्तित्त्वांतील तोडक्याची दर्शविण्यांत सद्यस्थितीत लागू नाही
आलेल्या बांधकामाबाबतची अनामत
रू. १०/- प्रति चौ.मी. ला व (कमीत कमी रू. २०००/- व जास्तीत जास्त रू. १,००,००० रजि. को. ऑप. हौ. सोसायटी करिता ५० टक्के)
१९) नकाशाच्या सत्त्य प्रतिबाबत शुल्क प्रति प्रतीस १०० रूपये ऐवजी
(साक्षांकीत प्रती):-
अर्जदाराने नकाशाची झेरॉक्स प्रत सादर केल्यास प्रति प्रतीस रू. १५०/-
२०) ब्रिज चार्जेसबाबत अनामत (रस्त्यावर बिल्डींग मटेरीयल व ठेवण्यासाठी अनामत):-



र. १०/- प्रति चौ.मी. मूल्यदर कॅम्प निहाय मूल्यदर — रहिवास वापरासाठी २५ रू. चौ.मी. प्रति आठवडा, रहिवासाशिवाय ५० रू. प्रति चौ. मी. प्रति आठवडा

| | | |
|---|---|---|
| मूल्य दर | कॅम्प १) रू. ५०००/- | कॅम्प २)रू.१०,०००/- |
| कॅम्प निहाय | कॅम्प ३) रू. १००००/- | कॅम्प ४) रू. ५,०००/- |
| | कॅम्प ५) रू. ५०००/- | |

२१) तात्त्पुरत्त्या बांधकामाबाबत शुल्क सद्यस्थितीत लागू नाही.
रू.१००/- प्रति १० चौ.मी. व त्यावरील प्रत्त्येक १० चौ.मी. अथवा भागाता रू. ५०/- -६ महिन्यांकरिता त्याकरिता पुन्हा शुल्क रू. १००/- रहिवास वापर रू. ५००/- प्रति १० चौ.मी. व त्यापुढील प्रत्त्येक १० चौ.मी. ला रू. २५०/- ला रू. २५०/- ६ महिन्यांकरिता त्यांनतर पुन्हा शुल्क १००/- बिगर रहिवास वापरासाठी.
२२) तात्त्पुरते स्ट्रक्चर काढण्याचे अनामत रक्कम :- सद्यस्थितीत लागू नाही.
३० चौ.मी. पर्यंत रू. ५०/- प्रति चौ.मी
३० चौ.मी. च्यावर रू. १००/- प्रति चौ.मी.
२३) नस्ती तपासणी फी विकास प्रस्ताव
नस्ती पत्रव्यवहार बाजु सद्यस्थितीत लागू नाही.
रू. ५०/- प्रती प्रकरण.
२४)विकास परवाना प्रारंभ प्रमाणपत्र इत्त्यादीच्या
प्रमाणीत प्रतिसाठी १०० /-रू. प्रत्त्येक प्रतीसाठी या ऐवजी.
२५)अनाधिकृत बांधकाम व वापराबाबत
शुल्क / पुन्हा क्षमापन शुल्कः- सद्यस्थितीत लागू नाही.

१) ज्या प्रकरणात विकास / बांधकाम परवानगी घेतलेली नाही. आणि महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ खाली नोटीस दिल्यानंतर

कोणताही प्रतिसाद संबंधितांकडुन दिला गेलेला नाही. अशा बाबतीत पुन्हा क्षमापित करता येणार नाही. त्यामुळे बांधकाम पाडून टाकण्याची कार्यवाही करावी.

२)गुन्हा क्षमापन शुल्काचे परिमाण :- सद्यस्थितीत लागू नाही.

| | |
|---|---|
| १)ज्या प्रकरणात विकास / बांधकाम परवानगी घेतलेली नाही. परंतु नगर रचना अधिनियमाच्या कलम ५३ खाली दिलेल्या नोटीसीच्या संदर्भात विहित मुदतीत नकाशे दाखल केलेले आहेत व केलेले काम विकास नियंत्रण नियमावलीनुसार नियमानुकूल आहे. | जमिनीच्या मुल्याच्या २० टक्के तर अधिक बांधकामाच्या मुल्याच्या ५ टक्के या व्यतिरिक्त परवानगी अनामत रक्कमेतील १०टक्के रक्कम जप्त करण्यांत येईल. |
| २)ज्या प्रकरणांत विकास / बांधकाम परवानगी घेतली पण त्यापेक्षा जास्त बांधकाम केले आहे व असे जास्त केलेले बांधकाम नियमानुकूल आहे. | लागू नाही. |



| | |
|---|---|
| अ) ज्या प्रकरणी विकास /बांधकाम परवानगी घेतली परंतु प्रारंभ प्रमाणपत्र न घेता काम केलेले आहे. व केलेले काम बांधकाम परवानगी नुसारच आहे. | जमिनीच्या मूल्याच्या १० टक्के अधिक बांधकाम मूल्याच्या ५ टक्के (बांधकाम मूल्याच्या म्हणजे बांधकाम असलेल्या मिळकतीच्या मुल्याच्या ) या व्यतिरिक्त परवानगी अनामत रक्कमेतील १०० टक्के रक्कम जप्त करण्यांत येईल. |
| ब)ज्या प्रकरणात प्रारंभ प्रमाणपत्र घेतले आहे. परंतु जोत्त्याचे प्रमाणपत्र न घेता केलेले काम बांधकाम परवानगी नुसारच आहे. | जमिनीच्या मूल्याच्या १० टक्के अधिक बांधकाम मूल्याच्या २ टक्के या व्यतिरिक्त परवानगी अनामत रक्कमेतील १०० टक्के रक्कम जप्त करण्यात येईल. |
| क)ज्या प्रकरणात प्रारंभ प्रमाणपत्र व जोत्त्याचे प्रमाणपत्र घेतले आहे. परंतु वापर परवाना न घेता वापर चालू केलेला आहे व केलेले काम बांधकाम परवानगी नुसार असून वापर परवाना देण्यायोग्य आहे. | जमिनीच्या मुल्याच्या २ टक्के अधिक बांधकाम मुल्याच्या २ टक्के या व्यतिरिक्त परवानगी अनामत रक्कमेतील १०० टक्के रक्कम जप्त करण्यात येईल. |

टिप :-

१) परवानगी न घेता करण्यांत आलेली बांधकामे जर विकास नियंत्रण नियावलीतीलतरतुदी नुसार असतील तर एम.आर.टी.पी. कलम ५३ नुसार बांधकामे नियमित करताना एम.आर.टी.पी कलम १४३ नुसार गुन्हा क्षमापित करण्यांकरिता आकरण्यात येणारे शुल्क

२)वरील अ,ब,क,ड मध्ये मूल्यांकनासाठी जमिनीचे क्षेत्र विना परवानगी केलेल्या बांधकामाचे क्षेत्र व अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक विचारात घेऊन होणारे समानुपती क्षेत्राइतके गृहित धरणे आवश्यक राहील.

| | |
|---|---|
| ३)नोटीस दिल्यानंतर काम चालू ठेवले तर जोपर्यंत ते चालू आहे. तोपर्यंत प्रतिदिनी रक्कम रू. २०००/- या प्रमाणे दंड आकरण्यांत यावा. | लागू नाही. |

४)संबंधित प्रकरणांत जमीन व बांधकाम क्षेत्राचे मूल्यांकन नगर रचनाकार उल्हासनगर महानगरपालिका यांनी निश्चित करून त्यास मा. आयुक्त यांची मंजूरी घ्यावी. मूल्यांकन करतांना जमिनीचे स्थान, अनुश्रेय चटई क्षेत्र निर्देशांक, अनुज्ञेय वापर

इत्यादी बाबी विचारात घेतल्या जातील. सदर मूल्यांकनानुसार गुन्हा क्षमापन शुल्क आकारणी करण्याबाबत लेखी आदेश विकास प्रस्ताव विभाग प्रमुख यांनी निगमित करावेत. लागु नाही.

संदर्भित परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे हे दर १.४.२००२ पासून भूतलक्षी प्रभावाने लागू करण्यांत येतील. सर्व संबंधितांनी विका प्रस्ताव छाननी करतेवेळी दि. १.४.२००२पासून सुधारित दराने वसुली होईल याबाबत सक्षम सभेची मंजुरी प्राप्त करून प्रशासनाने आवश्यकता भासल्यास शासनाची पूर्व मंजुरी घेवून वरील बाबत अंमलात आणून द्यावे.



तसेच अनाधिकृत बांधकाम नियमित करणेसाठी आकारण्यात येणारा दंडाचा तपशिल खालील प्रमाणे आकारण्यात यावा.

| अ.क्र | अनाधिकृत बांधकामाचे तपशिल | संस्थेस दर प्रति चौ.मी./रू. | रहिवास दर प्रति चौ.मी./ रू. | वाणिज्य दर प्रति चौ.मी. / रू. | औद्योगिक दर प्रति चौ.मी./ रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १. सनद दिलेल्या जागेवर | ६० रू. | ४० रू | ८० रू. | ६० रू. |
| | २. आरक्षणाच्या जागेवर आरक्षित जागेवर अनाधिकृत बांधकाम नियमित करणे योग्य नाही. | -- | -- | -- | -- |
| | ३. शासकीय जागेवर | ८०रू | ६०रू. | १००रू. | ८०रू. |
| २ | यु. नंबरच्या जागेवर | ६०रू. | ४०रू. | ८०रू. | ६०रू. |

टिपः- आरक्षणाच्या जागेवर केलेले अनाधिकृत बांधकाम नियमित करण्यापूर्वी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६च्या तरतुदीनुसार आरक्षण वगळण्याबाबत अंतिम कार्यवाही केल्यानंतर / दंडाची आकारणी करून नियमित करणे बंधनकारक राहिल यापुर्वी प्रत्येक सदनिका धारणा करून दरवर्षी किमान २००० रू. दंडाची आकारणी करून रक्कम वसुल करणे बाबत शासन स्तरावर आदेश व्हावेत.

वरील प्रस्तावास शासनाने मंजुरी दिल्यास उल्हासनगर महानगरपालिकेस सुमारे रू. २२५ कोटी रक्कम विकास कामासाठी उपलब्ध होऊ शकेल. सदर विषय महासभेची मंजुरी मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> <u>दिनांकः-२०.८.२००२.</u>

सुचकाचे नाव :-
अनुमोदकाचे नाव :-
हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

<u>विषय:-</u> उल्हासनगर महानगरपालिकेची हदद वाढविणेकामी लागणारी लगतची गावे मौजे म्हारळ (भाग) वरण, कांबे, जावसई (भाग) आणे, नाळंबी व भिसोळ या गावांच्या उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये समावेश करणे बाबतचा प्रस्ताव शासनास शिफारस करणे बाबत.

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर शहर हे स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणजे सन १९४१ मध्ये भारत सरकारने लष्करी सैनिकांच्या वसाहतीसाठी सुरक्षित व योग्य ठिकाण म्हणुन उल्हासनगरची निवड करून वसाहतीसाठी सुमारे १२०० हेक्टर जमीन संपादित केलेली होती. सदर जमिनीचा विकास करून त्यामध्ये ११७३ बॅरेक्स बांधुन सुमारे ६००० सैनिकांना राहण्यासाठी देण्यात आले होते. तसेच सन १९४७ मध्ये हिंदुस्थानची फाळणी होऊन भारत व पाकीस्तान ही दोन्ही राष्ट्रे निर्माण झाली. या फाळणीमुळे सिंध्द प्रांतातून निर्वासितांचे लोंढे भारतात आल्यानंतर भारत सरकार मार्फत निर्वासितांचे पुर्नवसन म्हणून ११७३ बॅरेक्सचाच संक्रमण छावण्या म्हणुन उपयोग करून सुमारे ९४,४०० निर्वासितांची व्यवस्था उल्हासनगरमध्ये करण्यात आलेली होती.

तदनंतर महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दिनांक २०.९.१९६० रोजी उल्हासनगर शहराची हदद निश्चित केल्याबाबत शासनाने अधिसूचना काढलेली होती. तसेच सदर अधिसुचनेच्या अनुषंगाने दि. १.१०.१९६० पासून एकूण १८ उमेदवारांची एक वर्षाच्या कालावधीसाठी निवड करून उल्हासनगर शहराची रचना केलेली होती. करिता दिनांक १.१०.१९६० पासून उल्हासनगर शहराच्या हददीच्या सिमा खालीलप्रमाणे आहेत.

उतर :- उल्हास नदी

पूर्व :- मौजे म्हारळ - सर्व्हे नं. ९३,६०,५९,६१,८७,६६,८६, भाग ८७, भाग ८५, भाग ३६,३७,८०,८१ अे गावठाण २,१०,११,१२,१३,१४,२२ आणि २३.

मौजे कानसई - सर्व्हे नं.१०७,१०२ एन.ए.नं.१, एच.ए.नं.२ आणि १३६

मौजे अंबरनाथ -सर्वेनं. १३६,१२४ भाग आणि वालधुनी नदी.

दक्षिण :- मौजे अंबरनाथ- सर्वे नं. १३२,१२७,१२४,१३१,१४०,१४१,१४३, १४८ आणि १५० भाग.

पश्चिम :- मौजे वसार - सर्व्हे नं.११२,

मौजे मानेरे - सर्व्हे नं. ६,१५,१३,१६ भाग १२, १० आणि ८

मौजे आशेळे - सर्व्हे नं.२२ भाग,३८,७०,१८ भाग १४ भाग ५१ मौजे टॅक १६, ४९ भाग आणि ३७

मौजे खडे गोलीवली- सर्व्हे नं. २८,५८ भाग ५६, ५५ आणि ५२ सेंट्रल रेल्वे लाईन, शहाड वालधुनी नदी सेंन्ट्रल रेल्वे (नाशिक रेल्वे लाईन)

वरील हददीचे एकूण क्षेत्र १३०० हेक्टर असून सदर हददीच्या अनुषंगाने नगर विकास विभागाचे आदेश क्र. टीपीएस १२७२/६०१८५/आरपीसी/दिनांक २०.५.१९७४ अन्वये उल्हासनगर शहराच्या हददीसाठी मुळ विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ अन्वये मंजुर केलेले आहे.

तदनंतर महाराष्ट्र शासनाचे आदेश क्र. टीपीबी/१२७५/१९९९/युडी-८ दि.१५.३.१९७६ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४०, पोटकलम (१)च्या खंड (सी)नुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ अन्वये स्थापन झालेल्या यापुढे याचा उल्लेख मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण असा करण्यात आलेला आहे)



कल्याण संकुल अधिसुचीत क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केलेले आहे.

महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या विशेष नियोजन प्राधिकरणामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ नुसार सुधारित विकास योजनेचे काम हाती घेण्यासाठी उक्त अधिनियमाचे कलम २३ नुसार अधिसूचना जाहिर केलेली होती. सदर अधिसूचनेच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ च्या तरतुदीनुसार प्रारूप (सुधारीत)विकास योजना दि. १०.५.२००१ रोजी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द केलेले असून सदर प्रस्तावासोबत खालील बाबींचा समावेश आहे.

१. उल्हासनगर शहराचा सुधारीत प्रारूप विकास योजना
२. प्रारूप विकास योजनेचा अहवाल
३. प्रारूप बांधकाम नियंत्रण नियमावलीचा अहवाल.

वरील तिन्ही बाबींचा विचार केले असता रहिवास वापरासाठी जागा फारच कमी असल्याने नियोजन बध्द विकास करता येणे शक्य नाही असे दिसून येते. त्यामुळे विशेष नियोजन प्राधिकरण्यामार्फत प्रसिध्द केलेल्या उल्हासनगर शहराच्या सुशिक्षित नागरीकांमार्फत एकुण प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांची आकडेवारी २९०० एवढी आहे. इतर नागरिकांना विकास योजनेच्या आरक्षणाची कल्पना नाही. कारण खालील आकडेवारी आणि अंबरनाथ व बदलापुर या शहराची लोकसंख्येची घनता पाहता उल्हासनगर शहरासाठी कमीत कमी १६७२ हेक्टर जमिन फक्त उल्हासनगर शहरासाठी रहिवास वापरासाठी ठेवणे आवश्यक आहे परंतु जमिन उपलब्ध नसल्याने ते ठेवण्यात आलेले नाही. पर्यायाने नागरिकांना हरकती व सूचना वरती मोठया प्रमाणात आक्षेप घ्यावा लागला. सदर हरकती वर सूचना व हरकती बाबत सुनावणी घेण्यासाठी महाराष्ट्र प्रादेंशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम२८ (२) च्या तरतुदीनुसार समिती गठित करण्यासाठी विशेष नियोजन प्राधिकरणाने नगरविकास विभागाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. तथापि शासन स्तरावर अद्यापही समितीची नियुक्ती केलेली नाही.

तुलनात्त्मक तक्ता ''अ'' (कल्याण संकुल अधिसुचित क्षेत्रातील नगरपरिषदा आणि महानगरपालिकेचा तपशील)

| अ. क्र. | न.पा/म.न.पा चे नांव | क्षेत्र (हेक्टर) | अस्तित्त्वातील रहिवासी जमीन वापर (हेक्टर) | प्रस्तावित रहिवास वापरखालील जमिन (हेक्टर) | २०१६ची नियोजनासाठी घेतलेली लोकसंख्या | मानकाप्रमाणे रहिवास वापरा आवश्यक क्षेत्र | तळक्षेत्र मंजुर | निर्देशांक आवश्यक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर महानगरपालिका | १३०० | ७२१ | ६१४ | ५,०१,५०० | १६७२ | १ | ३ |
| २ | अंबरनाथ नगरपरिषद | ३७९९ | ३४३ | ११४२ | ३,८,००० | ११७ | १ | १ |
| ३ | कुळगांव-बदलापूर नगरपरिषद | ३५६८ | १८० | ९७० | १,५०,००० | ५०० | १ | १ |

विशेष नियोजन प्राधिकरणामार्फत तयार करण्यात आलेल्या आणि प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रारूप विकास योजनेबाबत उल्हासनगर महानगर पालिकेमार्फत म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत ब-याच प्रमाणात हरकती व सुचनेच्या संदर्भात ठराव क्र. ८ दि.७.७.००१ नुसार ठराव पारित करून जनतेचे मन व्यक्त करण्यात

आले. वास्तविक पहाता ७४ च्या घटना दुरूस्तीच्या अनुषंगाने स्थानिक संस्थेमार्फतच विकास योजनेचे काम हाती घेणे आवश्यक आहे. परंतु विशेष नियोजन



प्राधिकरणामार्फत प्रसिध्द केलेल्या विकास योजनेच्या अहवालाची आणि लोकसंख्येची पडताळणी केली असता लोकसंख्येच्या प्रमाणात उल्हासनगर शहराची हदद वाढ करणे आवश्यक झालेले आहे. याकरिता उल्हासनगर शहरात लागुन असलेले खालील गावांचा समावेश उल्हासनगर हददीमध्ये समाविष्ट करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम (२) नुसार ठराव पारित करून प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी शासनास सादर करणे आवश्यक आहे.

उल्हासनगर शहराच्या हददीमध्ये वाढ करून समावेश करावयाचा गावाचा तपशिल

| मौजे | सन १९९१ च्या जनगणनेनुसार | क्षेत्र हेक्टरमध्ये (वाढीव हदद) |
|---|---|---|
| १ म्हारळ (भाग) | ९६६० | १८९. ५९ |
| २. वरप | १०५६ | १८८. ३५ |
| ३. कांबे | ३४४० | ७३५. ३८ |
| ४. जावसई (भाग) | १२०० | २५०. ०० |
| ५. आणे | ०४४५ | २८८. ३५ |
| ६. नाळंबी | ०४१५ | ३३९. १२ |
| ७. भिसोळ | ०७४६ | १३८. ५४ |
| | १७,८४ | २१२३. ३३ |

वरील एकुण ७ गावाचा समावेश होत असून मौजे म्हारळ आणि जावसई या दोन गावांचा काही भाग उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये अंर्तभुत करणे आणि उर्वरित ५ गावांचा पुर्ण महसुली विभाग उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये समावेश करणे आवश्यक आहे. कारण यापुर्वीच्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या हददीमध्ये १९९२ मध्ये पुर्ण हददीस लागून असलेली खालील गांवे हददीमध्ये समाविष्ठ करून नगर परिषदेच्या हददीमध्ये वाढविण्यात आली होती.

१. मौजे म्हारळ (भाग)
२. मौजे वरप
३. मौजे कांबे
४. मौजे जावसई (भाग)

परंतु सन १९९ मध्ये वरीष्ठ गावे नगरपरिषदेच्या वाढीव हददीमधुन पुर्णता वगळण्यात आली होती. परंतु आता सदर गावे पुन्हा हदद हाढीमध्ये घेण्याबाबत शासन स्थरावर आदेश होणे आवश्यक आहे.

तरी याबाबत उल्हासनगर शहराची हदद वाढ करणेसाठी वरील गावांचा समावेश केल्यास रहिवास वापर आणि शैक्षणिक सुविधा, आरोग्याची सुविधा, पाणी पुरवठा घनकच-याची विल्हेवाट लावणे, क्रिडा संकुले, औद्योगिक वापर, ट्रक टर्मिनस, वाणिज्य स्वरूपाचे संकुल आणि म्हाडा योजने अंतर्गत घरकुल योजना इत्यादी नागरी सुविधा उपलब्ध करून देता येतील.

तसेच सदर गावांचा उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये समावेश केल्यास पर्यावरण भौगोलिक आणि आर्थिकदृष्टया योग्य होणार आहे. कारण इतर बाजुने कल्याण महानगरपालिकेची हदद आणि अंबरनाथ नगर पालिकेचे हदद वरील ७ गावांचाच समावेश करणे तांत्रिक आणि भौगोलिक परिस्थिती पहाता आढळून येते. तसेच सदर शहरालगत आजुबाजूला काही प्रमाणात नागरीक रहात असल्योन नागरिकांचा कल देखील सदर भागाकडे जमिनीचा विकास करत असल्याचे दिसुन येते. तरी उल्हासनगर

शहर हे राज्यातील निर्वासित वसाहत असलेले शहर असल्याने दिवसेंदिवस दैनंदिन स्वरूपाच्या नागरी समस्या निर्माण झालेली आहे. याबाबत वरिल परिस्थितीचा विचार करता या बाबीस कायम स्वरूपी आळा घालण्यासाठी आणि नागरी सुविधांपासुन वंचित होत असलेल्या नागरिकांना नागरी सुविधा उपलब्ध करून दणे आवश्यक झालेले आहे. सदर भाग उल्हासनगर शहरामध्ये समावेश करण्याबाबत शासन स्थरावर वैधानिक कार्यवाही करण्यासाठी याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यापुर्वी महासभेची मंजूरी घेणे आवश्यक असल्याने, सदर विषय महासभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> २२ <u>दिनांकः-३१.८.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. हरदास माखिजा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

ही महासभा वरील प्रस्तावने प्रमाणे या ठरावाव्दारे उल्हासनगर महानगरपालिकेच्या सिमांमध्ये लगतची गावे मौजे म्हारळ (भाग) वरप, कांबे, जावसई (भाग) आणे, नाळंबी आणि भिसोळ या गावांचे क्षेत्र समाविष्ट करणे कामी शासनास शिफारस करित आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>बहुमताने</u>

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>विषयः-</u> विशेष नियोजन प्राधिकरण यांच्या अधिपत्त्याखाली कल्याण संकुल अधिसूचीत क्षेत्रातून उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्र वगळण्यास शासनास शिफारस करणे बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

१. उल्हासनगर शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-
या अधिसूचित क्षेत्रातील उल्हासनगर व अंबरनाथ या शहरांना ऐतिहासिक पार्श्वभुमी लाभलेली आहे. सन १९४२ मध्ये भारत सरकारने लष्करी सैनिकांच्या वसाहतीसाठी सुरक्षित व योग्य ठिकण म्हणुन उल्हासनगरची निवड केली व त्यासाठी सुमारे १०० हेक्टर जमीन संपादीत केली. या ठिकाणी लष्करांसाठी संक्रमण छावण्या निर्माण केल्या व त्यामध्ये सुमारे ६ हजार सैनिकांना राहण्यासाठी ११७ बॅरेक्स बांधण्यात आल्या. या लोकसंख्येच्या सुविधांसाठी योग्य ते रूंद रस्ते, पाणी पुरवठा, सांडपाण्याची व्यवस्था व वीज पुरवठा करण्यात आला होता. तसेच योग्य प्रकारे ले-आऊट करून सिनेमा थिएटर, तरणतलाव , क्लब हाऊस अशा त-हेच्या मनोरंजनाच्या सुविधाही निर्माण करण्यात आल्या होत्या. अंबरनाथ येथील ऑर्डनन्स

फॅक्टरीमधून वीज पुरवठा करण्यात येत होता. विठ्ठलवाडी येथे नवीन रेल्वे स्टेशनची सुध्दा सोय करण्यात आली होती व ते स्टेशन पुर्वी "जेम्स रेल्वेसाईडिंग" या नावांने ओळखले जात होते.

सन १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर झालेल्या फाळणीमुळे सिंध प्रांतामधुन फार मोठ्या प्रमाणावर निर्वासित भारतामध्ये आले. महाराष्ट्र राज्यामध्ये त्यांच्यासाठी पुण्याजवळील पिंपरी व मुंबई जवळील उल्हासनगर हया प्रमुख ठिकाणी छावण्या उघडण्यात आल्या. दुसरे महायुध्द संपल्यानंतर उल्हासनगर येथे लष्करी सैनिकांसाठी बांधलेल्या बॅरेक्स निरूपयोगी व रिकाम्या झाल्या होत्त्या. त्यामुळे शासनाने निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी त्यांचा उपयोग करण्याचे ठरविले. एप्रिल १९४८ च्या सुमारास या सर्व संक्रमण छावण्या भारत सरकारच्या सहाय्य आणि पुर्नवसन मंत्रालयाच्या (रिलीफ ॲंड रिहॅबिलीटेशन मिनिस्ट्री) ताब्यामध्ये मुंबईमध्ये येणा-या निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी सुपूर्द करण्यात आल्या. या निर्वासितांना या ठिकाणी नुसताच आश्रय दिला नाही तर त्यांना घरगुती उपयोगाचे सामान, कामधंदा अशा प्रकारची मदतही देऊ केली. त्यावेळी अंदाजे ९४,४०० निर्वासितांनी या संक्रमण छावणीमध्ये आश्रय घेतला होता. कालांतराने या निर्वासितांनी त्याचे स्वतःचे कामधंदे सुरू केले आणि हळूहळू त्यांचे पुनर्वसन होऊन उल्हासनगरमध्ये नव्याने आर्थिक आणि सांस्कृतिक समाजाची उभारणी झाली. गेल्या ४ दशकांमध्ये उल्हासनगर शहराची फार मोठ्या प्रमाणात वाढ होऊन आता हे शहर म्हणजे उद्योगधंदयाचे या प्रदेशातील प्रमुख केंद्र बनले आहे. परंतु उल्हासनगर शहराची हदद वाढ अद्यापही झालेली नसल्याने तुटपूंज्या जागेत अनाधिकृत बांधकाम करण्याची नागरिकांची प्रवृत्ती वाढत गेलेली दिसून येते.

२) कल्याण संकुल अधिसुचित क्षेत्राची पार्श्वभुमी :-

मुंबई महानगर प्रदेश नियोजन मंडळाने मुंबई महानगर प्रदेशासाठी तयार केलेली प्रोदेशिक योजना सन १९७३ पासुन अंमलात आली. या योजनेमध्ये डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापुर हे एक नागरी वाढीचे क्षेत्र ठरविण्यात आले. याभागामध्ये होत असलेल्या उद्योगधंदयाचा विकास तसेच मुंबई व इतर महत्त्वाच्या शहरांशी रेल्वेने असलेला संबंध हीच या भागाच्या वाढीची महत्त्वाची कारणे होत. या भागाची एकात्मिक व नियोजन बध्द वाढ होण्यासाठी कल्याणच्या दक्षिणेकडील क्षेत्र नविन शहर म्हणुन निर्देशित करण्यात आले. या प्रादेशिक योजनेमधील शिफारशी



लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने नगरविकास, सार्वजनिक आरोग्य , आरोग्य व गृहनिर्माण विभाग निर्णय क्र. टी.पी.बी. १२७५ /११९९/युडी-५ दि. १५ मार्च १९७६ अन्वये कल्याण संकुल अधिसूचित क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६च्या कलम ४० (१)(क)अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन नेमणुक केली. सदर अधिसूचित क्षेत्रामध्ये कळवा, मुंब्रा, डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापुर तसेच त्यांच्या आजुबाजूच्या ग्रामीण क्षेत्राचा समावेश केला. या क्षेत्राची नियोजनबध्द संतुलित विकासाची जबाबदारी प्राधिकरणावर सोपविण्यात आली. या अधिसूचित क्षेत्राच्या भौगोलिक हददीमध्ये मुख्यत्त्वेकरून ठाणे व कल्याण महानगरपालिकांच्या निर्मितीमुळे वेळोवेळी बदल होत गेले महाराष्ट्र शासनाने त्या अनुशंगाने बदल करून २२.७.१९९२ रोजी अधिसुचित केलेल्या कल्याण संकुलाचे क्षेत्र २२५ चौ.कि. मी. असून यामध्ये उल्हासनगर महानगरपालिका अंबरनाथ व कुळगाव बदलापुर नगरपालिका व सभोवतालच्या ५६ गावांचा समावेश केलेला आहे. शासनाच्या अधिसुचना क्र. टीपीएस.१२००/१९५७/प्र.क्र. ३२. २००१/नवि-१२, दिनांक २२ मार्च २००१ अन्व्ये सदर क्षेत्राच्या नावात बदल करून सदर क्षेत्राला उल्हासनगर, अंबरनाथ, कुळगाव बदलापुर, आणि परिसर अधिसूचित क्षेत्र असे करण्यात आले आहे. (यापुढे त्याचा उल्लेख अधिसुचित क्षेत्र असा करण्यात आला आहे) ज्याप्रमाणे नवी मुंबई आणि ठाणे महानगरपालिकेचे क्षेत्र अधिसुचित क्षेत्रामधुन वगळण्यात आले त्याचप्रमाणे उल्हासनगर शहराची हदद अधिसुचित क्षेत्रामधुन वगळण्यात यावी. असा प्रस्ताव मांडण्यात येत आहे.

३) नागरी प्रशासनः-

नियोजनाखालील क्षेत्र ढोबळ मानाने नागरी व ग्रामीण अशा दोन भागांमध्ये विभागले गेले आहे. नागरी क्षेत्रामध्ये उल्हासनगर महानगरपालिका, अंबरनाथ व कुळगांव बदलापुर या नगरपालिकांचा समावेश होतो. या शहरांचे प्रशासन नगरपालिका अधिनियमानुसार स्थापना करण्यात आलेल्या महानगरपालिका व नगरपालिका यांच्याकडुन करण्यात येते. या शहरांच्या प्रशासनिय चौकटीची व सभोवतालच्या ग्रामीण क्षेत्राची संक्षिप्त माहिती पुढे देण्यात आली आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेसाठी नियोजन प्राधिकरण म्हणुन उल्हासनगर महानगरपालिकेस अधिकार प्राप्त करून देणे बाबत.

उल्हासनगर नगरपालिकेची स्थापना सन १९६० मध्ये करण्यात आली. या शहराच्या हद्दीमध्ये ब-याच वेळा बदल केला. दि. १०.४.१९९२च्या अधिसूचनेव्दारे या शहराच्या लगतच्या मौजे म्हारळ, वरप, कांबे व जावसई इत्त्यादी गावांचा अंर्तभाव या शहरात करण्यात आला तथापि या गावातील नागरिकांच्या विरोधामुळे हि गांव परत उल्हासनगरच्या हद्दीमधुन दि. १.१२.१९९३च्या अधिसूचनेव्दारे वगळण्यांत आली. या नगरपालिकेसाठी शासनाने त्यावेळी प्रशासकाची नेमणुक केली होती. तथापि त्यानंतर निवडणुका होऊन दि. १०.५.१९९५ पासुन निर्वाचित मंडळाकडे या शहराचा कारभार सोपवला गेला. शासनाने २१ ऑक्टोबर, १९९६ मध्ये उल्हासनगर नगरपरीषदेचा दर्जा वाढवून तिला महानगरपालिकेचा दर्जा दिलेला आहे. करिता सध्या भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी या शहरास आयुक्त म्हणुन नियुक्त केलेले आहे. तसेच निरनिराळया स्वरूपाचे तज्ञ अधिकारी म्हणुन शासनाने प्रतिनियुक्तीव्दारे शासनाने नियुक्त केलेले असल्याने महानगरपालिकेमार्फत सर्वांगीण बाजुने विकास करण्यासाठी नियोजन प्राधिकरण सक्षम असुन त्यास स्थानिक स्वराज्य संस्थेचाही पुर्ण सहभाग राहणार आहे. म्हणुन विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन अधिसुचित केलेल्या क्षेत्रामधुन उल्हासनगर शहराची हद्द वगळण्यांत यावी.



४) लोकसंख्येबाबतचा तपशिलः-

एखादया क्षेत्राची विकास योजना तयार करताना त्या क्षेत्रामध्ये असलेल्या लोकसंख्येची, त्यामध्ये पुर्वी झालेल्या लोकसंख्येच्या वाढीच्या कारणांची तसेच त्यातील वेगवेगळया विभागात कमी जास्त प्रमाणात लोकसंख्या विखुरली जाण्याची तपशिलवार माहिती अत्त्यंत आवश्यक आहे. लोकसंख्येमध्ये भविष्यकाळात होणारी वाढ आजमावण्यासाठी या माहितीचा बराच उपयोग होतो. भविष्यातील होणारी लोकसंख्या हा नियोजनाचा मुलाधार ठरतो.

तक्ता

| अ. क्र. | न.पा/म.न.पा चे नांव | क्षेत्र (हेक्टर) | अस्तित्त्वातील रहिवासी जमीन वापर (हेक्टर) | प्रस्तावित रहिवास वापराखालील जमिन (हेक्टर) | २०१६ची नियोजनासाइी घेतलेली लोकसंख्या | मानकाप्रमाणे रहिवास वापरा आवश्यक क्षेत्र | तळक्षेत्र मंजुर | निर्देशांक आवश्यक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर महानगरपालिका | १३०० | ७२१ | ६१४ | ५,०१,५०० | १६७२ | १ | ३ |
| २ | अंबरनाथ नगरपरिषद | ३७९९ | ३४३ | ११४२ | ३,८,००० | ११७ | १ | १ |
| ३ | कुळगांव-बदलापूर नगरपरिषद | ३५६८ | १८० | ९७० | १,५०,००० | ५०० | १ | १ |

५)शासनाने पुर्वी केलेले नियोजनाचे प्रयत्न :-

या संकुलातील फक्त उल्हासनगर व अंबरनाथ या शहरांचे विकास योजनांचे नकाशे तयार करण्यापुरते नियोजनाचे प्रयत्न पुर्वी झालेले होते. उल्हासनगर हे शहर पूर्वी मिलिटरी संक्रमण छावणीसाठी ले-आऊट तयार करून वसविण्यांत आले होते. तथापि मिलिटरीसारख्या शिस्तबध्द पलटणीसाठी निर्माण केलेल्या शहरामध्ये निर्वासितांचे पुर्नवसन करून या शहराचे सांस्कृतिक आणि एकसंघ असे सामाजिक शहर निर्माण करण्यासाठी पूर्वीच्या ले-आऊटमध्ये आवश्यक ते बदल करून नवीन शहर निर्माण करणे आवश्यक होते. हीच बाब मुख्यत्वे लक्षात घेऊन पहिल्या मास्टर प्लॅनमध्ये टावून सेंटर, शाळा, क्रिडांगणे, बाजार, दवाखाने इत्त्यादी सुविधा वेगवेगळे भाग पाडुन (नेबरहुड)तो भाग स्वयंपुर्ण करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आला. या मास्टर प्लॅनमध्ये नवीन रेल्वे स्टेशन, कॅम्प क्र. १ ,२ ,३ ,व ४ मध्ये काही औद्योगिक वसाहती, कॅम्प क्र. ४ मध्ये नवीन रहिवासी क्षेत्र तसेच काही शाळा कॉलेज निर्माण झाली. त्यानंतर शासनाने नगर विकास, सार्वजनिक आरोग्य आणि गृहनिर्माण विभाग ठराव क्र. टीपीएस/१२०७/३३१६६-एन, दि. ३१.५.६८ च्या अधिसूचनेव्दारे नेमणुक केलेल्या उल्हासनगर टाऊनशिप विकास समितीने उल्हासनगर शहरासाठी विकास योजनेचा नकाशा तयार केला. या समितीने त्यांचे प्रस्ताव व अहवाल तसेच त्यांच्या शिफारसी शासनास दि. ३०.४.७० रोजी सादर केल्या. तथापि हा नकाशा नंतरच्या काळात मंजुर झालेला दिसत नाही. तत्पुर्वी म्हणजेच उल्हासनगर नगरपरिषदेची सन १९६० मध्ये नियुक्ती होण्यापुर्वी या शहरामधील प्रशासनीय कार्ये ही वेगवेगळया प्रशासकीय विभागाकडुन केली जात होती. महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाकडूनही कारभार चालविला जात होता. तसेच या सर्वांवर देखरेख करण्यासाठी आणि सुसंवाद साधण्यासाठी शासनाने एक समिती नियुक्त केली होती व ही समिती नगरपरिषदेची नियुक्ती होईपर्यंत कार्यरत होती. उल्हासनगर नगरपरिषदेने नगररचना अधिनियमातील तरतुदीनुसार विकास योजना तयार करण्याचे काम सन १९६४ मध्ये सुरू करून तो नकाशा शासनाकडे मंजुरीसाठी सादर केला होता. या नकाशास शासनाने मंजूरी दिली



व तो विकास योजनेचा नकाशा दि.१.७.७४ पासून अंमलात आला होता. परंतु विशेष नियोजन प्राधिकरणाने विकास योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत कोणत्त्याही प्रकारची उपाययोजना सुचवून नागरी सुविधा उपलब्ध करून दिलेले नाही.

६)विशेष नियोजन प्राधिकरणाच्या मार्फत अपेक्षित होणे :-

अ)तत्कालीन नगरपरिषद उल्हासनगर या शहरास स्थानिक प्राधिकरणांना आर्थिक पाया विस्तृत करण्यासाठी प्रवृत्त करणे तसेच आर्थिक सहायाच्या योजनांची माहिती करून देणेसाठी विशेष नियोजन प्राधिकरणाने कोणत्त्याही प्रकारचे मार्गदर्शन केलेले नाही.

ब)आरक्षणाखालील जमिनींचे अतिक्रमणांपासुन संरक्षण करणेबाबत कोणत्त्याही स्वरूपाचे धोरणात्त्मक निर्णय घेतलेले नाही.

क)विकास योजना मंजुर केल्यानंतर संबंधित प्राधिकरणांनी आरक्षणाखालील जमिनी वरील अतिक्रमणे / अनाधिकृत बांधकामे काढुन नागरीकांना पर्यायी जागेची व्यवस्था करणेबाबत कोणत्त्याही प्रकारचे तांत्रिक सल्ले दिलेले नाही.

क) विकास योजना मंजुर केल्यानंतर संबंधित प्राधिकरणांनी आरक्षणाखालील जमिनी वरील अतिक्रमणे /अनाधिकृत बांधकामे काढून नागरीकांना पर्यायी जागेची व्यवस्था करणे बाबत कोणत्त्याही प्रकारची उपाययोजना सुचवून नागरी सुविधा उपलब्ध करून दिलेले नाही.

६)विशेष नियोजन प्राधिकरणाच्या मार्फत अपेक्षित होणे:-

अ) तत्त्कालीन नगरपरिषद उल्हासनगर या शहरास स्थानिक प्राधिकरणांना आर्थिक पाया विस्तृत करण्यासाठी प्रवृत करणे तसेच आर्थिक सहायाच्या योजनांची माहिती करून देणेसाठी विशेष नियोजन प्राधिकरणाने कोणत्त्याही प्रकारचे मार्गदर्शन केलेले नाही.

ब) आरक्षणाखालील जमिनींचे अतिक्रमणांपासुन संरक्षण करणोबाबत कोणत्त्याही स्वरूपाचे धोरणात्त्मक निर्णय घेतलेले नाही.

क)विकास योजना मंजूर केल्यानंतर संबंधित प्राधिकरणांनी आरक्षणाखालील जमिनी वरील अतिक्रमणे / अनाधिकृत बांधकामे काढून नागरीकांना पर्यायी जागेची व्यवस्था करणेबाबत कोणत्त्याही प्रकारचे तांत्रिक सल्ले दिलेले नाही.

ड)विकास योजनांच्या अंमलबजावणीसाठी विशेष नियोजन प्राधिकरणांनी विशेष घटकाची निर्मिती करणे आवश्यक आहे. तसेच वार्षिक आर्थिक अंदाज पत्रकामध्ये बजेटच्या १० टक्के रक्कम तरी विकास योजनेच्या अंमलबजावणीसाठी वेगळे ठेवून देखिल विकास करण्यात आलेला नाही.

इ)टीडीआर, एकत्रित विकास, अकॉमोडेशन रिझर्वेशन आदि नव्या संकल्पना खाजगी क्षेत्राचा सहभाग होण्यासाठी अंतर्भुत केल्या आहेत. स्थानिक प्राधिकरणांनी विकास योजनांच्या अंमलबजावणीसाठी या संकल्पनांचा प्रभावि उपयोग करून घेणे आवश्यक आहे. तथापि विद्यमान स्वरूपात आरक्षणावर हात असलेल्या नागरिकांसाठी पर्यायी व्यवस्था म्हणुन नियोजन करणे आवश्यक होते. परंतु सुधारीत विकास योजनेत तशी तरतुद केलेली नाही.

फ)मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे नियोजनाच्या बाबतीत या संकुलासाठी सर्वोच्च प्राधिकरण असल्यामुळे या प्राधिकरणाकडून विकास योजना राबविण्याकामी सनियंत्रण ठेवणे आवश्यक होते. तसेच संबंधित प्राधिकरणांना आर्थिक मदत सुध्दा पुरविण्याबाबत विचार करणे आवश्यक होते. पंरतु तशी कोणतीच कार्यवाही केलेली नाही.

परंतु विशेष नियोजन प्राधिकरणामार्फत उल्हासनगर शहराच्या नागरी समस्यांबाबत कोणत्त्याही स्वरूपाचे ठोस निर्णय घेतलेले नाही. परंतु नगरपरिषदेऐवजी उल्हासनगर महानगरपालिका अस्तित्त्वात आल्यानंतर महाराष्ट्र शासनामार्फत आयुक्त या दर्जाचे अधिकारी लाभले. या शहरातील किमान ३३ रस्त्याचे रूंदीकरणाचे बांधकाम हाती घेण्यात आले. तदनंतर नागरीकांस वाहतुकीसाठी रस्तें खुले करण्यात आले. परंतु विशेष नियोजन प्राधिकरणामार्फत सुधारीत विकास योजना तयार करताना उपलब्ध



असलेली जागा आणि लोकसंख्येची वाढ लक्षात न घेताच सुधारित विकास योजना प्रसिध्द केलेले आहे. वास्तविक पहाता लोकसंख्येचा विचार करता उल्हासनगर शहरासाठी खालील गावाचा समावेश हददवाढ करणेसाठी अपेक्षित होते.

१ मौजे म्हारळ (भाग)
२ मौजे वरप
३ मौजे कांबे
४ मौजे जावसई (भाग)
५ मौजे आणे
६ . मौजे नाळंबी
७ . मौजे भिसोळ

वरील गावांची हदवाढ झाल्यानंतर उल्हासनगर शहराची सुधारित विकास योजना तयार करण्याचे काम हाती घेतले असता तांत्रिक बाबींची अडचण निर्माण झाली नसती. परंतु विशेष नियोजन प्राधिकरण सदर बाबींचा विचार केलेला नाही. तरी आता उल्हासनगर महानगरपालिकेसाठी भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी नियुक्त करण्यात येत असल्याने उल्हासनगर, अंबरनाथ, कुळगांव बदलापुर आणि परिसर अधिसूचित क्षेत्र-उ अं कु ब प अ क्षेत्रामधुन उल्हासनगर शहर वगळुन नियोजन प्राधिकरण या नव्याने विशेष नियोजन प्राधिकरणापेक्षाही जास्त स्वरूपाचे लक्ष केंदीत करून योजना राबविण्याची कार्यवाही करता येईल. तरी शासन स्थरावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या तरतुदीनुसार कल्याण संकुल अधिसुचित क्षेत्रामधुन उल्हासनगर शहराची विद्यमान आणि नियोजित हदद वगळुन नियोजन प्राधिकरणास /स्थानिक स्वराज्य संस्थेस अधिकार प्रदान करणे आवश्यक आहे. याबाबत प्रस्ताव शासनास पाठविण्यापुर्वी महासभेची मंजूर घेणे आवश्यक असल्याने सदर विषय महासभेपुढे मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. २३ दिनांक:-३१ ८ २००२ .

सुचकाचे नाव :-श्री. हरदास माखिजा

अनुमोदकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार या ठरावाव्दारे मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यांच्या अधिपत्त्याखाली कल्याण संकुल अधिसूचित क्षेत्रामधुन उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्र वगळणे कामी शासनाच्या मंजुरीस प्रस्तावित करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

बहुमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- "ना नफा ना तोटा" या तत्त्वावर पाणी पुरवठा करणे कामी पाणी पट्टी दरात व पाणी पुरवठा लाभ करात वाढ करणे बाबत.

प्रस्तावनाः-

उल्हासनगर महानगरपालिकेने उल्हासनगर शहराच्या उंच व सखल भागात समान तत्त्वावर पाण्याचे वितरण करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत कर्जाची उभारणी केलेली आहे. सदर योजनेच्या पहिल्या टप्प्यात १७.७५ एम. एल. क्षमतेच्या ८ पाण्याच्या टाक्या, ८ संप पंप, १६ किलोमीटर अंतरावर पाईप लाईन टाकणेचे प्रस्तावित आहे. सदर योजनेवर आकृती बंध प्राप्त निधी, खर्च व लागणारा निधी खालील प्रमाणे आहे.

| वित्तिय आकृती वर्ष | प्राप्त निधी ३/२००१ | २/२००२ अखेर खर्च | उर्वरित लागणारा निधी (रूपये लाखात) |
|---|---|---|---|
| भारतीय जीवन आयुर्विमा कर्ज ५९१-०० | ११०. ०० | | ४८१.०० |
| खुल्या बाजारातील कर्ज ८५०-४० | ८५०-०० | ९३३-२७ | ० ४० |
| शा. अनुदान ४३८-६० | ३५०.०० | | |
| १८८०-०० | १३१०.०० | ९३३.२७ | ४८१ ४० |

वरील योजनेची अंमलबजावणी ६० प्रतिशत पर्यंत पुर्ण झाल्याने सदर कर्जाची परतफेड ची मागणी १९९७ पासुन आकारली आहे. परंतु महापालिकेने आतापर्यंत काहीही रक्कम अदा केलेली नाही. त्यामुळे दिनांक १६.२००२ रोजी जीवन विमा व खुल्या बाजारातून उभारलेल्या कर्जापोटी खालील रक्कम देय आहे.

| | |
|---|---|
| भारतीय जीवन आयुर्विमा | ४५२६७२८ |
| खुल्या बाजारातील उभारलेल्या | ११३४५५९९० |
| | ------------------------ |
| | ११७९८२७१८ |

महानगरपालिकेने कर्जाची परतफेड वेळेवर न केल्यामूळे सदर रक्कमेवर २८७१३७६९ रूपयांची शास्ती लावली असून त्याचा समावेश वरील रक्कमेत आहे. उप मुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांनी दिनांक १०.७.२००२ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेस मागणी नोटीस बजावून व्याजासह कर्ज परतफेड करणेसाठी निर्देशित केले आहे. व थकीत रक्कम विहित मुदतीत न भरल्यास ही रक्कम जमिन महसुलीची वसुली म्हणुन जिल्हाधिकारी यांच्यामार्फत वसुल केली जाईल असे कळविले आहे.

महानगरपालिका सुरूवातीपासुन पाणी पुरवठा वितरण सेवा नागरिकांना अर्थसहाय्य देवून सर्वांना पुरवित आहे. सध्या महानगरपालिका एम.आय.डी.सी कडुन ५७५०/- रूपये दराने प्रति एम.एल.ची खरेदी करीत आहे. सदर खरेदी व इतर प्रशासकीय व्यवस्थेपोटी महापालिका जो वार्षिक खर्च करीत आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे.



| अ. क्र. | तपशिल | रक्कम (रूपये) |
|---|---|---|
| १ | पाणी खरेदी खर्च | २१,००,००,००० |
| २ | वेतन भत्ते व इतर प्रशासकीय खर्च | २,५०,००,००० |
| ३ | टॅंकर खर्च | १,२०,००,००० |
| ४ | पाणी वितरण व्यवस्था व देखभाल दुरूस्ती खर्च | ८०,००,००० |
| ५ | बोअरवेल/जेटपंप खर्च | ११,००,००० |
| ६ | इमारत देखभाल व दुरूस्ती | २५,००,००० |
| ७ | विदयुत व टेलिफोन खर्च | ८०,००,००० |
| ८ | उदनचन पंप देखभाल व दुरूस्ती खर्च (बुस्टर पंप) | ३०,००,००० |
| ९ | इतर खर्च | ५,००,००० |
| १० | एकूण खर्च | २७,०१,००,०० |

महानगरपालिका शहरातील ग्राहकांना इमारतीच्या बांधकामाच्या आधारावर पाणी दर आकारणी करीत असून सदरचे तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | बांधकामाचा प्रकार | रक्क |
|---|---|---|
| अ | आर.सी. सी. व टिअर गर्डर बांधकाम इमारती | १०० प्रतिमहा |
| ब | पऱ्याचे छत व विट बांधकाम | ५० प्रतिमहा |
| क | व्यापारी घरपट्टी धारक (सर्व प्रकारचे बांधकाम) | ६० प्रतिमहा |
| ड | झोपडपट्टी घरपट्टी धारक, लफाटा किंवा पऱ्यांचे छत असलेले झोपडे, मातीचे झोपडे | ४० प्रतिमहा |

सदर दरांच्या अनुषंगाने पाणी पुरवठा सेवेतुन महापालिकेस मिळणा-या अपेक्षित उत्त्पन्नाचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अनुक्रमांक | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | शहरातील ग्राहकांना पाणी विक्री | १०,२५,१३,००० |
| २ | पाणी पुरवठा लाभकर | १८,१३,००० |
| ३ | नळ जोडणी फी | ३६,००० |

| | | |
|---|---|---|
| ४ | प्लंबर लायसन्स फी | १६००० |
| | एकूण उत्पन्न | १० ,४३ ,७८ ,००० |

उत्पन्न व खर्चाचा आढावा लक्षात घेता महानगरपालिकेस वार्षिक १६. ५८ कोटीचा तोटा सबसिडी दराने पाणी पुरवठा करण्यामुळे सहन करावा लागत आहे.

मा. सचिव, महाराष्ट्र शासन मुंबई यांचेकडिल परिपत्रक डी. ओ. पीआरई १०३३/१२७७/पीई१/दिनांक २६ जुलै २००१ अन्वये सर्व महापालिकेस देण्यात आलेल्या सुचनेनुसार सर्व नगरपालिका/ महानगरपालिकेने अनुज्ञेय असलेली अनुदाने बंद करण्यांत येईल असे सुचित केले आहे.

वर्ष २००१-२००३ करिता अंदाज पत्रक तयार करतांना पाणी पुरवठा योजना ना नफा ना तोडा या तत्त्वावर चालविणेकरता पाणी पटटी दरात वाढ करून १६. ५८ कोटीची तुट भरून काढणेकरिता प्रशासनाने प्रस्तावित केले होते. परंतु मा. स्थायी



समिती व महासभा सदस्यांनी सदर प्रस्ताव वरील आदेशाची दख्खल न घेता नामंजुर केल्यामुळे सदरच्या तोटयात दर वर्षी वाढ होत राहील.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ११९ (अ अ) नुसार पाणी पुरवठा योजना अशा भांडवली स्वरूपाच्या कामावर करावयाचा संपुर्ण खर्च भागविणेसाठी महापालिकेस आवश्यक वाटेल त्या टक्केवारीने पाणी पुरवठा लाभकर आकारणीची तरतुद करण्यांत आलेली आहे. महापालिकेने १८ कोटी रूपयांची पाणी पुरवठा योजना प्रथम टप्पा हाती घेतली आहे व ती ६० टक्के पुर्ण झाली आहे. तसेच रूपये ४१ कोटी रूपयाची योजना दुस-या टप्प्यांत राबवायची असून सदर योजनेसाठी कर्जाची उभारणी करावी लागेल. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, पाणी पुरवठा लाभकरात वाढ प्रस्तावित करण्यता आली होती. परंतु सदरचा प्रस्ताव सुध्दा नामंजुर झाल्यामुळे कोणत्त्याही प्राकरची आय महापालिकेस प्राप्त होणार नाही. अशा परिस्थितीत निधी अभावी सदर पाणी पुरवठा योजना टप्पा-१, टप्पा-२ पुर्णपणे राबविता येईल असे वाटत नाही. तसेच महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाची पाण्याची संचित थकबाकी व विद्यमान देयक देण्यास अडचणी निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी प्रशासनावर राहणार नाही.

उल्हासनगर महानगरपालिकेने महासभा ठराव क्रमांक ८ दिनांक १५.५.१९९७ व ठराव क्रमांक १५ दिनांक १९.७.२००२ अन्वये पाणी पुरवठा योजना टप्पा-१ आणि टप्पा-२ मंजुर करतांना सदर योजना स्वयंपुर्ण होणेच्या दृष्टीने आवश्यक ती पाणीपटटी आकरण्यास व आवश्यक असल्यास पाणीपटटी दरात वाढ करणेची हमी दिली आहे. त्यामुळे पाणी पुरवठा दरात व पाणी पुरवठा लाभकरात वाढ आवश्यक आहे.

वरील बाबींची सर्वकष विचार करता व शासन आदेशाचे महत्त्व लक्षात घेता यापुढे पाणी पुरवठा योजना "ना नफा ना तोटा" या तत्त्वावर चालविणे अत्त्यंत आवश्यक आहे. तरी सदर योजना " ना नफा ना तोटा" या तत्त्वावर चालविणे करिता पाणी पुरवठा दरात व पाणी पुरवठा लाभकरात वाढ करणे साठी प्रशासनाने वित्तिय वर्ष २००२-२००३ चे अंदाजपत्रक तयार करतांना जे प्रस्ताव सादर केले होते, त्याचा महासभेत फेर विचार व्हावा असे वाटते.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> <u>दिनांकः-२०.८.२००२.</u>

सुचकाचे नाव :-

अनुमोदकाचे नाव :-

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता या ठरावाव्दारे शहरात पाणी पुरवठ्याची सुव्यवस्था आणि पाणीपटटी कर थकबाकीची वसुली बददल पर्यायी उपाययोजना प्रलंबित असेपर्यंत "ना नफा ना तोटा" या तत्त्वावर पाणी पुरवठा करणे

कामी पाणीपुरवठा करात व पाणी पुरवठा लाभ करात वाढीच्या प्रस्तावास मान्यता देत नाही.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- उल्हासनगर-३ येथील बालकनजी बारी ट्रस्टच्या जागेवरील आरक्षण वगळणे कामी विशेष नियोजन प्राधिकरणामार्फत शासनास प्रस्ताव शिफारस करणेबाबत.

प्रस्तावनाः-

विषयांकित प्रकरणी, संदर्भीत पत्र्याच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, उल्हासनगर शहराची मुळे विकास योजना शासनाचे आदेश क्र. /टी.पी. एस/१०७२/६०१८५/आर.सीसी/दि.२०.५.१९७४ अन्वये मंजूर केलेली आहे. सदर मंजुर विकास योजनेत वरील जागा आरक्षण क्र. १८४ ''ओपन ऐअर थेयटर'' व आरक्षण क्र. १८७ (वाचनालय व कॅम्युनिटी हॉलसाठी)आरक्षण ठेवण्यात आले होते.

दिनांक १०.५.२००१ रोजी शासनाने प्रसिध्द केलेली प्रारुप विकास योजनेत वरील जागा आरक्षण क्र. ५९ '' खुली जागा एकूण क्षेत्र ३.६५ हेक्टर' व आरक्षण क्र. ६० ' प्राथमिक शाळा' एकूण क्षेत्र ०.३० हेक्टर यासाठी आरक्षित ठेवण्यात आली आहे.

विद्यमान स्वरुपात सदर जागा बाल्कनजीबारी ट्रस्ट यांचे ताब्यात असल्याचे सदर जागेत 'श्री. सत्त्यसाई चेरीटेबल ट्रस्ट' उल्हासनगर या नावाने हेल्थ सेक्टर चालू करण्याचे प्रस्ताव असल्याचे संदर्भीत पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्या करिता सदर पत्रात वरील प्रमाणे आरक्षणे वगळणे बाबत 'ना हरकत दाखला' देणेसाठी विनंती केली आहे.

सदर जागेचे एकूण क्षे. ५० ,००० चौ.वार आहे. व सनद दि. १८.३.७४ रोजी सचिव, उल्हासनगर बाल्कनजीबारी ट्रस्टचे नावे देण्यांत आलेली आहे. सदर ट्रस्ट चे नोंदणी दि. ३० जुलै, १९६० रोजी करण्यात आलेली आहे. सदर जागेत दि. २८.७.९५ रोजी शाळेकरिता तळमजला अधिक २ मजले नकाशे मंजूर करण्यात आले असून जागेवर शैक्षणिक सुविधाचा वापर आणि खुले नाट्य गृहाचा वापर चालू आहे.

दरम्यान कालावधीच म्हणजे दि. १०.५.२००१ रोजी उल्हासनगर शहराची प्रारुप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ अन्वये प्रसिध्द झाल्यानंतर ६० दिवसाच्या आत संस्थेमार्फत हरकती व सुचना बाबत आक्षेप सादर केलेला नसल्याने संस्थेच्या मालकीचे क्षेत्र सार्वजनिक निम्न सार्वजनिक क्षेत्रात बदल करण्याबाबतची कार्यवाही अथवा संस्थेने नकाशे मंजूरीसाठी सादर केल्यास या महानगरपालिकेस नकाशा मंजूर करता येत नाहीत.

करिता सदर संस्थेस शासनाने ज्या कारणासाठी जागा मंजूर केलेली आहे. त्या कारणासाठी संस्थेस जागेचा वापर करण्यासाठी प्रारुप विकास योजनेत सदर जागा सार्वजनिक व निम्न सार्वजनिक वापरासाठी दर्शविणे आवश्यक आहे.

प्रकरणी महासभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने वरील सभेची मंजूरी मिळाल्यानंतर शासनाकडे आणि विशेष नियोजन प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठविणे अनुज्ञेय ठरते.

तरी प्रकरणात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ अन्वये सुधारित प्रारुप विकास योजना प्रसिध्द झालेली असून त्यावर हरकती व सुचनाबाबत प्रत्यक्ष सुनावणी झालेली नसल्याने महानगरपालिकेमार्फत वरीलप्रमाणे बाल्कनजीबारीसाठी शासनाने मंजूर केलेले क्षेत्र हे पूर्णता सार्वजनिक व निम्न सार्वजनिक वापरासाठी म्हणून वापर दर्शविण्यासाठी नगरविकास विभागाकडे आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे शिफारस करणे पूर्वी प्रस्ताव महासभेकडे मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहे.

--२--

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> २४ <u>दिनांक:-३१.८.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रभुनाथ गुप्ता.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार या ठरावाव्दारे उल्हासनगर ३ येथील प्लाट क्र.२६८ (भाग) सेक्शन ६ (ब) येथील बाल्कनजी बारी ट्रस्टच्या जागेवरील सुधारित प्रारूप विकास योजने अंतर्गतचे आरक्षण क्र.५९ खुली जागा व प्राथमिक शाळेसाठीचे आरक्षण क्र.६० ही आरक्षणे वगळणे कामी मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणामार्फत शासनाच्या मंजुरीस प्रस्तावित करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>बहुमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>विषय:-</u> सन २००२-२००३ करिता उल्हासनगर शहर पर्यावरण अहवाल विचारात घेणे बाबत.

<u>प्रस्तावना:-</u>

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ६७-अ अन्वये तसेच भारतीय राज्यघटनेच्या ७४ व्या घटना दुरूस्तीमधील तरतुदीस अनुसरून महापालिका शहराचा पर्यावरण स्थितीचा अहवाल दरवर्षी ३१ जुलै पुर्वी महापालिकेच्या महासभेपुढे सादर करणे बंधनकारक आहे. महापालिकेकडे पर्यावरण विषय माहिती ठेवणे कामी स्वतंत्र विभाग अस्तित्त्वात नाही. तसेच याबाबतचा तांत्रिकी कर्मचारी वर्ग देखिल येथे नसल्यामुळे महापालिकेने यापुर्वी शहराचा पर्यावरण अहवाल तयार केलेला नाही. आता उल्हासनगर शहराचा सन २००१-२००२ सालचा

वस्तुस्थितीदर्शक अहवाल मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ६७ अ अन्वये महासभेपुढे सविनय सादर.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र. २५</u> <u>दिनांकः-३१ ८ २००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. नरेंद्रकुमार ठाकुर.

अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहर पर्यावरण स्थिती सन २००१-२००२ बाबतच्या आयुक्तांच्या अहवालाची नोंद करित आहे.

तसेच पर्यावरण स्थिती विषयी अहवालात नमुद केलेल्या कमतरते बाबत आवश्यक ती उपाययोजना करणेस निर्देश देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>आयत्यावेळचा विषयः-</u>

विषयः-महानगरपालिकेचे तरण तलाव व कॅंटीन बांधा, वापरा, व हस्तांतरण या पध्दतीने देणे बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

वर्ष १९७० मध्ये जेव्हा महानगरपालिकेचा मुख्य कार्यालयाचे बांधकाम करण्यांत आले त्यावेळी तरण तलाव व कॅंटीन सुध्दा बनविण्यांत आले होते. सदर तरण तलाव बनवुन ३० वर्षाचा कालावधी पुर्ण झालेला आहे. सध्या तरण तलावाच्या टाईल्स, फिल्ट्रेशन व संबंधीत सर्व मशीनरी निकामी झालेली आहेत. व तरण तलाव पुर्णपणे बदं आहे. तरण तलाव बंद असल्यामुळे त्यांचा जनतेस कोणताही लाभ होत नाही.

तरण तलावाचा जनतेस लाभ मिळवून देण्यासाठी तरण तलाव हे प्रथम दुरूस्ती करून घेणे आवश्यक आहे तसेच दैनंदीन देखभाल व दुरूस्ती साठी महानगरपालिकेस फार मोठ्या प्रमाणात निधी उभारावा लागणार आहे. महानगरपालिकेची सद्याची वित्तिय स्थिती लक्षात घेता प्रशासनातर्फे वरील योजना बांधा, वापरा व हस्तांतरण (Built operate and Transfer) तत्त्वावर देण्याच्या प्रस्ताव नव्याने तयार केला असून त्यांची संक्षिप्त माहिती पुढील प्रमाणे आहे.

१. ठेकेदारास तरण तलावात पोहण्याची व्यवसाी करणेसाठी तलावात टाईल्स, फिल्ट्रेशन प्लाट व सर्व संबंधीत मशिनीरी बसविण्यासंबंधी खर्च स्वतः करणे आवश्यक आहे.

२. ठेकेदारास विदयुत, टेलिफोन, पाणी, कर्मचारी व त्यांचा पगार विमा, सुशोभिकरण, देखभाल व दुरूस्ती इत्त्यादी प्रकाराचा दैनंदिन खर्च स्वतः करावयाचा आहे.
३. ठेकेदारास सदर योजना सहा महिन्याच्या कालावधीत कार्यान्वीत करणे बंधनकारक राहिल.
४. योजना, कार्यान्वीत झाल्यानंतर बिल्ट ऑपरेट व ट्रान्सफर पध्दतीने पुढील १० वर्षासाठी ठेकेदाराचे ताब्यांत राहिल.
५. तरण तलावांकरिता प्रत्येक महिन्यासाठी परवाना फी म्हणुन रू. २३४९१ किमान देयक आकार निश्चित करण्यांत आलेला आहे. जे ठेकेदार जास्तीत जास्त परवाना फी देण्यास तयार असेल त्यांची निविदा स्विकारण्यांत येईल.
६. महानगरपालिकेने तयार केलेले पोहण्या करिता निश्चित करण्यांत आलेले दराप्रमाणे फी आकारणे ठेकेदारास बंधनकारक राहिल. पोहण्याकरिता प्रस्तावित करण्यांत आलेला विविध प्रकारची फी दर्शविणारा तक्ता सोबत जोडला आहे.
७. ठेकेदार सदर जागेचा उपयोग जाहिरात, लग्न समारंभ इत्त्यादीसाठी करू शकतो. तसेच ठेकेदार कॅन्टीन मध्ये सर्व प्रकारचे शाकाहरी व मांसाहारी पदार्थ ठेवू शकेल परंतु सदर जागेत कोणत्त्याही प्रकारचे मद्यपान करण्यांस बंदी राहील.
८. १० वर्षाचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर सदर योजना मालमत्ता, मशिनरी व इतर साधन सामुग्री सह स्थितीत महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.



९. ठेकेदार जर योजना राबवण्यासाठी असमर्थ ठरला तर त्यांनी जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यांत येईल.
१०. योजना राबविल्यानंतर जर ठेकेदार परवाना फी देण्यास दिरंगाई करीत असेल किंवा विहित केलेल्या अटी व शर्तीने उल्लंघन करीत असेल तर त्याचा करार रदद करण्यांत येवून तयार करण्यांत आलेल्या सर्व साधनसामुग्री महानगरपालिका ताब्यात घेईल.
११. योजनेसाठी वरील प्रमाणे उल्लेख करण्यांत आलेल्या मुख्य अटी व शर्ती व्यतिरिक्त योजनेचा उददेश लक्षात घेता अन्य काही अटी करारात समाविष्ट करण्यांत येतील.
१२. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ नुसार वरील उल्लेख करण्यांत आलेल्या महानगरपालिकेचा तरण तलाव व कॅटीन भाडयाने देण्याचा व परवाना फि निश्चित करण्यासंबंधी प्रस्तावास मंजुरी मिळणे करिता सादर.

उल्हासनगर महानगरपालिका
तरण तलाव पोहण्यासाठी विविध प्रकारचे फी दर्शविणारा तक्ता
भाग एक (नॉन स्विमर्स)

पोहणे शिकण्याचे एकूण वार्षिक सभासद शुल्क

| ५ ते १५ वयोगट मुले / मुली | | १५ वर्षावरील पुरूषां महिला | |
|---|---|---|---|
| १ प्रवेश शुल्क | रू.१००.०० | १ प्रवेश शुल्क | रू.१००.०० |
| २ वार्षिक सभासद शुल्क | रू. ३५०.०० | २ वार्षिक सभासद शुल्क | रू. ७००.०० |
| ३ जलनिर्देशक शुल्क | रू. ३५.०० | ३ जलनिर्देशक शुल्क | रू. ३५.०० |
| ४ ओळखपत्र शुल्क | रू. २५.०० | ४ ओळखपत्र शुल्क | रू. २५.०० |
| एकुण | रू.५१०.०० | एकुण | रू.८६०.०० |

भाग २ ( स्विमर्स)
पोहता येते अशा सभासदांसाठी एकुण वार्षिक शुल्क

| ५ ते १५ वयोगट मुले / मुली | १५ वर्षावरील पुरूष/ महिला |
|---|---|
| १ प्रवेश शुल्क रू.१००.०० | १ प्रवेश शुल्क रू.१००.०० |
| २ वार्षिक सभासद शुल्क रू. ३५०.०० | २ वार्षिक सभासद शुल्क रू. ७००.०० |
| ३ जलनिर्देशक शुल्क रू. ३५.०० | ३ जलनिर्देशक शुल्क रू. ३५.०० |
| एकुण रू.५१०.०० | एकुण रू.८२५.०० |

<u>भाग ३</u>

| अ. क्र. | इतर बाबीवरील शुल्क दर | दर रूपये |
|---|---|---|
| १ | ५ ते १० वर्ष वयोगटांतील मुले /मुली यांच्या सोबत येणा-या पालकांस १ वर्षासाठी प्रवेशिका शुल्क | ३५०/-प्रतिवर्ष |
| २ | आकस्मिक (गेस्ट) पोहणा-याचे शुल्क | १०/- प्रतिदिन |
| ३ | गॅलरी (कठडा) शुल्क | ५/- प्रतिदिन |
| ४ | वार्षिक सभासद अर्ज शुल्क | १०/- प्रति अर्ज |
| ५ | लॉकर्स शुल्क | १००/- प्रति वर्ष |
| ६ | लॉकर्स अनाधिकृत वापर केल्यास दंड शुल्क | ५०/- |
| ७ | आरक्षित तास शुल्क | ४००/- |
| ८ | जलजिवरक्षक आरक्षित एक तास शुल्क | १००/- |



| | | |
|---|---|---|
| ९ | राष्ट्रीय व राज्य पातळीवरील शासनमान्य संस्थाशी संलग्नित तास शुल्क | २००/- |
| १० | चित्रपटासाठी छायाचित्रण घेण्याचे आरक्षण तास शुल्क | १००/- |
| ११ | नविन ओळखपत्र मिळणेबाबत शुल्क | ३०/- |
| १२ | नुतनीकरण लेट फी | ५०/- |

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र. २६</u> <u>दिनांकः-३१.८.२००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार वर नमुद केलेल्या अटी, शर्ती व निर्बंधांवर व त्या व्यतिरिक्त आयुक्त ठरवतील अशा अतिरिक्त अटी शर्तीवर महानगरपालिकेचे तरण तलाव व कन्टीन बांधा, वापरा व हस्तांतरण या पध्दतीने देणे कामी मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>आयत्त्यावेळचा विषयः-</u>

<u>विषयः-</u>सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतील नागरी रोजगार योजनांतर्गत करावयाच्या कामांसाठी साहित्त्य व मजुरी यांवर अनुक्रमे ६० : ४० या प्रमाणापेक्षा अधिक होणारा खर्च महानगरपालिका निधीमधुन करण्यास मान्यता देणे.

<u>प्रस्तावनाः-</u>

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये नमुद करण्यात आलेली २३ नागरी रोजगार योजनेची कामे हाती घ्यावयाची आहेत. सदर २३ कामांपैकी १७ कामे अध्यक्ष जिल्हा नागरी विकास यंत्रणा तळा जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या प्रशासकिय मंजूरीसाठी पाठविण्यात आलेली आहेत. तथापि, त्या कामामध्ये ६०:४० या प्रमाणाचा मेळ बसत नसल्याने उर्वरित साहित्त्य-मजूरीच्या रक्कमेशी मेळ ठेवण्यासाठी सदरची काही रक्कम महापालिका फंडातून खर्च करणे आवश्यक झाले आहे. त्यासाठी मा. जिल्हाधिकारी यांना सोबतच्या वर्गवारीप्रमाणे विगतवार देणे आवश्यक आहे.

नागरी रोजगार योजनांतर्गत करावयाच्या कामांसाठी शासनाकडुन आलेला निधी रुपये ४४.०० लाख उपलब्ध आहे. नागरी रोजगार योजनांतर्गत करावयाच्या कामांवर साहित्त्य व मजूरी यांवर अनुक्रमे ६०:४० या प्रमाणामध्येच नियमानुसार खर्च करावयाचा आहे. तथापि, साहित्त्य व मजूरी यांवर अनुक्रमे ६०:४० या प्रमाणामध्ये नियमानुसार खर्च बसत नाही. त्यामुळे शासन नियमानुसार या प्रमाणापेक्षा अधिक होणारा खर्च हा महानगरपालिका निधिमधून करावयाचा आहे. त्यांचा तपशिल पुढीलप्रमाणे.

| अ. क्र. | कामाची संख्या | अंदाजपत्रकीय रक्कम | उपलब्ध असलेल्या सुवर्ण जयंतीच्या निधीमधुन करावयाच्या ६०. ४० या प्रमाणातील खर्च ....................................... साहित्त्य | मजुरी | महानगरपालिका निधीमधून करावयाचा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | ५ |
| १ | २३ | ५२,४६,४९९ | १५४६७७५ | १०,३३१,०१३ | २६,६८,८१८ |
| . | एकुण | ५२,४६,४९९ | १५,४६,७७५ | १०,३१,०१३ | २६,६८,८१८ |

वरीलप्रमाणे एकूण २३ कामांची अंदाजपत्रकीय एकूण रक्कम रु. ५२,४६,४९९ होत आहे. त्यापैकी रुपये २५,७७,७८८ ही शासनाच्या सुवर्ण जयंतीचा उपलब्ध असलेल्या निधि मधून करण्यात येणार आहे. तसेच रूपये २६,६८,८१८ ही रक्कम महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तरतुदीमधुन खर्च करण्यासाठी महासभेची मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. त्यास मान्यता देण्याची विनंती आहे.



<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र. २७</u> <u>दिनांकः-३१.८.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. रमेश चव्हाण.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतील नागरी रोजगार योजने अंतर्गत करावयाच्या वर नमुद केलेल्या २३ कामांसाठी साहित्य व मजूरी यांवर अनुक्रमे ६० : ४० या प्रमाणापेक्षा अधिक होणारा खर्च रू. २६,६८,८१८/- ही रक्कम महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तरतुदीमधून खर्च करण्यास अर्थसंकल्पीय अनुदानाच्या योग्य समायोजनेच्या अधिन राहून प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>विषय :-</u>कल्याण संकुल अधिसूचित क्षेत्राची एकत्रित महानगरपालिका निर्माण करणे बाबत.

सूचकाचे नाव :-श्री. रमेश चव्हाण.

अनुमोदकाचे नावः-श्री. जमनादास पुरस्वाणी.

<u>प्रस्तावः-</u>

महाराष्ट्र शासनाने २२.७.९२ रोजी अधिसूचित केलेल्या कल्याण संकुलाचे क्षेत्र २२५ चौत्र किमी. असून यामध्ये उल्हासनगर महानगरपालिका, अंबरनाथ व कुळगाव-बदलापूर नगरपालिका व सभोवतालच्या ५६ गावांचा समावेश केलेला आहे.

शासनाच्या अधिसूचना क्र. टीपीएस/१२००/१९५७ प्र.क्र. ३२/२००१/नवि.१२ दि. १२ मार्च, २००१ अन्वये सदर क्षेत्राच्या नावात बदल करून सदर क्षेत्राला उल्हासनगर, अंबरनाथ, कुळगांव बदलापुर आणि परिसर अधिसूचित क्षेत्र असे करण्यांत आले आहे.

त्यातील उल्हासनगर या शहराचा विकास मुलतः निर्वासितांच्या पुर्नवसनासाठी सुमारे ५० वर्षापुर्वी करण्यांत आला त्यावेळी अंदाजे ९४,४०० निर्वासितांनी या संक्रमण छावणीमध्ये आश्रय घेतला होता. कालांतराने उल्हासनगर मध्ये नव्याने आर्थीक आणि सांस्कृतिक समाजाची उभारणी झाली. गेल्या पाच दशकामध्ये शहराची फार मोठया प्रमाणात वाढ होवून आता हे शहर उदयोगधंदयामध्ये प्रमुख केंद्र बनले आहे.

५० वर्षापूर्वीचा पहिला मास्टर प्लान मागे पडल्यानंतर ३०.४.१९७० रोजी उल्हासनगर टाऊनशिप विकास समितीने शहरासाठी विकास योजनेचा नकाशा प्रस्ताव व अहवाल शासनाला सादर केला होता. मात्र हा नकाशा मंजुर झाला नाही. तदनंतर

नगरपरिषदेने नगररचना अधिनियमातील तरतुदीनुसार विकास योजनेचे काम १९६४मध्ये सुरू करून शासनाला सादर केल्यानंतर १.७.१९७४ पासुन विकास योजनेचा नकाशा अंमलात आला.

१३३४ हेक्टर क्षेत्र असलेल्या उल्हासनगर महापालिका क्षेत्रात १९६१ साली १ लाख ७ हजार ७६० लोकसंख्या होती. १९७१ साली १ लाख ६८ हजार ४६२ झाली. १९८१ साली २ लाख ७३ हजार ६६८ तर १९९१ साली ३ लाख ६९ हजार७७ अशी वाढत गेली.

कल्याण संकुलातील अधिसूचित क्षेत्रातील नागरी लोकसंख्येच्या ६७ टक्के लोकसंख्या उल्हासनगर मध्ये केंद्रित झालेली असून अंबरनाथ व बदलापूर मध्ये हेच प्रमाण अनुक्रमे २३ टक्के व १० टक्के इतके आहे. याउलट एकूण नागरी क्षेत्राच्या १५ टक्के इतकेच क्षेत्र उल्हासनगर शहराने व्यापले आहे. ९१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येची स्थूल घनता २७७ प्रती हेक्टर इतकी दिसून येते उल्हासनगर शहर हे अतिशय दाट लोकवस्तीचे शहर झाल्याचे त्यातून दिसून येते.

--२--

९१ ते ९६ या कालावधीत उल्हासनगर महापालिकेने ४. ४३० सदनिका असलेल्या २२० इमारतीच्या बांधकामानाच परवानगी दिल्याचे दिसत असले तरी मोठ्या प्रमाणावर याच कालावधीत झालेल्या अनाधिकृत बांधकामांमुळे गृहनिर्माणात किती घरांचा पुरवठा झाला याचा हिशेब करणे अवघड झाले आहे. अनाधिकृत बांधकामाला मिळत गेलेले उत्तेजन आणि शहरातील गुन्हेगारी कारवाया या पार्श्वभुमीवर वित्तिय संस्थानी गृहनिर्माणासाठी कर्जपुरवठा करण्यात नेहमीच अनास्था दाखवली. त्याचा परिपाक म्हणुन शहरात झोपडपट्टयाची अनिर्बंध वाढ झाली. १९९७ च्या सर्वेक्षणानुसार १०५ झोपडपट्टयातील ६९ हजार झोपडयामध्ये ३ लाख ३७ हजार लोक राहतात. म्हणजेच ९१ च्या जनगणेनइतके लोक सध्या झोपडपट्टीमध्ये राहत आहेत. अनियोजित पध्दतीने वेगाने झालेल्या घरबांधणीमुळे शहरात सार्वजनिक सुखसोयी व सुविधा याकडे दुर्लक्ष झाले असुन नागरी प्रशासनापुढेही फार मोठे प्रश्न निर्माण झाले आहेत. पाणीपुरवठा, विजपुरवठा व रस्ते यावरील ताण वाढला आहे. त्याशिवाय दर्जात्मक शैक्षणिक व वैद्यकीय सुविधाचाही अभाव आहे. सामाजिक व सांस्कृतिक सुविधा अपु-या आहेत. उच्च घनतेच्या अनिर्बंध विकासामुळे वाहतूकीचे तसेच पार्कींगचे प्रश्न मोठया प्रमाणावर बिकट झालेले आहेत. पर्यावरणाच्या बाबतीतही चिंताजनक स्थिती आहे.

विकास योजनेतील आरक्षणावर अनधिकृत बांधकामे, झोपडपट्टया तसेच बहुमजली इमारती उभारल्या गेल्या असून मंजूर योजना निष्प्रभा झाली आहे. १८६ आरक्षणापैकी केवळ २१ आरक्षणे पालिकेने पूर्णपणे विकसीत केली आहेत. इच्छा शक्तीचा अभाव, अपुरा निधी, विकास नियंत्रण नियमावली बाबत अनादार, यंत्रणेचा अभाव व मोठया प्रमाणावर राजकीय दांडगाई ही त्याची प्रमुख कारणे आहेत.

अशा परिस्थितीत संपूर्ण अभ्यासाअंती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी नियोजन प्राधिकरण म्हणुन तयार केलेल्या व वास्तवाचे भान ठेवनू प्रस्तावित केलेल्या समान विकास नियंत्रण नियमावली अंतर्गत बनवलेल्या विकास योजनेची दाखल घेणे व तिचा स्विकार करणे अधिक संयुक्तिक ठरेल अनधिकृत बांधकामाखालील जमीन तसेच झोपडपट्टयाचा पुर्नविकास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रारूप आराखडयात प्रस्तावित केला आहे. मात्र सध्याचे महापालिका क्षेत्र वाढल्याशिवाय त्याची अंमलबजावणी शक्य नाही. या शहरातील तसेच परिसरातील भविष्यातील लोकसंख्येची संभाव्य वाढ लक्षात घेता लगतच्या काही गावांनाच महापालिका क्षेत्रात समाविष्ट करणे म्हणजे तात्पुरती मलमपट्टी ठरेल.

साठे कमिशनने शासनाला शिफारस केल्याप्रमाणे ठाण्यापासून बदलापूर पर्यंत एका प्रशस्त महापालिकेचे स्वप्न शासनाने पाहिले गेले होते. प्रशासकीय खर्चावर

नियंत्रण तसेच विकासाला वाव या दोन बाबी त्यातून साध्य होऊ शकल्या असत्त्या असून तसा प्रस्ताव उल्हासनगर महापालिकेने पुढाकार घेवून शासनाकडे पाठवणे गरजेचे आहे. उल्हासनगर महानगरपालिकेची दयनीय आर्थिक स्थिती, प्रशासनाचा खालावलेला दर्जा तसेच इच्छा शक्तीचा अभाव लक्षात घेता उल्हासनगर, अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसुचित क्षेत्राची एकत्रित महापालिका बनवणे हा एक रामबाण उपाय असून असा प्रस्तावउल्हासनगर महापालिकेने पुढाकार घेवून शासनाकडे पाठवणे गरजेचे आहे.

--३--

सदरच्या अधिसुचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रारून विकास योजना (१९९६-२०१६) तयार केली असून त्यांवर नागरिकाकडुन आक्षेप व सूचना घेण्यात आलेल्या आहेत. त्यांवर निर्णय करण्यासाठी शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६५ चे कलम २८ (२)च्या तरतुदीनुसार लवकरात लवकर समिती गठन करणे आवश्यक आहे. जेणेकरून विकास योजनेला अंतिम स्वरूप प्राप्त होवून शासनाची मान्यता मिळण्याच्या प्रक्रियेचा मार्ग सुकर होईल.

विकास योजनेला शासनाची मंजूरी मिळाल्यानंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रारूप विकास आराखडयातील प्रकरण १०. २३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्र, अंबरनाथ नगरपालिका क्षेत्र, कुळगाव-बदलापुर पालिका क्षेत्र तसेच ग्रामीण क्षेत्र कल्याण संकुल अधिसूचीत क्षेत्रातून वगळण्याची प्रक्रिया अंमलात आणणे शक्य होईल.

तरी, उल्हासनगर, अंबरनाथ, कुळगांव-बदलापुर आणि परिसर अधिसूचित क्षेत्राची एकत्रित महानगरपालिका निर्माण करण्यासाठी शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्तावित.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> २१ अ <u>दिनांकः-३१.८.२००२.</u>

ही महासभा कल्याण संकुल अधिसूचित क्षेत्राची एकत्रित महानगरपालिका निर्माण करणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता देत नाही.

<u>बहुमताने</u>

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>विषयः-</u> सन २००२-२००३ करीता श्री. गणेश दर्शन प्रतियोगिता आयोजन करणे संबंधी क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचा दिनांक २७.८.२००२ रोजीचा ठराव क्र. २ कायम करणे बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक समिती तर्फे दरवर्षी गणपती सणाच्या वेळी गणेश दर्शन स्पर्धा आयोजित केली जाते. याही वर्षी २००२-२००३ साली उल्हासनगर शहरातील सार्वजनिक गणेश मंडळाच्या गणेश दर्शन प्रतियोगिता चे आयोजन करण्याचे मा. सभापती क्रिडा समिती यांनी योजिले आहे. प्रतियोगितेमध्ये मंडळास उत्त्कृष्ठ मुर्ती, उत्त्कृष्ठ देखावा, उत्त्कृष्ठ विषय, उत्त्कृष्ठ राष्ट्रीय एकात्त्मता देखावा, उत्त्कृष्ठ धार्मीक वातावरण, उत्त्कृष्ठ स्वच्छता, उत्त्कृष्ठ शिष्टाचार, चलचित्र देखावा आणि अन्य विशेष प्रदर्शन अशी ९ पारितोषिके १ ते ४ क्रमांकाना देण्याचे आहेत. व इतर कामासाठी होणारा खर्च पुढील प्रमाणे आहे.

<u>१) स्पर्धेची पारीतोषिके</u>

पारितोषिक देण्यासाठी ४ क्रमांक ठेवले आहेत. एकुण ३६ आणि उत्त्तेजनार्थ २०० पारितोषिके ती पुढीलप्रमाणे.

१. १५ इंच x १५ इंच चषक प्रत्त्येकी रू. ५७५० एकूण नग ९रू ५१,७५०/-
२. १२ इंच x १२ इंच चषक प्रत्त्येकी रू. ४५००एकूण नग ९ रू४०,५००/-
३. १० इंच x १० इंच चषक प्रत्त्येकी रू४००० एकूण नग ९ रू३६,०००/-
४. ८ इंच x ८ इंच चषक प्रत्त्येकी रू३५०० एकूण नग९ रू. ३१,५००/-
५. ४ इंच x ६ इंच उत्त्तेजनार्थ चषक प्रत्त्येकी रू२००
एकूण नग २०० रू. ४०,०००/-

(बक्षिसांचा अंदाजित रूपये खर्च १,९९,७५०/- ...............................
रू. एक लाख नव्याण्णव हजार सातशे पन्नास) एकुण रू. १,९९,७५०/-

२) व्हीडीओ कॅमेरा शुटिंग २४ कॅसेट व एक मास्टर कॅसेट
संकलन ध्वनी मुद्रण इत्त्यादी साहित्त्य दोन मुव्ही
कॅमेरा ११ दिवस ६०,०००/-

<u>३. फोटोग्राफर खर्च</u>

फोटोग्राफी ८० फोटो प्रत्त्येकी दिवशी प्रत्त्येकी रू२६/- २३,०००/-

<u>४. छपाई खर्च</u>

अ)प्रमाणपत्र ३ प्रकारची एकूण ३०० नग प्रत्त्येकी रू. १५/- ४,५००/-
ब)निमंत्रण पत्रिका कव्हरसह ३०० नग प्रत्त्येकी रू. १०/- ३,०००/-
क)गुणपत्रिका २५०० नग प्रत्त्येकी रू२/- ५,०००/-
ड)कापडी बॅनर ३ फुट x ९ फुट ५ नग प्रत्त्येकी ३०० रू. १,५००/-
इ) समितीच्या सदस्यांना एक्झीक्युटीव्ह फाईल २५ नग
२०० प्रत्त्येकी रू. ५०००/-
फ)बॅचेस २५ नग १० रू. रू२५०/-
पेन २५ नग रू४० प्रमाणे रू. १०००/-

--२--

<u>बक्षीस समारंभाचे दिवसाचे खर्च :-</u>

१. खूर्च्या ५०० नग प्रत्त्येकी ८ रू. ४,०००/-
२. टेबल (कव्हर सह) १० नग प्रत्त्येकी ७० रू. ७००/-
२. तीन्ही बाजुने बंद करण्यासाठी कापड लावणे

८० फुट x १५ फुट १,२००/-
४. ध्वनी क्षेपण १०००/-
५. नारळ ५० नग प्रत्त्येकी १० रू. ५००/-
६. हार ५० नग प्रत्त्येकी ४० रू २,०००/-
७. शाल ५० नग प्रत्त्येकी रू१५०/- ७,५००/-
--------------------
एकुण :- १६,९००/-

८)मुर्ती व सजावट परिक्षणासाठी मुर्तीकार व सजावटकार यांना ११ दिवसाचे मानधन प्रत्येकी रू. २,५००/- ५,०००/-

१)३३ व्यक्तीसाठी एक वेळ जेवण स्पेशल राईसप्लेट
११ दिवसांसाठी प्रत्येकी१०० रू. ३६,३००/-
२)३३ व्यक्तीसाठी दोन वेळेस चहा प्रत्यकी रू. ३ प्रमाणे
११ दिवस २,१७८/-

उपरोक्त कार्यक्रमाचा अंदाजित खर्च रू. ३,६३,३७८/- सदरचा खर्च महापालिकेने केलेल्या अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष क्र. ४ (IV) इतर सांस्कृतिक कार्यक्रमाखाली केलेल्या तरतुदीमधुन करावयाचा आहे.

तरी उपरोक्त श्री गणेश दर्शन प्रतियोगीता २००२यावरील एकुण अंदाजित खर्च रू. ३,६३,३७८/- असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीनुसार दरसूची तथा निविदा व्दारे कारवाई करून संबंधित विभागामार्फत करण्याचे प्रस्तावित असून प्रथम क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती समोर ठेवणेस प्रस्तावित आहे.

<u>क्रिडा,समाज कल्याण व सांस्कृतिक समिती ठराव क्र. २ दि.२७.८.२००२</u>

सुचकाचे नाव :- श्री. लबाना होशियारसिंग

अनुमोदकाचे नाव :- श्री. रिझवानी सुजाता

हि क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती महासभेच्या अधिन राहुन वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे श्री. गणेश दर्शन प्रतियोगिता-२००२ आयोजित व कार्यान्वीत करणे कामी अनुषंगिक, पारितोषिके, व्हीडीओ शुटींग, वाहन,प्रमाणपत्रे, जाहिरात, बॅनर, छायाचित्रे इत्त्यादी व्यवस्थेकामी रू. ३,६३,३७८/-च्या अंतर्भूत खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे. व मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या स्वइच्छेनुसार त्या नेमतील त्या सदस्यांच्या समितीस स्विकृती देत आहे.

तसेच मा. महापौर ज्या सदस्यांच्या समितीची रचना करतील ती अंतिम राहिल आणि ती या ठरावाचा भाग मानला जाईल.



या विशेष समितीस आपल्या निर्णयानुसार श्री. गणेश दर्शन प्रतियोगीतेचे आयोजन करून कार्यान्वीत करणे कामी विलंब झाल्यास त्यामुळे अत्त्यंत गैरसोयीचे होईल असे वाटल्यास सदरचा ठराव महासभेकडुन कायम होण्याची वाट न पाहता श्री. गणेश दर्शन प्रतियोगीतेचे आयोजन करून कार्यान्वीत करता येईल.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

उपसभापति / पिठासीन अधिकारी

क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> २८ <u>दिनांकः-१९.९.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. राजु टेकचंदानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. रूपानी चिमन

ही महासभा क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समितीचा वर नमुद केलेला दि. २७.८.२००२ रोजीचा ठराव क्र. २ अंर्तगतचा निर्णय कायम करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>विषयः-</u> महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास वाढीव पाणी पुरवठा पोटी स्टॅण्डींग चार्जेस भरणे बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

उल्हासनगर महानगरपालिका, म. औ. वि. महामंडळाकडून पाणी विकत घेवून उल्हासनगर शहरास पाणीपुरवठा करते, उल्हासनगर पाणी पुरवठा योजना दि. १९.११.१९९४ पासून उल्हासनगर पालिकेने, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाकडून ताब्यात घेतलेली असून तेव्हापासुन ९९. ७७ एम.एल.डी. एवढया पाणी पुरवठयाचे परिमाण मंजुर आहे, परंतु महानगरपालिका सध्या अंदाजे १०८ ते ११३ एम.एल.डी. एवढे पाणी घेत आहे. म्हणजेच मंजूर परिमाणापेक्षा जास्त पाणी घेत आहे, म्हणुन म.औ.वि महामंडळाने मार्च २००२ या महिन्यापासून स्टॅंडिंग चार्जेस भरणेबद्दल त्यांचे इंग्रजीपत्र क्र.पी. ए.-४/१४२८ दि. २३.५.२००२ नुसार कळविले आहे. व त्यासाठी रू. १,०६,२२०/- प्रति एम.एल.डी. प्रति माह स्टॅण्डींग चार्जेसच्या देयकाची मागणी केलेली आहे. जर उल्हासनगर महानगरपालिका सदर चार्जेस भरण्यांस तयार नसेल तर उल्हासनगर महानगरपालिकेस मंजूर परिमाणा प्रमाणेच(९९. ७७ एम.एल.डी.) पाणी देण्यात येईल, असे कळविले आहे.

दि. ८.७.२००२ व दि. ९.७. २००२ रोजी म.औ.वि. महामंडळाच्या अधिका-यांबरोबर, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) उमपा यांची चर्चा झाली त्यानुसार म.औ.वि महामंडळाने पाणी देयक व स्टॅंडिंग चार्जेस देयकासाठी वेगवेगळे धनादेश देण्याची मागणी केलेली आहे.

म.औ.वि. मंडळाने मार्च २००२ ते जुन २००२ पर्यंत एकूण रू. ५८,७३,७५३ स्टॅण्डिंग चार्जेस ची देयके सादर केलेली आहेत. उल्हासनगर महानगरपालिकेने १ ऑगस्ट २००२ पर्यंत सदर चार्जेस देयके अदा न केल्यामुळे म. औ.वि. महामंडळाने २ ऑगस्ट २००२ पासून पाणी कपात केली म्हणुन स्टॅण्डींग चार्जेसची रक्कम मुळ देयकात समायोजित करण्याचे हक्क कायम ठेवून नाईलाजास्तव (Under protest) रू. २८ लाखाचा धनादेश म.औ.वि. महामंडळास देण्यात आला.

तरी पाणी कपात टाळणेसाठी स्टॅण्डींग चार्जेस देयक रू. १,०६,२२०/-प्रति एम. एल.डी. प्रति माह वेगळया धनादेशाने म. औ. वि. महामंडळास अदा करणे बददलचा प्रस्ताव महासभेच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र. २९</u> <u>दिनांक:-१९.९.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. भालेराव गौतम

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास वाढीव पाणी पुरवठ्यापोटी स्टॅण्डींग चार्जेस देयक रू. १,०६,२२०/- प्रति एम.एल.डी. प्रतीमहा देणेस मान्यता देत आहे.

--२--

परंतु---

१. वरील प्रस्तावात काहीही अंतर्भूत असले तरी, स्टॅण्डींग चार्जेस परतावयाची मागणी व मूळ पाणीपटटी देयकात समायोजित करण्याचे हक्क प्रस्थापित करता येईल.

२. शहराबाहेर आयुक्त कोणत्त्याही स्थानिक प्राधिकरणास किंवा व्यक्तीस महानगरपालिका जलव्यवस्था यंत्रणेतुन पाणी पुरवणार नाही.

३. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास पाणी पुरविणेसंबंधी देय असलेली रक्कम महानगरपालिकेच्या मीटर मोजणी प्रमाणे देता येईल.

४. सध्या शहराबाहेर किंवा कल्याण क्षेत्रात कोणत्त्याही स्थानिक प्राधिकरणास किंवा व्यक्तीस महापालिका जलव्यवस्था यंत्रणेतुन पाणी पुरविणे बददल देय असलेल्या रक्कमेसंबंधी मागणीची नोटीस योग्य रितीने बजावण्यात आल्यानंतर एक महिन्याच्या आत देण्यात कसूर करण्यात आली तर पाणी बंद करणेचा अधिकार आयुक्तांस राहील.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

बहुमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- श्री. पंचम विश्वकर्मा, विदयुत लिपिक, यांचे खाते निहाय चौकशी प्रलंबित निलंबन आदेश कायम करणे बाबत.

प्रस्तावनाः-

श्री. पंचम विश्वकर्मा विद्युत लिपीक हे श्रीमती. सोनादेवी हायस्कुल ॲन्ड ज्युनियर कॉलेज ॲन्ड डिग्री कॉलेजचे ट्रस्टी उपाध्यक्ष असल्याने सदर संस्थेस शासनाची मंजुरी नसल्यामुळे विद्यार्थ्यांकडून प्रवेश फी, विद्यार्थी फंड व इतर फी चे स्वरूपात पैसे घेवून विद्यार्थ्यांना सन २००१ या शैक्षणिक वर्षात परिक्षा पासून वंचित ठेवून त्यांची फसवणुक केल्यामुळे त्यांचेवर गुन्हा रजि. नं. ३०/२००२ भा.दं.वि. कलम ४६५ ,४६८ ,४२० ,४७१ ,३४ प्रमाणे दि. २६.२.२००२ रोजी १३. ५० वा. दाखल झाला असता सदर गुन्हयात त्यांना दि. ४.३.२००२ रोजी १३. ०५ वा. अटक करण्यात आली होती व दि. ८.३.२००२ रोजी पोलिस रिमांड घेण्यात आली होती.

सबब म.ना. सेवा (शिस्त व आपिल) प्रकरण २ नियम ४ पोट नियम २ अ नुसार ४८ तासापेक्षा जास्त कालावधीसाठी पोलिस कोठडीत असल्यामुळे श्री. पंचम विश्वकर्मा, विद्युत लिपिक यांना कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टै-५/१६/०२ दि. १० मे, २००२ अन्वये सेवेतुन तात्त्काळ निलंबित करणेत आलेले ओह.

मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१)(ब) नुसार सदर प्रकरण महासभेपुढे ठेवून निलंबन कायम करणेसाठी प्रस्तावित आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ३० दिनांकः-१९.९.२००२.

सुचकाचे नाव :- श्री. अंकुश म्हस्के

अनुमोदकाचे नाव :- श्री. होशियारसिंग लबाना

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. पंचम विश्वकर्मा विद्युत लिपिक यांना आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे निलंबनाधिन ठेवणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

आयत्त्यावेळचा विषयः-

विषयः-निरूपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्याकरीता मागविलेल्या निविदेस मंजुरी मिळणे बाबत.

प्रस्तावनाः-

सादर करण्यात येत आहे की विद्युत विभागा मार्फत निरूपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्यासाठी ३ वर्तमान पत्र म्हणजे फ्री प्रेस (इंग्रजी), नवशक्ती (मराठी), नवभारत (हिंदी)यात निविदा सुचना देवून सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्त्या.

त्यांच्या प्रतिसादास १. श्री. राम नारायण पांडे, २.मे. एस.आर.ट्रेडेर्स, ३. श्री. रफिउल्हा खान, ४. श्री. नसीबदार बहादुर शेख, ५. मे. हसमुदिन इन्टरप्राईजेस, ६. श्री. शेख शालेह, ७. मे. शाहा इंन्टरप्राईजेस, ८. श्री. जहांगीर खांन, ९. श्री. अलंमगिर खान, १०. श्री. आशिक अल्ली जी शाहा, ११. मे. फैजी सक्रॅप, १२. मे. अमर टेड्रिंग कंपनी, १३. श्री. पवन कुमार पांडे, १४. मैं. ऐशिया स्टिल, १५. मे. रिशीब मेटल कॉपारेशन. १६. मे. जे.के. लोखंडवाला, १७. श्री. तहावर हुसेन, १८. मे. अे. एस. स्टीलस, १९. मे. तवाब हुसेन ट्रेडर्स, २०. मे. एस.एम. भटटीवाला, २१. मे. आदव असोसियटस् २२. मे. महाराष्ट्र टायर सर्व्हीस, २३. युनिक ट्रेडर्स, २४. मे. सुखमाणी ॲटोमबाईल्स २५. श्री. नशीबउली हजी मेहमुद व २६. मे. साबा ट्रेडर्स यांनी कोरे निविदा चे प्रपत्र खरेदी केले आहे.

सदर निविदा इशारा रक्कमे सह सादर करण्याची मुदत २९.८.२००२ रोजी दुपारी ३ वाजे पर्यंत होती ती वाढून दिनांक ३०.८.२००२ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत आली होती तिथपर्यंत ३ निविदा धारकांनी इशारा रक्कमे सह सिलबंद निविदा सादर केल्या व ते दिनांक ३.८.२००२ रोजी. १६. ०५ वाजता उघडण्यात आल्या त्याच्या तुलनात्त्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निरूपयोगी साहित्त्यांची माहिती | अंदाजित परिमाण | ठरविलेली किंमत रू. | श्री. आर. एन.पांडे किंमत रू. | श्री. तहावर हुसेन किंमत रू. | श्री. शेख शालेह किंमत रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २५० चौक (कॉपर) | ६००० नग | ९०. २५ | ७०/- (टॅक्स सहित) | ६१. ०० | ९०. ३० (टॅक्स सहित) |
| २. | केबल आणि वॉयर (ॲल्युमिनीयम) | २००० किलो | ३. ०० | २५/- (टॅक्स सहित) | १८. २५ | १५. ६० (टॅक्स सहित) |
| ३. | जी.एस.एम. एस.जी. आय भंगार | २००० किलो | ८. ५० | ६/- (टॅक्स सहित) | ६. २५ | ६. ८० (टॅक्स सहित) |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४. | अल्यूमिनियम भंगार | ४०० किलो | ८५.७६ | ६५/- (टॅक्स सहित) | ६६.२५ | ८० . २५ (टॅक्स सहित) |

सदर तुलनात्मक तक्त्यानुसार ॲटम क्रमांक २ मध्ये श्री. आर.एन. पांडे यांनी दिलेले दर सर्वात जास्त व वाजवी आहे. परंतु ॲटम क्रमांक१ , ३ , व ४ मध्ये श्री. शेख शालेह यांनी दिलेले दर सर्वात जास्त असुन ठरविलेली किंमती पेक्षा कमी असल्याने श्री. शेख शालेह यांना पत्र क्र. २२० दिनांक ३.९.२००२ अन्वये दिनांक ४.९.२००२ रोजी उप आयुक्त मुख्यालय यांच्या दालनात बोलवण्यात आले व उप आयुक्त (मुख्यालय) मुख्य लेखा परिक्षक व कार्यकारी अभियंता (विद्युत) यांच्या समक्ष वाटाघाटी करण्यात आली. वाटाघाटी नंतर त्यांनी खालील प्रमाणे लिहुन दिले.

आज दिनांक ४.९.२००२ रोजी विद्युत विभागातील निरूपयोगी समानाची विल्हेवाट लावण्याच्या निविदेतील बाब क्र.१ ,३ व ४ मधील मि दिलेले दरामध्ये वाटाघाटी करून दर वाढविण्यासाठी उप आयुक्त (मुख्यालय)यांच्या दालनात उप आयुक्त मुख्यालय, मुख्य लेखा अधिकारी , मुख्य लेखा परिक्षक कार्यकारी अभियंता (विद्युत) यांचे समक्ष मी हजर होतो तथापि मी संबंधित निविदेच्या संबधात दिलेले दर योग्य असून त्यामध्ये वाढ करून ईच्छुक नाही.

श्री. शेख शालेह यांनी कुठल्याही ॲटम मध्ये वाढ देण्यास नाकारल्यामुळे शासनाच्या पध्दती नुसार सर्व निविदा धारकांना ॲटम क्रमांक १ ,३ ,व ४ यासाठी परत सिलबंद लखोट्यात पुन: विचार करून दर मागविणेस आदेश देवून सिलबंद लखोटे स्विकार करण्यासाठी उप आयुक्त (मुख्यालय)यांना प्राधिकृत करण्यात आले.

तिन्ही निविदा धारकांना पत्र क्रमांक उमपा/विद्युत/२३३ दिनांक ६.९.२००२ अन्वये पुर्न: विचार करून सुधारित दर देण्यासाठी विनंती करण्यात आली. सदर पत्राच्या प्रतिसादास तिन्ही ऐजेन्सीने दिनांक १७.९.२००२ रोजी ठीक १५.३० वाजता सिलबंद लखोट्यात सुधारित दर सादर केले. त्याच्या तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | निरूपयोगी साहित्यांची माहिती | अंदाजित परिमाण | ठरविलेली किंमत रू. | श्री. आर.एन. पांडे किंमत रू. | श्री. तहावर हुसेन किंमत रू. | श्री. शेख शालेह किंमत रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २५० चौक (कॉपर) | ६००० नग नेट रेट | ९०.२५ | ९१.०० (टॅक्ससह) ७८.९२ | ७२.९३ (टॅक्ससह) ६३.२५ | ९१.४० (टॅक्ससह) ७९.२७ |
| २. | जी.एस. एम.एस. जी. आय. भंगार | २००० किलो नेट रेट | ८.५० | ...... | ६ .८५ (टॅक्ससह) ६.५० | ६ .८० (टॅक्ससह) ६.४५ |
| ३. | ॲल्युमिनियम भंगार | ४०० किलो नेट रेट | ८५.७६ | ..... | ..... | ८०.२५ (टॅक्ससह) ७६.१३ |

सदर तुलनात्मक तक्त्यानुसार श्री. शेख शालेह यांचे सुधारीत दर ॲटम क्रमांक १ ते ४ मध्ये सर्वात जास्त व ठरलेली किंमतीपेक्षा कमी आहे. श्री. तहावर हुसेन यांचे सुधारीत दर ॲटम क्रमांक ३ मध्ये सर्वात जास्त व ठरलेली किंमती पेक्षा कमी आहे. ॲटम क्र.२ मध्ये निविदेत पुर्वीच रू. २५/- प्रति किलो (टॅक्स सह) ठरलेल्या रक्कम रूपये ३/- पेक्षा जास्त आहे.

ॲटम क्र. १ ,३ व ४ यांचे सुधारीत दर ठरलेल्या रक्कमे पेक्षा कमी असून ते मंजूर करण्यास शिफारस आहे कारण १. पावसाळी कालावधीमध्ये भंगार सामानास गंज चढून त्यांचे पुन्हा वजन कमी होवून अंतिम मूल्य कमी होण्याची शक्यता आहे. २. महापालिका मुख्यालयाच्या आजूबाजूला लोकवस्ती असून मालमत्तेचे चोरीची शक्यता नाकारता येत नाही व दुस-या प्रकारे पण नुकसान झाल्याच्या घटना घडलेल्या आहे. ३. दर जास्त मिळणेस एकूण तीन वेळा प्रयत्न करणेस आलेला आहे. ४. हे भंगार सामान आहे व मौल्यवान जागा व्यापून बसलेले आहे. ५. शासनाने परिपत्रक क्रमांक सीडीआर१००२/प्र.क्र.१०/०२/अकरा दिनांक २२.८.२००२ अन्वये निमशासकीय कार्यालयामध्ये दिनांक १.९.२००२ ते दिनांक ३१.१०.२००२ या कालावधीत स्वच्छता अभियान राबविण्याचे आदेश निर्गमीत केले आहे. ६. सध्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमान (प्रगती) अभियान स्पर्धा चालु आहे. त्या दरम्यान हे भंगार समान विल्हेवाट करून घेणे योग्य राहील.

सदर सर्व बाबी लक्षात घेता खालील प्रमाणे सर्वात जास्त दराला मंजुरी देवून ज्या ॲटम मध्ये ज्या निविदा धारकांचे दर सर्वात जास्त आहे, त्याच्या निविदेस मान्यता देण्याची शिफारस आहे.

| अ.क्र. | निरूपयोगी साहित्त्यांची माहिती | अंदाजित परिमाण | ठरविलेली किंमत (नेट)रू. | सर्वात जास्त निविदा दर रू. | सर्वात जास्त दराचे निविदा धारकांचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | २५० चौक (कॉपर) | ६००० नग | ९०. २५ | ९१. ४० (टॅक्स सह) | श्री. शेख शालेह |
| २. | केबल आणि वॉयर (ॲल्युमीनीयम) | २००० किलो | ३. ०० | २५/- (टॅक्स सहित) | श्री. आर. एन. पांडे |
| ३. | जी. एस.एम. एस.जी. आय. भंगार | २००० किलो | ८. ५० | ६. ५० (नेट) | श्री. तहावर हुसेन |
| ४. | अल्युमीनीयम भंगार | ४०० किलो | ८५. ७६ | ८०. २५ (टॅक्स सह) | श्री. शेख शालेह |

दिनांक १९.९.२००२ च्या महासभेत आयत्त्या वेळीचा विषय म्हणुन घेण्यास व महासभेने जर प्रस्ताव मान्य केला तर इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता त्वरीत अंमलात आणणे योग्य राहील कारण शासनाने परिपत्रक क्रमांक सीडीआर१००२/प्र. क्र.१०/०२/अकरा दिनांक २२.८.२००२ अन्वये निमशासकीय कार्यालयामध्ये दिनांक १. ९.२००२ ते दिनांक ३१.१०.०२ या कालावधीत स्वच्छता अभियान राबविण्याचे आदेश निर्गमीत केले आहे तसेच दोन ऑक्टोबर पुर्वी राजीव गांधी प्रशासकीय गतिमान (प्रगती) अभियान स्पर्धा अंतर्गत त्या जागेची साफसफाई होईल. मा. महासभेच्या मान्यतेसाठी सादर.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ३१</u> <u>दिनांकः-१९.९.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. राजु टेकचंदानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. दिलीप गायकवाड.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर महानगरपालिकेचे विद्युत विभागातील निरूपयोगी जंगम मालमत्तेची विल्हेवाट करण्यास मान्यता देत आहे.

वरील निर्णय अंतर्भूत असणारा ठराव कार्यवृत कायम होण्याची वाट बघितल्या शिवाय, त्वरीत अंमलात आणण्यासाठी तो कायम झाल्याचे समजण्यात येईल व पुढील सभेत कार्यवृत्त कायम होण्यापूर्वी तो अंमलात आणता येईल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>शोक प्रस्ताव :-</u>

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार श्री. विलासरावजी देशमुख यांचे वडील श्री. दगडुजीराव व्यंकटराव देशमुख याचे नुकतेच निधन झाले. त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ३१अ <u>दिनांकः-१९.१०.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. ठाकुरदास बेहरानी.

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. दगडुजीराव व्यंकटराव देशमुख, यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
| ४३. | २८/१०५६ | गुल अछरा<br>ब्लॉक सी ४ शेजारी, |
| ४४. | २८/१०५५ | गुल अछरा<br>ब्लॉक सी ४ |
| ४५. | ३७/७५४ | मोहम्मद एम. उस्मान खान<br>स्मीता निवास, श्यामसुंदर सोसायटी समोर ,उल्हासनगर-३ |
| ४६. | ३७/७३३ | चेटुमल परशुमल<br>बॅरेक नं. १०९७ उल्हासनगर ३ |
| ४७. | ३७/७३५ | प्रीभोमल लागोमल<br>बॅरेक नं. १०९७ उल्हासनगर-३ |
| ४८. | ३७/७३६ | आशा यु. केलवानी<br>बॅरेक १०९७, उल्हासनगर-३ |
| ४९. | ३७/७३७ | किशन दलवानी<br>बॅरेक १०९७, उल्हासनगर-३ |
| ५०. | ३७/७१६ | जमनाबाई वाधवानी<br>राधेश्याम कोऑ. सोसायटी, फ्लॅट नं. १६ उल्हासनगर-३ |

त्याअर्थी नविन आकारणी पुस्तकात पुढील ज्या काही गोष्टी असल्या पाहिजेत त्या नाहीत.

अ) ज्या कोणत्त्याही व्यक्तीचे नाव ज्या रीतीने दाखल करणे आवश्यक असेल त्या व्यक्तीचे नाव त्यात दाखल करून किंवा पुर्वी वगळण्यात आलेल्या कोणत्त्याही जागा त्यात दाखल करून.
ब) मालमत्ता कर देण्यास जबाबदार नसलेल्या कोणत्त्याही व्यक्तीचे नाव काढुन टाकून.
क) कोणत्त्याही कर योग्य मुल्यांची आणि त्यावर आधारलेल्या आकारणीचीच रक्कम वाढवून किंवा कमी करून
ड) ज्या कोणत्त्याही जमिनीचे किंवा इमारतीचे मुल्य चुकीचे ठरविण्यात आले असेल किंवा जिची आकारणी लबाडीने अभावितपणे किंवा चुकीने करण्यात आली असेल त्या जमिनीवरील किंवा इमारतीवरील आकारणीत फेरफार करून.

मे. टाटा इन्फोटेक ह्या कंपनीने नविन कर आकारणी पुस्तकात काहीही नविन गोष्टी समाविष्ट केल्या नाहीत व मागील वर्षाच्या कर आकरणी पुस्तकात असलेले सर्व दोष जसे आहेत तसे कॉम्प्युटर ॲडसच्या फ्लॉपीवरून आधार सामुग्री प्रस्तुत केली आहे महानगरपालिकेने त्या सामुग्रीसाठी किंवा त्या कर्तव्यासाठी किंवा त्या फसवणूकीसाठी ८४ लाखाची रक्कम दयावी हे योग्य आहे का? यासाठी जबाबदार कोण? ह्या महासभेचे मत आजमावून तत्त्कालीन मा. महापौरांनी त्यांचा ठेका रदद करण्याबाबत दिलेला निर्देश टाळून टाटा इन्फोटेक यांना प्रत्त्येक वेळी दिलेली मुदत वाढीची संधी महापालिकेला काय उपयोगात आली? करिता त्यांचे परिणाम महापालिकेच्या आर्थिक स्थितीवर झालेले आहेत. टाटा इन्फोटेक कंपनीने सन २०००-२००१ करिता नविन कर आकारणी पुस्तक तयार केले नसून २००१-२००२ चे कर आकारणी पुस्तक सुध्दा तयार केलेले नाही त्यामुळे या दोन्ही वर्षाचे नविन कर आकारणी पुस्तकापोटी अपेक्षित वाढीव उत्त्पन्न दाव्यात ठेवून महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. ज्याअर्थी या कंपनीला महासभेच्या मताविरूध्द प्रशासनातर्फे पॅरेलल रनच्या दृष्टीने नविन कर आकारणी पुस्तक त्याच्याकडुन तयार करण्याचे योजिले त्याचा परिणाम आश्चर्यजनक आहे. कारण कंपनीने सरकारी वर्षात मागील वर्षाच्या कराबददल उत्त्पन्नात केवल १७ लाखाची वाढ विनिर्देशित केलेली आहे. आणि कंपनीला देय असलेले बिल ८४ लाख रूपयांचे असून त्या कंपनीला पुढची पाऊले उचलण्यास काहीच अर्थ नाही. मागील सन १९९६ -९७ साली कराबददल नविन कर आकरणी पुस्तक तयार करण्यांत आले होते त्यानंतर सन २०००-२००१ मध्ये नविन कर आकारणी पुस्तक तयार करण्यांत विलंब झाल्याने व टाटा इन्फोटेक कंपनीला दिलेल्या कर आकारणी पुस्तका प्रमाणे दर वर्षी १७ लाख पेक्षा जास्त उत्त्पन्न आढळत नाही. सन १९९६-९७ पासून प्रत्त्येक वर्षाचे जर नगररचना विभागातील माहिती अनुसार सरासरी २०० इमारतींचा बांधकाम विकास आराखडा मंजुर होतात आणि त्याच हिशोबाने सन १९९६-९७ नंतर कमीत कमी १८०० इमारतींचे बांधकाम नकाशे मंजुर झाल्याने जर त्यांचा नविन कर आकारणी पुस्तकात समावेश केल्यास तर त्यापोटी कमीत कमी नविन इमारतीच्या कर योग्य मूल्य निर्धारणामुळे एक कोटी पेक्षा जास्त उत्त्पन्न वाढविण्याची शक्यता नाकारता येणार नाही. या कंपनीने कॉम्प्युटर अडसच्या फ्लॉपी आधारे जसे आहे तसे कर आकारणी पुस्तकात सामुग्री प्रस्तुत केल्याने संविदेच्या अटी शर्ती व अभिवचनाचे उल्लंघन केले आहे आणि त्या कंपनीसाठी महासभेचे मत, नियम, संविदेतील अटी व शर्ती आणि महापालिकेचे आर्थिक उत्त्पन्न दाव्यात बसवून विशेष मेहर करण्याची आवश्यकता भासत नाही म्हणून सदरच्या कंपनीचा ठेका पुर्व सूचनेच्या अधिन राहून रदद बादल करणेस प्रस्तावित.



<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ४३ <u>दिनांकः-१९.१०.२००२.</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार मालमत्ता करांबददल नविन कर आकारणी पुस्तक तयार करण्यासंबंधी टाटा इन्फोटेक कंपनीला दिलेल्या ठेक्याची

संविदा रदद करण्याबददलच्या प्रस्तावास आवश्यक त्या पुर्व सूचनांच्या अधिन राहून मान्यता देत आहे.

कारण :-

१. कारण या कंपनीने कराराच्या दिनांकापासुन विहित ४ महिन्याच्या कालावधीत कर्तव्य पार पाडले नाही.
२. कॉम्प्युटर ॲडसच्या फ्लॉपी आधार सामुग्री नविन कर आकारणी पुस्तकात जसे आहे तसे प्रस्तुत करणे.
३. प्रत्येक इमारतीच्या किंवा जमिनीच्या कर योग्य मुल्य निर्धारणासाठी त्यांचे क्षेत्रफळ नकाशासह प्रस्तुत न केल्याने.
४. नविन कर आकारणी पुस्तकात इमारती व जमिनी संबंधी आवश्यक गोष्टीचा समावेश नसल्याने किंवा कमतरता असल्याने
५. संविदेतील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याने
६. चुकीची माहिती देणे, आणि प्रामाणिकपणा न दर्शविणे.
७. इतर.

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

दिनांक :-

प्रति,
शहर अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
उल्हासनगर महानगरपालिका.

<u>विषय :-महिला प्रसाधनगृहा बाबत.</u>

मा. महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, आस्थापना विभागा शेजारी असलेल्या महिला प्रसाधनगृहाची व्यवस्था ठिक नसल्याने बरीच अडचण निर्माण होते, तसेच तिथे एका प्रसाधनगृहात कॉमन शौचालय बांधण्याची सोय करावी. कारण तिथे इंग्रजि पध्दतीचे कमोट बसविल्याकारणाने बरीच गैरसोय होते. तसेच दोन्ही ठिकाणी पाण्याची भरपुर सोय नसल्याने योग्य अशी स्वच्छता राखली जात नाही. तरी महिलांना होणारा त्रास लक्षात घेऊन होणा-या गैरसोयीचे योग्य त-हेने निवारण करावे ही नम्र विनंती.

आपले विश्वासु
(महिला कर्मचारी)

# उल्हासनगर महानगरपालिका

आयत्यावेळचा विषय:-

प्रस्तावना:-

उल्हासनगर महानगरपालिका ठराव क्र. ८ दिनांक २४.५.२००२ अन्वये मनपा मालकीचे मैदान व उदयाने यांचे भुई भाडे खालीलप्रमाणे मंजूर केलेले आहेत.

१. मैदाने/ उद्याने नोंदणीकृत ट्रस्ट व नोंदणीकृत संस्था व इतरांना सार्वजनिक पुजा अर्चा किंवा सार्वजनिक धर्मदाय प्रयोजनासाठी किंवा राजकीय पक्षाच्या सभेसाठी किंवा खेळांच्या स्पर्धेसाठी ज्याचा फायदा मिळवण्याचा उददेश नाही. अशा वापरासाठी स्तंभ क्र. ६ मध्ये निर्दीष्ठ केलेल्या रक्कमेऐवजी केवळ ५०० रूपये भुईभाडे आकारण्यात येईल.
२. मैदाने/ उद्याने लग्न समारंभ किंवा व्यावसायिक कामासाठी किंवा इतर कुठल्याही कार्यक्रमाच्या वापरासाठी स्तंभ क्र. ६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या रक्कमेऐवजी त्याच्या ५ पट रक्कम भुईभाडे म्हणून आकारण्यात येईल.
३. मैदाने /उद्याने, मुंज किंवा वाढदिवसाच्या प्रयोजनासाठी स्तंभ क्र.६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या ____________ रक्कमेच्या आकाराप्रमाणे वापरण्यास देण्यात येतील.

उपरोक्त अ. क्र. २ अन्वये मैदाने व उद्याने व्यावसायिक कामासाठी भुई भाडयाने दिल्यास स्तंभ क्र. ६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या रक्कमेऐवजी त्या रक्कमेच्या ५ पट रक्कम भुईभाडे म्हणुन आकारण्याचे मंजुर केले आहे. परंतु किरकोळ फटाका विक्रेत्त्यांना सदर जागेवर भूईभाडे रूपये ३७५/- प्रतिदिन, प्रतिगाळा, (१० x १५ फुटासाठी ) आकारणी होते. सदरचे भुईभाडे हे जास्त होत आहे. अशा फटाका विक्रत्त्यांच्या तक्रारी आहेत. तसेच मा. मुंबई उच्च न्यायालय यांच्या आदेश असल्यामुळे किरकोळ फटाका विक्रेते इतरत्र ही किरकोळ फटाक्यांची विक्री करू शकत नाही.

महानगरपालिकेतर्फे मा. मुंबई उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र. ९७ /२००१ मध्ये किरकोळ फटाका विक्रीसाठी गोलमैदान, व्ही.टी.सी मैदान व दसरा मैदान येथे किरकोळ फटाका विक्रेत्त्यांना खुली जागा उपलब्ध करून देण्याचे नमुद केले आहे. याबाबत अपघात घडून शहरातील जिवित हानी, वित्तहानी, टाळण्यासाठी तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सदरच्या जागी तात्पुरत्त्या स्वरूपात किरकोळ फटाका विक्रेत्त्यांना उपलब्ध करून देण्यात येतील असे मा. मुंबई उच्च न्यायालय यांचेकडे उल्हासनगर महानगरपालिकेने प्रतिज्ञापन सादर केलेले आहे.

त्यामुळे सर्व-साधारण महासभा ठराव क्र. ८ दिनांक २४.५.२००२ मध्ये फेरबदल करणे आवश्यक वाटते फक्त शहरातील किरकोळ फटाका विक्रेत्त्यांना शहराच्या व नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मनपा मालकींच्या मैदाने, उद्यानाचे भुईभाडे यामध्ये सवलत देणे योग्य वाटते. त्यानुसार रूपये १७५/- (रू. एकशे पंच्यात्त्तर) प्रति दिन, प्रतिगाळा आगाऊ वसुल करून (१० x १५ = १५० चौ.मी.) देण्याचे प्रस्तावित आहे. सदरचे सवलत फक्त सन २००२-२००३ या वर्षाकरिता लागु राहिल व पुढील प्रत्येक वर्षी सदर दरामध्ये १५ टक्के वाढ करण्याचे प्रस्तावित करणेत येत आहे.

सबब, मनपा महासभा ठराव क्र. ८ दिनांक २४.५.२००२ यामध्ये अंशत: फेरबदल करून मंजुरात द्यावी.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ४४ दिनांक:-१९.१०.२००२.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :-श्री. सुरेश जाधव

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार पुर्वीच्या दि. २४.५.२००२ ठराव क्र. ८ यात अंशत: बदल करून फक्त शहरातील किरकोळ फटाके विक्रत्यांना १० x १५ = १५० चौ.मी. ची जागा मैदानास देणे कामी रू. १७५/- प्रति दिन, प्रति गाळा भाडे निश्चित करीत आहे आणि पुढील प्रत्येक वर्षी सदर दरामध्ये १५ टक्के वाढ करणेस मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

सामितीची रचना

| | | |
|---|---|---|
| १. श्रीमती. मालती करोतीया | | |
| | मा. महापौर | :- अध्यक्ष |
| २. श्रीमती. जया साधवानी | | |
| | मा. उपमहापौर | :- सदस्य |
| ३. श्रीमती. ज्योती कालानी | | |
| | मा.सभापती स्थायी समिती | :- सदस्य |
| ४. श्री. किशोर वनवारी | | |
| | मा.सभागृह नेता | :- सदस्य |
| ५. श्री. रमेश चव्हाण | | |
| | मा. विरोधी पक्षनेता | :- सदस्य |
| ६. श्री. नरेंदकुमार ठाकुर | | |
| | गटनेता राष्ट्रवादी कॉंग्रेस | :- सदस्य |
| ७. श्री. ठाकुरदास बेहरानी | | |
| | नगरसेवक | :- सदस्य |
| ८. श्री. प्रमोद टाले | | |
| | गटनेता आर.पी. आय. | :- सदस्य |
| ९. श्री. जमनादास पुरस्वानी | | |
| | गटनेता भा.ज.पा. | :- सदस्य |
| १०. श्री. मोहन बेहरानी | | |
| | गटनेता कॉंग्रेस आय. | :- सदस्य |

११. श्री. दत्ता भडकवाड

उपआयुक्त (मुख्यालय) :- सदस्य सचिव

१२. श्री. हरेश इदनानी

उपमुख्य लेखा अधिकारी :- सदस्य

## उल्हासनगर महानगरपालिका

**शोक प्रस्ताव :-**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार श्री. विलासरावजी देशमुख यांचे वडील श्री. दगडुजीराव व्यंकटराव देशमुख याचे नुकतेच निधन झाले. त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्त्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ३१ अ दिनांकः-१९.१०.२००१.**

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :-श्री. ठाकुरदास वेहरानी

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. दगडुजीराव व्यंकटराव देशमुख, यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**एकमताने**

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

**शोक प्रस्ताव :-**

श्री. दयाल वाधवा, मराठीचे जेष्ठ साहित्त्यीक श्री. वसंत सबनीस, श्री. ना.स. इनामदार, अभिनेत्री दिना पाठक , अभिनेत्री प्रिया तेंडुलकर तसेच हिंदी भाषेचे मान्यवर साहित्त्यीक श्री. लक्ष्मीकांत वर्मा यांचे नुकतेच निधन झाले. वरील सर्व मृतांच्या कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्त्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ३१ ब दिनांकः-१९.१०.२००१.**

सुचकाचे नाव :- श्री. शांताराम निकम
अनुमोदकाचे नाव :-श्री. दिलीप लालवानी

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. दयाल वाधवा, श्री. वसंत सबनीस, श्री. ना.स. इनामदार, दिना पाठक, प्रिया तेंडुलकर तसेच श्री. लक्ष्मीकांत वर्मा यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

<u>निषेध प्रस्ताव :-</u>

गुजरात, गांधीधाम येथील अक्षरधाम मंदिरावर अतिरेक्यांनी केलेल्या हल्याचा तसेच देशामध्ये जे आतंकवादी हल्ले होत आहेत त्याचा व हरीयाणामध्ये दलितांवर जे अत्याचार होत आहेत त्याचा निषेध करण्यासाठी प्रस्तावित.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ३१ क <u>दिनांकः-१९.१०.२००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. शांताराम निकम .
अनुमोदकाचे नाव :-श्री. दर्शनसिंग खेमाणी

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार अक्षरधाम मंदिरावरील अतिरेक्यांनी केलेल्या हल्याचा तसेच देशात होत असलेल्या अतिरेकी कारवायांचा व हरीयाणामध्ये दलितांवर होत असलेल्या अत्याचारचा निषेध करीत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

<u>प्रस्तावनाः-</u>

सन १९४२ मध्ये भारत सरकारने लष्करी सैनिकांच्या वसाहतीसाठी सुरक्षित व योग्य ठिकाण म्हणुन उल्हासनगरची निवड केली व त्यासाठी सुमारे १२०० हेक्टर जमीन संपादीत केली. या ठिकाणी लष्करांसाठी संक्रमण छावण्या निर्माण केल्या व त्यामध्ये सुमारे ६ हजार सैनिकांना राहण्यासाठी ११७३ बॅरेक्स बांधण्यात आल्या. या लोकसंख्येच्या सुविधांसाठी योग्य ते रूंद रस्ते, पाणी पुरवठा, सांडपाण्याची व्यवस्था व वीज पुरवठा करण्यात आला होता. तसेच योग्य प्रकारे ले-आऊट करून सिनेमा थिएटर, तरणतलाव, क्लब हाऊस अशा त-हेच्या मनोरंजनाच्या सुविधाही निर्माण करण्यात आल्या होत्त्या. अंबरनाथ येथील ऑर्डनन्स फॅक्टरीमधून वीज पुरवठा करण्यात येत होता. विठ्ठलवाडी येथे नवीन रेल्वे स्टेशनची सुध्दा सोय करण्यात आली होती व ते स्टेशन पूर्वी ''जेम्स् रेल्वेसाईडिंग'' या नावांने ओळखले जात होते.

सन १९४७ मध्ये स्वतंत्र मिळाल्यानंतर झालेल्या फाळणीमुळे सिंधप्रांतामधुन फार मोठया प्रमाणावर निर्वासित भारतामध्ये आले. महाराष्ट्र राज्यामध्ये त्यांच्यासाठी पुण्याजवळीळ पिंपरी व मुंबई जवळील उल्हासनगर ह्या प्रमुख ठिकाणी छावण्या उघडण्यात आल्या. दुसरे महायुध्द संपल्यानंतर उल्हासनगर येथे लष्करी सैनिकांसाठी बांधलेल्या बॅरेक्स निरूपयोगी व रिकाम्या झाल्या होत्या. त्यामुळे शासनाने निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी त्यांचा उपयोग करण्याचे ठरविले. एप्रिल, १९४८ च्या सुमारास या सर्व संक्रमण छावण्या भारत सरकारच्या सहाय्य आणि पुर्नवसन मंत्रालयाच्या (रिलीफ ॲंड रिहॅबिलीटेशन मिनिस्ट्री) ताब्यामध्ये मुंबईमध्ये येणा-या निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी सुपूर्द करण्यात आल्या. या निर्वासितांना या ठिकाणी नुसताच आश्रय दिला नाही तर त्यांना घरगुती उपयोगाचे सामान, कामधंदा अशा प्रकारची मदतही देऊ केली. त्यावेळी अंदाजे ९४,४०० निर्वासितांनी या संक्रमण छावणीमध्ये आश्रय घेतला होता. कालांतराने या निर्वासितांनी त्याचे स्वतःचे कामधंदे सुरू केले आणि हळूहळू त्यांचे पुनर्वसन होऊन उल्हासनगरमध्ये नव्याने आर्थीक आणि सांस्कृतिक समाजाची उभारणी झाली. गेल्यपा ४ दशकांमध्ये उल्हासनगर शहराची फार मोठया प्रमाणात वाढ होवून आता ते शहर म्हणजे उद्योगधंद्यांचे या प्रदेशातील प्रमुख केंद्र बनले आहे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामधील ९७ टक्के पेक्षा जास्त क्षेत्र पुर्वीच विकसित झाले आहे. उर्वरीत क्षेत्रामध्ये नाल्यांची, दलदलीची व डोंगराळ क्षेत्रे अंतर्भूत होतात. या वस्तुस्थितीमुळे नवीन जमिनी विकासाखाली आणण्यासाठी फारच कमी वाव आहे किंवा विद्यमान जमीन वापरामध्ये फार मोठे बदल करण्यास सुध्दा वाव नाही.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> <u>दिनांकः-१९.१०.२००२.</u>

सुचकाचे नाव :-श्री. हरदास माखीजा
अनुमोदकाचे नाव :-श्री. मोहन बेहरानी.

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

<u>विषयः-</u> श्री. उध्दव लुल्ला,महापालिका सेवेतील लिपिक, यांचे खातेनिहाय चौकशी प्रलंबित निलंबन आदेश कायम करणे बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

श्री. उध्दव लुल्ला, लिपीक हे अतिक्रमण विभागात कॅम्प क्र. १ येथे क्षेत्रिय निरिक्षक म्हणुन कार्यरत होते. अनाधिकृत बांधकामाचा शोध घेणे व अनाधिकृत बांधकामाचे अहवाल वरिष्ठ अधिका-यांकडे सादर करून ते निष्कासीत करण्याचे काम त्यांच्याकडे दिलेले होते. तथापि ते कार्यरत असलेल्या कालावधीत त्यांचा कार्यक्षेत्रात खालील अनाधिकृत बांधकामे झाल्याचे निर्दशनास आले आहे.

झुलेलाल मंदीराचा मागे पुर्णत: अनाधिकृत अशा तीन दुकानाचे बांधकाम नोव्हेंबर, २००१ मध्ये करण्यात आले सदरचे बांधकाम अनाधिकृत असल्याने दिनांक २०.११.२००१ रोजी निष्कासीत करण्यात आले होते. परंतु मे २००२ मध्ये सदरचे बांधकाम पुन्हा करण्यात आले सदरचे बांधकाम अनाधिकृत असल्याने तसा अहवाल वरिष्ठांकडे दऊन ते त्वरीत निष्कासीत करणे आवश्यक होते. परंतु संबंधीत क्षेत्रिय निरिक्षक श्री. उध्दव लुल्ला यांने त्यांचेकडे दुर्लक्ष केल्याने अनाधिकृत बांधकाम करणा-या व्यक्तीस प्रोत्साहन मिळाले तसेच श्री. उध्दव लुल्ला हे कॅम्प नं. १ मधुन क्षेत्रिय निरिक्षक म्हणुन कार्यरत असतांना प्रारंभ प्रमाणपत्र व बांधकाम परवानगी मिळालेल्या ३५ ठिकाणावरील इमारती मध्ये मोठ्या प्रमाणात अनाधिकृत बांधकाम झालेले आहेत. एवढया मोठ्या प्रमाणात अनाधिकृत बांधकामास जबाबदार धरून श्री. उध्दव लुल्ला यांनी त्यांच्या कामात दुर्लक्ष व कर्तव्यास कसुर केलेली असल्याने त्यांना कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टे. ४/९ दिनांक ९ मे, २००२ अन्वये महानगरपालिकेच्या सेवेतुन तात्त्काळ निलंबित करण्यात आलेले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१)(ब)नुसार सदर प्रकरण महासभेपुढे ठेवून निलंबन कायम करणे साठी प्रस्तावित आहे.

--२--

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ४५ <u>दिनांक:-१६.११.२००२.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.
अनुमोदकाचे नाव :-श्री. रमेश चव्हाण.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. उध्दव लुल्ला, महापालिका सेवेतील लिपिक, यांचे कर्तव्यातील निष्काळजीपणामुळे आयुक्तांनी त्यांचे खातेनिहाय चौकशी प्रलंबित केलेले निलंबन कायम करित नाही. कारण दिनांक ९.५.२००२ या निलंबनाच्या तारखेपासुन ६ महिन्यांच्या मुदतीत असे निलंबन प्रशासनाने महासभेकडुन कायम करून घेतले नाही तर ते निलंबन संपुष्टात येते परंतु सदर कर्मचा-यांच्या विरूध्द खातेनिहाय चौकशी चालु राहील.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>विषय:-</u> श्री. कुमार जग्याशी, महापालिका सेवेतील कनिष्ठ अभियंता, यांचे खातेनिहाय चौकशी प्रलंबित निलंबन आदेश कायम करणे बाबत.

<u>प्रस्तावना:-</u>

श्री. कुमार जग्यासी, कनिष्ठ अभियंता हे नगर रचना विभागात कार्यरत असतांना उल्हासनगर महानगरपालिका कॅम्प नं. ४ या क्षेत्रातील बांधकाम परवानगी बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र, जोता प्रमाणपत्रानुसार बांधकामाच्या ठिकाणी मंजुर

नकाशानुसार बांधकाम होते किंवा नाही इत्त्यादींची तपासणी करून अहवाल वरिष्ठांकडे सादर करणेची अंगभूत जवाबदारी त्यांचेवर सोपविण्यात आली असतांना कॅम्प नं. ४ येथे प्रारंभ प्रमाणपत्र व बांधकाम परवानगी मिळालेल्या एकुण २३ इमारतींमध्ये मोठ्या प्रभागात अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत. परिणामी त्यांना नेमुन दिलेल्या कार्यक्षेत्रामध्ये चटईक्षेत्र निर्देशांकचे उल्लंघन झालेले आहेत.

सबब महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपिल नियम १९७९ च्या नियम ४ (१)अन्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून मा. आयुक्त सो. उल्हासनगर महानगरपालिका यांनी श्री. कुमार जग्यासी, कनिष्ठ अभियंता यांना कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टे४/१० दिनांक ९ मे, २००२ अन्वये महानगरपालिकेच्या सेवेतुन तात्त्काळ निलंबित करणेत आलेले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१)(ब)नुसार सदर प्रकरण महासभेपुढे ठेवून निलंबन कायम करणे साठी प्रस्तावित आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ४६ <u>दिनांकः-१६.११.२००२.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :-श्री. रमेश चव्हाण

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. कुमार जग्यासी, महापालिका सेवेतील कनिष्ठ अभियंता, यांचे कर्तव्यातील निष्काळजीपणामुळे आयुक्तांनी त्यांचे खातेनिहाय चौकशी प्रलंबित केलेले निलंबन कायम करित नाही. कारण दिनांक ९.५. २००२ या निलंबनाच्या तारखेपासुन ६ महिन्यांच्या मुदतीत असे निलंबन प्रशासनाने महासभेकडुन कायम करून घेतले नाही तर ते निलंबन संपुष्टात येते परंतु सदर कर्मचा-यांच्या विरूध्द खातेनिहाय चौकशी चालु राहील.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>विषयः-</u> श्री. चंदर साधवानी, महापालिका सेवेतील लिपिक, यांचे खातेनिहाय चौकशी प्रलंबित निलंबन आदेश कायम करणे बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

श्री. चंदर साधवाणी, लिपिक हे अतिक्रमण विभागात कॅम्प नं. ४ येथे क्षेत्रिय निरिक्षक म्हणुन कार्यरत होते. त्यांच्याकडे अनाधिकृत बांधकामाचा शोध घेणे व अनाधिकृत बांधकामाचे अहवाल वरीष्ठ अधिका-यांकडे सादर करून ते निष्कासीत करणेचे काम दिलेले होते. तथापि ते कार्यरत असलेल्या कालावधीत त्यांच्या कार्यक्षेत्रात श्री. सुरेश वाधवा नावाच्या विकासकाने कॅम्प नं. ४ येथे शिवलीला आर्केड नावाच्या इमारतीचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र व बांधकाम परवानगी क्रमांक उमपा/नरवि/बांप/१५०/९९/१३८६ दि. ३१.३.२००० अन्वये सुरू केले होते. सदरचे बांधकाम मंजुर परवानगी प्रमाणे न करता बरेच अनाधिकृत बांधकाम केले तसेच सदर ठिकाणातुन जात असलेल्या नाल्यावर स्लॅब टाकून त्यावर बांधकाम केले होते.

संबंधीत विभागाचे क्षेत्रिय निरिक्षक श्री. चंदर साधवानी यांनी सदर नाल्यावर स्लॅब टाकुन अनाधिकृत बांधकामास सुरूवात केल्यावर ते लागलीच निष्कासीत करणे आवश्यक होते, परंतु त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याने जिवित हानीचा धोका निर्माण झाला होता तसेच श्री. चंदर साधवानी हे कॅम्प नं. ४ मध्ये क्षेत्रिय निरिक्षक म्हणुन कार्यरत असताना प्रारंभ प्रमाणपत्र व बांधकाम परवानगी मिळालेल्या एकूण २३ ठिकाणी असलेल्या इमारतीमध्ये मोठया प्रमाणात अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत एवढया मोठया प्रमाणात अनाधिकृत बांधकामे झाल्याने जबाबदार धरून श्री. चंदर साधवाणी यांनी त्यांच्या कामात दुर्लक्ष व कर्तव्यात कसुर केलेली असल्याने त्यांना कार्यालयीन आदेश प्र. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टे. ४/१० दि. ९ मे, २००२ अन्वये महानगरपालिकेच्या सेवेतुन तात्त्काळ निलंबीत करणेत आले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१)(ब)नुसार सदर प्रकरण महासभेपुढे ठेवून निलंबन कायम करणे साठी प्रस्तावित आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ४७ <u>दिनांकः-१६.११.२००२.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री.चंदर साधवाणी, महापालिका सेवेतील लिपिक, यांचे कर्तव्यातील निष्काळजीपणामुळे आयुक्तांनी त्यांचे खातेनिहाय चौकशी प्रलंबित केलेले निलंबन कायम करित नाही. कारण दिनांक ९.५.२००२ या निलंबनाच्या तारखेपासुन ६ महिन्यांच्या मुदतीत असे निलंबन प्रशासनाने महासभेकडुन कायम करून घेतले नाही तर ते निलंबन संपुष्टात येते परंतु सदर कर्मचा-यांच्या विरूध्द खातेनिहाय चौकशी चालु राहील.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>विषयः-</u> श्री. भिमसिंग गणपत पाटील, महापालिका सेवेतील मिस्त्री, यांचे खातेनिहाय चौकशी प्रलंबित निलंबन आदेश कायम करणे बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

श्री. भिमसिंग गणपत पाटील, मिस्त्री यांनी महानगरपालिकेतर्फे, श्री. लाल गुलाबराय करनानी, रा. ब्लॉ.नं. ए. ५१, शंकर शिवमंडळ, १ला माला, उल्हासनगर-१ यांचे विरूध्द नगररचना कायदा १९६६ चे कलम ५२ अन्वये गुन्हा र. जि. नं. २८७/८९ दाखल करण्यात आला असताना सदर प्रकरणामध्ये मा. दिवाणी न्यायालयात महानगरपालिकेची बाजू मांडताना कर्तव्यात कसुर केल्याचे मा. सह. न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग -१, उल्हासनगर यांनी नियमित फौजदारी दावा क्र. २२२५/१९८९ मधील निकालाव्दारे तसेच त्यांचेकडील पत्र क्र. म.जा.क्र. १०१०/२००२ दिनांक ६.८.२००२ अन्वये निदर्शनास आणून दिल्याने श्री. भिमसिंग गणपत पाटील, मिस्त्री यांना कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टे.१/४८ दिनांक ९ ऑगस्ट, २००२ अन्वये महानगरपालिका सेवेतुन तात्त्काळ निलंबीत करणेत आलेले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१)(ब)नुसार सदर प्रकरण महासभेपुढे ठेवून निलंबन कायम करणे साठी प्रस्तावित आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ४८ <u>दिनांकः-१६.११.२००२.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.
अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. भिमसिंग गणपत पाटील, महापालिका सेवेतील मिस्त्री, यांचे कर्तव्यातील निष्काळजीपणामुळे आयुक्तांनी त्यांचे खातेनिहाय चौकशी प्रलंबित केलेले निलंबन कायम करित नाही.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>विषयः-</u> श्री. प्रकाश म्हात्रे, महापालिका सेवेतील लिपिक, यांचे खातेनिहाय चौकशी प्रलंबित निलंबन आदेश कायम करणे बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

श्री. प्रकाश म्हात्रे, लिपिक हे अतिक्रमण विभागात कॅम्प नं. ३ येथे क्षत्रिय अधिकारी निरिक्षक म्हणुन कार्यरत होते. त्यांच्याकडे अनाधिकृत बांधकामाचा शोध घेणे व अनाधिकृत बांधकामाचे अहवाल वरिष्ठ अधिका-यांकडे सादर करून ते निष्कासित करणेचे काम दिलेले होते, तथापि ते कार्यरत असलेल्या कालावधीत त्यांच्या कार्यक्षेत्रात कॅम्प नं. ३ हिराघाट येथे श्री. कांबळे नावाच्या व्यक्तीने अनाधिकृतरित्त्या तळमजला अधिक दोन मजले असे अनाधिकृत बांधकाम मे-जून-२००२ रोजी केलेले होते. वास्तविक पाहता सदरचे बांधकाम हे पुर्णत : अनाधिकृत असल्याने ते प्राथमिक अवस्थेत असताना म्हणजेच पायाचे तळमजल्याचे काम चालु असताना निष्कासित करणे आवश्यक होते. परंतु सदर बांधकामाकडे दुर्लक्ष केल्याने सदर ठिकाणी तळमजला अधिक दोन मजले अशा प्रकारचे बांधकाम पुर्ण झाले या संबंधीत ठिकाणी निष्कासनाची कार्यवाही दि. ६.६.२००२ रोजी करताना दुस-या मजल्यावर एका मजुरास निष्कासन करताना विजेचा झटका बसुन अपघाती मरण आले, यामुळे सदरच्या अनाधिकृत बांधकामासाठी क्षेत्रिय निरिक्षक जबाबदार आहेत. तसेच श्री. प्रकाश म्हात्रे हे कॅम्प नं. ३ मध्ये क्षेत्रिय निरिक्षक म्हणुन कार्यरत असतांना प्रारंभ प्रमाणपत्र व बांधकाम परवानगी मिळालेल्या एकूण ३४ ठिकाणी असलेल्या इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणात अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत एवढया मोठ्या प्रमाणात झालेल्या अनाधिकृत बांधकामास लिपिक जबाबदार आहेत त्यांनी त्यांच्या कामात दुर्लक्ष व कर्तव्यात कसुर केलेली असल्याने त्यांना कार्यालयीन आदेश प.क्र.उमपा/साप्रवि/टे. ४/१२, दि. १४ जुन, २००२ अन्वये महानगरपालिकेच्या सेवेतुन तात्त्काळ निलंबीत करणेत आलेले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१)(ब)नुसार सदर प्रकरण महासभेपुढे ठेवून निलंबन कायम करणे साठी प्रस्तावित आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र.  ४९  दिनांकः-१६.११.२००२.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद चौधरी.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री,प्रकाश म्हात्रे, महापालिका सेवेतील लिपिक, यांचे कर्तव्यातील निष्काळजीपणामुळे आयुक्तांनी त्यांचे खातेनिहाय चौकशी प्रलंबित केलेले निलंबन कायम करित नाही.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र. १ मधील शांतीनगर येथील राजीव गांधी चौक ते पंचवटी स्टील पर्यंतचा रस्ता एम.एम.आर. डी. ए. कर्जातून प्रस्तावित असलेल्या कामातून वगळण्यास मान्यता देणे बाबत.

प्रस्तावनाः-

उल्हासनगर महानगरपालिकेने वर्ष १९९९ अखेरीस एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम विकास कार्यक्रम टप्पा-१ अंतर्गत ३३ रस्त्यांची कामे प्रस्तावित केली होती. त्यापैकी एम.एम.आर.डी.ए. कर्ज उभारणी करून करावयाच्या रस्त्यांच्या कामामध्ये रस्ता क्र. ३ हा उल्हासनगर-३ येथील शांतीनगर ते पवई चौक हा १५५० मीटरचा रस्ता अंतर्भुत आहे. या प्रस्तावास महासभेने ठराव क्र. १२ दिनांक ११.११. १९९९ नुसार प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिलेली आहे.

उक्त रस्ता लिंक रस्त्यासह विकास आराखडयाप्रमाणे ६० फुट रूंदीचा बांधण्यात येत आहे. शांतीनगर येथील उल्हासनगर महानगरपालिकेच्या जकात नाक्याच्या बाजूने या रस्त्याची सुरूवात होत असून विठ्ठलवाडी मार्गे पवई चौकापर्यंत सदर रस्ता सलग ६० फुट रूंदीचा बांधून पुर्ण करण्यात आलेला आहे. या रस्त्यामधील राजीव गांधी पूलाजवळील चौकाकडून कल्याण-अंबरनाथ रस्त्यावरील पंचवटी स्टील फर्निचर दुकानापर्यंत येणारा लिंक रस्ता सद्या दुतर्फा असलेल्या बांधकामामुळे सरासरी २५''.००'' फुट रूंदीचा रस्ता उपलब्ध आहे. सदर लिंक रस्ता विकास आराखडयानुसार ६० फुट रूंदीचा करण्याकरिता नगररचना विभागाने विकास आराखडयाच्या नकाशाप्रमाणे रस्ता एका बाजुस असलेले बांधकाम बाधित होत आहे. या बांधकामामध्ये येणारे पंचवटी स्टील फर्निचरचे दुकान असलेले श्री. भालेराव यांची तळ मजला अधिक तीन मजली आर. सी. सी बांधकाम असलेली इमारत अंदाजे २५ फुट इतकी बाधित होते. संपुर्ण इमारतीचे ज्योत्याचे माप ४० फुट x ५० फुट इतके आहे. सदरचा लिंक रस्ता, कल्याण अंबरनाथ रस्ता व जकात नाका ते राजीव गांधी चौकापर्यंत असा एकत्र मिळून त्रिकोणी रस्ता तयार होतो.

कल्याण अंबरनाथ रस्त्याच्या उजव्या बाजूला हा रस्ता असून डाव्या बाजूस रस्ता क्र. २ हा डॉल्फिन मार्गे जाणारा एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमामधील रस्ता आहे. या रस्त्याचे काही अतिक्रमणे निष्कासन न झाल्यामुळे पुर्ण होऊ शकलेला नाही.

त्यामुळे एकात्मिक रस्ते विकास योजनेच्या आधी कल्याणाकडून शहाड मार्गे येणारी वाहतूक उल्हासनगर-४ व ५ कडे जाण्याकरिता उक्त दोन्ही रस्त्यांचे बांधकाम प्रस्तावित केले होते. परंतु डॉल्फिन मार्गेचा रस्ता शहाड स्टेशनपर्यंत पुर्ण होऊ शकत नाही. सदर रस्त्यावर विरळ वाहतूक असते. श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशव्दार ते शांतीनगर ब्रिज पर्यंतचा रस्ता ५० फुट ते ५५ फुट रूंदीचा तयार करण्यांत आला आहे. सद्या २ वर्षापासुन वाहतूकीसाठी वापरात आहे. तसेच पंचवटी स्टील ते राजीव गांधी चौक (शांतीनगर ब्रिज)या रस्त्यात जास्तीत जास्त नागरिकांचे बांधकामे बाधित होत असल्यामुळे जास्तीत जास्त नागरिक बेघर होणार असल्याचे रस्ते विकास आराखडयावरून दिसून येते. त्यामुळे सदर बाधित होणा-या वस्त्यांतील नागरिकांच्या पुर्नवसन करण्यासाठी पर्यायी जागा महानगरपालिकेकडे उपलब्ध नाही. त्यामुळे राजीव गांधी चौक ते पंचवटी स्टील पर्यंतचा रस्ता एम.एम. आर.डी.ए. कर्जातून प्रस्तावित असलेल्या कामातून वगळण्यासाठी सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरीसाठी ठेवण्यासाठी प्रस्तावित करण्यांत येत आहे.



<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> <u>दिनांक:-१६.११.२००२.</u>

सुचकाचे नाव :-
अनुमोदकाचे नाव :-

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र. १ मधील शांतीनगर येथील राजीव गांधी चौक ते पंचवटी स्टील पर्यंतचा लिंक रस्ता एम.एम.आर.डी.ए. कर्जातून प्रस्तावित असलेल्या कामातून वगळण्यास मान्यता देत आहे. आणि त्या प्रयोजनार्थ महासभा ठराव क्र. १२ दि. ११.११.९९ मध्ये अंशतः बदल मानला जाईल.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>आयत्यावेळचा विषय:-</u>

श्री. अनिल भगवानदास जयसिंघानी सन्माननिय महापालिका सदस्य हे माहे, सप्टेंबर व ऑक्टोबर २००२ च्या सभेमध्ये लागोपाठ २ महिन्याच्या अवधीत स्वतः गैरहजर राहिले. त्यांनी आपले पत्र व त्यासोबत जोडलेल्या वैद्यकीय दाखल्याव्दारे मा. महापौर/ मा. आयुक्त, यांना नोव्हेंबर, २००२ च्या महासभेत आपण तात्पुरत्त्या आजारामुळे गैरहजर राहणार असल्याची त्यांनी दि.१३.३.२००२ रोजी सूचना दिलेली आहे आणि पूढील ३ महिन्यापर्यंत गैरहजर राहण्याची शक्यता दर्शविली आहे.

सदर सन्माननिय सदस्याचे गैरहजेरीचा प्रस्ताव महासभेच्या कार्यसूचीवर नसुन तो सभेच्या मतानुसार आयत्यावेळीचा विषय म्हणुन समाविष्ट करणे आवश्यक आहे. नाही तर त्यांच्याविरूध्द मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ११ अन्वये अर्नहतेच्या कार्यवाहीचे अवलंबन करण्यांत येईल.

करिता सन्माननिय सदस्यास माहे नोव्हेंबर २००२ चे सभेस गैरहजर राहण्यास व पूढील काही सभांना गैरहजर राहण्यास मान्यता मिळावी असे प्रस्तावित आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ५१ दिनांकः-१६.११.२००२.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महापालिका सदस्य श्री. अनिल जयसिंघानी यांना तात्पुरत्त्या आजारामुळे सप्टेंबर २००२ ते जानेवारी २००३ पर्यंत सलग सभांना गैरहजर राहण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

विषयः- कर आकारणीत उपचार दोष, चुका व विवादामुळे मुल्य निर्धारण आणि कर याविरूध्द भूतलक्षी प्रभावाने निर्णय घेणे बाबत.

प्रस्तावनाः-

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील विविध मिळकतीचे येणे बाकी आहे. ती वसुलीसाठी कारवाई करतांना मिळकत धारक तक्रार करतात त्यांचे स्वरूप खालीलप्रमाणे:-

१. एकाच मिळकतीच्या एकापेक्षा अनेक ठिकाणी आकारणी नोंदवहीत नोंदणी झाले आहे यात मिळकत धारक एका मिळकतीचा कर भरती त्याची नोंद एकापेक्षा जास्त ठिकाणी झाले असल्याने ती रक्कम वाढत आहे.
२. मिळकतीचे वर्णन, चुकीची नोंद झाल्यामुळे कर आकारणी चुकीची झाली आहे. उदा. पत्र्याचे छप्पर असले तर आर.सी.सी. आकारणी झाल्यामुळे आर. सी.सी. दराने आकारणी झाली आहे. त्यामुळे कराची रक्कम वाढत आहे.
३. काही मिळकतीमध्ये भाडेकरू नसतांना भाडेकरूची नोंद केली आहे. त्यामुळे कराची रक्कम वाढत आहे. मिळकतीमध्ये भाडेकरू आहेत परंतु प्रत्यक्ष भाडयापेक्षा जास्त भाडयाची नोंद केल्यामुळे जादा कर आकारणी केली आहे.
४. काही इमारती रस्ता रूंदीकरण इ. कामामुळे निष्कासित (डिमॉलिश)झाल्या आहेत. परंतु त्या मिळकतीची आकारणी कमी न होता तशीच सुरू आहे.
५. जूनी मिळकत पाडून नवीन इमारत बांधली आहे. त्यावर आकारणी झाली आहे परंतु जूनी आकारणी कमी न होता ती अद्याप चालूच आहे. वास्तविक जुनी आकारणी कमी होणे आवश्यक होते. त्यामुळे मालमत्ता कर थकबाकी वाढत आहे.
६. मिळकत धारकाच्या प्रत्यक्ष क्षेत्राऐवजी जादा क्षेत्र नोंदल्यामुळे कर आकारणी जादा झाली आहे.
७. इमारतीचा वापर चुकीचा नोंदला आहे. उदा. रहिवास असेल तर वाणिज्य नोंदला आहे. त्यामुळे सदर मिळकत धारकास मान्य नाही.
८. वसुलीसाठी जप्ती करणेस अडचणी येतात. तसेच मिळकत धारक न्यायालयात गेल्यास त्यास तहकुबी मिळते किंवा न्यायालयात निर्णय

लागण्याच्या प्रक्रियेस कालावधी लागतो, त्यामुळे मागणीची रक्कम ब-याच वर्षापासुन येणे आहे.

९. वरीलप्रमाणे ४५०० ते ५००० मिळकतीची मालमत्ता कर थकबाकी असल्याने त्याची मागणी सुमारे ११ ते १२ कोटी रूपये वादग्रस्त झाली आहे. वर नमुद केलेले कर बाकी सन १९८६-८७पासूनची आहेत. तत्त्कालीन कर्मचा-यांनी वेळीच चुक दुरूस्ती केली नाही त्यामुळे थकबाकी रक्कम तशीच वाढत राहीली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कराधान नियम प्रकरण ८ मधील नियम २० मधील तरतुद पाहता फक्त चालू आर्थिक वर्षापासुन दुरूस्ती करण्याची तरतुद आहे. पुर्वलक्षी प्रभावाने दुरूस्ती करण्याची तरतुद नाही, त्यामुळे याबाबत महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव पाठवून शासनाच्या मंजुरीनंतर चुकीची आकारणी दुरूस्त करणे किंवा कमी करण्याची कार्यवाही करणेस महासभेपुढे प्रस्ताव सादर करणेस प्रस्तावित करणेत येत आहे.

१०. उल्हासनगर महापालिका क्षेत्रात सुमारे १ लाख ४० हजार मिळकती आहेत, त्यापैकी काही मिळकतीची सुमारे १९८६-८७ पासुन व त्यानंतरच्या मिळकतीवर कमी कालावधीसाठी कर आकारणी क्षेत्र, इमारत वापर, दुबार नोंद, इमारत निष्कासित झाली परंतु कर आकारणी सुरू आहे, भाडेकरू नसताना भाडेकरू नोंद, भाडेकरूचे भाडे जादा नोंद आदि विविध कारणांनी मिळकत धारकांनी पूर्वी नगरपरिषदेकडे व तदनंतर महापालिकेत रूपांतर



झालेवर महापालिकेकडे तक्रार अर्ज दाखल केले होते. परंतु तत्त्कालीन कर्मचारी अधिका-यांनी वेळीच निर्णय न घेतल्यामुळे हि बाकी वाढत आहे.

११. १.४.२००२ रोजी संकलीत कर व अन्य करांची एकूण थकबाकी रूपये. ४८५३९१३४५ आहे. त्यामध्ये पाणी पट्टी (संकलीत करा बरोबर आकारली जाणारी) याचा हि समावेश आहे. पाणी कनेक्शनचे बिल स्वतंत्ररित्त्या मिळकत धारकास जाने व संकलीत कराबरोबर आकारले जाते अशा दुहेरी टॅक्स बददलही ब-याच मिळकतीधारकांच्या तक्रारी आहेत.

१२. २००१-२००२ अखेर वादग्रस्त बाकी ५ ते ६ कोटी रूपये व २००२-२००३ मधील सुमारे ५-६ कोटी अशी एकूण अंदाजे रूपये १० ते १२ कोटी रूपये वादग्रस्त बाकी आहे ती वसुल करणे अडचणीचे झाले आहे. या प्रकरणी यंदा कदाचित करदात्त्याने न्यायालयात दावा दाखल केलेस त्याचा निकाल लागणेस एकतर कालावधी लागतो शिवाय वेळ, कर्मचारी श्रम व वकील फी इ. खर्च करावा लागतो व कालअपव्यय होवून रक्कम ब्लॉक राहते अशा विविध अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.

१३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कराधान प्रकरण ८ नियम २० मधील तरतुदीनुसार केवळ चालु आर्थीक वर्षात करयादीत दुरूस्ती करता येते अशी तरतुद आहे मात्र हि बाबी ८६-८७ पासुन २००१-२००२ पर्यंतची असलेने पूर्वलक्षी प्रभावाने रक्कम निर्लेखित करणेस प्रचिलीत कायद्यात तरतुद नाही. वर नमुद केलेल्या वस्तुस्थिती मुळे रक्कम वसुल करणेस अडचणी आहेत. यास्तव धोरणात्त्मक निर्णय घेण्यासाठी सदर बाब महासभे पुढे ठेवून मंजुरी मिळालेवर मा. राज्य शासनाच्या अंतीम मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे योग्य होईल म्हणजे शासनाची मान्यता प्राप्त झालेवर पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल.

वरील सर्व बाबींचा सहानुभूतीपुर्वक विचार होवून सदर प्रस्ताव महासभेपुढे ठेवण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ५३ <u>दिनांकः-१६.११.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.

ही महासभा वरील परिस्थिती विचारात घेता सन १९८६ -८७ पासुन २००१-२००२ पर्यंत उल्हासनगर शहरातील सुमारे ५००० मिळकतींच्या मालमत्ता कर आकारणीत उपचार दोष, लेखन प्रमाद, वर्जन किंवा अन्य दोष असल्यास जेथवर शक्य असेल तेथवर पूर्वलक्षी प्रभावाने दुरूस्ती करणेस किंवा आवश्यक रक्कम निर्लेखित करण्यास शासनाच्या मंजूरीच्या अधिन राहून मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>आयत्त्यावेळचा विषयः-</u>

<u>विषयः-</u> दलीत वस्ती सुधारणा योजना वर्ष २००२-२००३ करिता सार्वजनिक बांधकाम खात्त्यामध्ये तयार करण्यात आलेल्या कामांना शासनाकडे पाठविणेपूर्वी महासभेची मान्यता मिळणेबाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

दलीत वस्ती सुधारणा योजना वर्ष २००२-२००३ करिता उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे सार्वजनिक बांधकाम खात्त्यामध्ये कामांचे प्रस्ताव तयार आलेले आहेत. शासन निर्णय क्र. विद्ययो/१०९७/१६७३/प्रक्र४४/९७ नवि. ४ दिनांक ५.२.१९९८ व त्यानंतर आलेल्या सुधारित शासन निर्णय क्र. विद्ययो/१०२०००/१५९२ प्र.क्र. १८९/नवि-४/दिनांक ५.३.२००२ मधील मार्गदर्शक तत्त्वानुसार ज्या वत्त्यांमध्ये दलितांची अनुसूचित जाती व नव बौध्द दलितांची लोकसंख्या ५० टक्के पेक्षा अधिक आहे. तसेच महानगरपालिकेमध्ये जे प्रभाग अनुसूचित जातीच्या उमेदवारांकरिता राखीव आहेत. त्या प्रभागामध्ये सदर योजनेमधुन कामे हाती घेण्याकरिता सूचना आहेत. दिनांक ५.३.२००२ च्या शासननिर्णयानुसार महानगरपालिकेच्या नगररचनाकार यांच्याकडून प्रस्तावित कामांच्या नकाशांना मान्यता मिळाल्यानंतर महासभेची मान्यता घेऊन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे मंजुरी व निधी उपलब्ध करणेकरिता सादर करणे आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम खात्त्याने १९९८ मध्ये तयार करण्यात आलेल्या दलीत १७ वस्त्त्यांच्या यादीमधील वस्त्त्यांकरिता व अनुसूचित जातीचे प्रभाग क्र. १,५,६,८,९,१४,१५,१८,१९ साठी संबंधित नगरसेवकांनी सुचविलेली कामे एक समान धोरणाने प्रत्त्येक प्रभागाकरिता कमीत कमी १० लक्ष खर्चापर्यंत होतील. अशा पध्दतीने एकंदर ३१ कामांचे रू. १,५१,११,३८२/- खर्चाचे प्रस्ताव तयार केलेली आहेत. त्यानंतर प्रभाग क्र. १३ नगरसेवक श्री. बच्चो रूपचंदानी व श्री. गोविंदराम लुंड यांनी त्यांच्या प्रभागातील पटेल नगर, महात्त्मा फुलेनगर, ज्योतीबा फुलेनगर या वस्त्त्यांमध्ये अनूसूचित जातीची लोकसंख्या आहे असे महानगरपालिकेस कळविल्यानंतर उप-आयुक्त (ग.व.सु)व नगररचनाकार यांनी याबाबत शिफारस केल्यानंतर या वस्त्त्यांमध्ये नगरसेवकांनी सुचविलेल्या ६ कामांचे रू. ८,७७,०००/- प्रस्ताव तयार करण्यात आलेले आहेत. अशा प्रकारे ३१ + ६ = ३७ कामांचे एकंदर रू.१५१११३८२/- + ८,७७,००० = १५९८८३८२/- खर्चाचे प्रस्ताव शासनाकडे मंजुरीकरिता व निधी उपलब्धते करिता पाठविणे करिता तयार केलेले

आहेत. या प्रस्तावांच्या नकाशांना शासन निर्णय क्र. विद्यो/ १०२०००/१५९२ /प्र.क्र. १/८९/नवि-४/ दिनांक ५.३.२००२ मधील मार्गदर्शक तत्त्वानुसार मा. नगररचनाकार यांनी मंजुरी दिलेली आहे व कामे हाती घेण्यात हरकत नाही. असे कळविले आहे. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वर्ष २०००-२००१ च्या दरसूचीवर आधारित त्याप्रमाणे प्रत्येक कामाचे स्वतंत्र सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. त्यास तांत्रिक मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. या कामाची यादी तयार करण्यांत आली असून शासन निर्णयामधील मार्गदर्शक तत्त्वानुसार या योजनेतील प्रस्तावित एकूण ३७ कामांचे एकूण रू.१,५९,८८,३८२/- एवढया रक्कमेचे प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे मंजुरी करिता व निधी उपलब्ध होणेकरिता पाठविणेपुर्वी महासभेची मान्यता मिळणेकरिता प्रस्तावित आहे.

--२--

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ५० <u>दिनांक:-१६.११.२००२.</u>

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी.
अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद्रसिंह भुल्लर.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार सन २००२ -२००३ करिता दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत सोबत जोडलेल्या परीशिष्टात विनिर्दिष्ट केलेल्या ३७ कामांची एकंदर रक्कम रू. १,५९,८८,३८२/- यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे. आणि त्या प्रयोजनार्थ निधी उपलब्ध होणे करिता मा. जिल्हाधिकारी ठाणे / शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेस समंती देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>आयत्त्यावेळचा विषय :-</u>

<u>विषय:-</u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर "अतिरिक्त आयुक्त" पद निर्माण करणे कामी स्थायी समिती ठराव क्र. ६५ दि. ११.११.२००२ कायम करणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

तत्कालिन उल्हासनगर नगरपालिकेचे महापालिकेत रूपांतर झाल्याने महापालिकेचे प्रशासकीय कामकाज सुरळीतपणे पार पाडण्याच्या दृष्टीने नविन आस्थापनासुची तयार करून शासनाकडे मंजूरीसाठी सादर केली आहे. त्यामध्ये उप-आयुक्त पदनामांची एकूण सहा पदे व सहाय्यक आयुक्त पदनामाची एकूण दहा पदे प्रस्तावित केली आहेत. त्यानुसार शासनाकडुन आजतागायत उप-आयुक्त पदनामाची एकूण चार पदे व सहाय्यक आयुक्त पदनामाची एकूण सहा पदे मंजुर झालेली आहेत. या महापालिकेत सद्यस्थितीत उप-आयुक्त पदावर एकूण चार अधिकारी प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत.

या महापालिकेच्या कामकाजाविषयी प्रामुख्याने महापालिकेच्या आस्थापनाविषयक बाबी व नागरी समस्यांवर दिनांक ३०.१०.२००२रोजी मा. सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्यासमवेत चर्चा झाली. चर्चेअंती सदर बैठकीत उल्हासनगर

शहरातील नागरी समस्यांचे निराकरण यशस्वीपणे करण्यासाठी अनुभवी कार्यक्षम अधिकारी महापालिकेच्या आस्थापनेवर असावेत असे प्रतिपादन करण्यात आले होते. त्यासाठी आयुक्तांच्या मदतीला एक ''अतिरिक्त आयुक्त'' दर्जाचा अधिकारी असल्यास नागरी समस्यांचे चांगल्याप्रकारे निराकरण केले जाईल अशी चर्चा झाली.

वरील बाब विचारात घेता ''विशेष बाब'' म्हणुन या महापालिकेच्या आस्थापनेवर ''अतिरिक्त आयुक्त'' दर्जाचे एक पद निर्माण करण्यास मंजुरी मिळणेसाठी स्थायी समितीपुढे विषय प्रस्तावित आहे.



स्थायी समिती ठराव क्र.६५ दिनांकः- ११.११.२००२

सुचकाचे नाव :-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर.
अनुमोदकाचे नाव :-श्री. बच्चाराम रूपचंदानी.

ही स्थायी समिती वरील सुचविल्या प्रस्तावने अनुसार महासभेच्या मंजुरीच्या अधिन राहुन महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ''अतिरिक्त आयुक्त'' दर्जाचे एक पद निर्माण करण्यास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ५४ दिनांकः-१६.११.२००२.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.
अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलेरजा

ही महासभा स्थायी समितीचा दिनांक ११.११.२००२ रोजीच्या ठराव क्र. ६५ मध्ये अंतर्भुत निर्णयाप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर रू. १२०००-३७५-१६५०० या वेतनश्रेणी वर एक ''अतिरिक्त आयुक्त'' पद निर्माण करण्यास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

बहुमताने

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

आयत्त्यावेळचा विषय :-

विषय:-महापालिका यात्री निवास, उल्हासनगर. २ हया उद्यानाची वेळ ठरविणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकाचे यात्री निवास, उल्हासनगर-२ येथे लहानसे उद्यान आहे. सदर उद्यानाची उघडण्याची व बंद करण्याची वेळ निश्चित केलेली नाही.

यात्री निवास येथील उद्यानात फिरावयास येणा-या नागरिकांना वेळ ठरविणे, उद्यानात जेष्ठ नागरिक, लहान मुले व महिला यांना प्रवेश राहील, उद्यानाची वेळ सकाळी ७ ते ९ व सायंकाळी ५ ते १० वाजेपर्यंत राहील, सदरच्या उद्यानात लहानमुलांना, महिलांना तसेच जेष्ठ नागरिकांना प्रवेश राहील असा फलक लावणे आवश्यक आहे. जेणे करून परिसरातील नागरीकांना उद्यानाची उघडण्याची व बंद करण्याची वेळ माहित होईल. उद्यानाच्या उघडण्या, बंद करण्याच्या तसेच प्रवेशा बाबतच्या वेळास व फलक लावण्यास मंजूरीसाठी माननीय महासभे समोर सादर.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ५२ दिनांक:-१६.११.२००२.

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा
अनुमोदकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका निहित ''यात्री निवास'' उल्हासनगर-२ या उद्यानात फिरावयास येणा-या नागरिकांसाठी प्रवेशाची वेळ सकाळी ७ ते ९ व संध्याकाळी ५ ते १० वाजेपर्यंत निश्चित करीत आहे. आणि त्या प्रयोजनार्थ प्रशासनास फलक लावणेस निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

शोक प्रस्ताव :-

उल्हासनगर महानगरपालिकेचे माजी. महापौर श्री.हरदास माखिजा यांच्या मातोश्री श्रीमती. कृष्णाबाई सन्मुखदास माखिजा यांचे दिनांक २३.१०.२००२ रोजी अकस्मित निधन झाले. तसेच अंबरनाथचे माजी नगरसेवक व ठाणे जिल्हा आर.पी.आयचे अध्यक्ष (ग्रामीण विभाग)श्री. नरेश गायकवाड यांचे दि. ८.११.२००२ रोजी अचानक खुनी हल्ला होवून अकस्मित निधन झाले. तसेच माजी नगरसेवक श्री.पांडुरंग लांडे यांचे वडील श्री. मारूती लांडे अकस्मि निधन झाले. त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्त्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ५४ अ दिनांक:-१६.११.२००२.

सुचकाचे नाव :- श्री. नाना पवार.
श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी.
श्री. विनोद तलरेजा

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्रीमती. कृष्णाबाई सन्मुखदास माखिजा, श्री. नरेश गायकवाड, श्री.मारूती लांडे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

अभिनंदन प्रस्ताव :-

सन २००२ मधील सार्वत्रिक निवडणुकीनंतर शिक्षण मंडळावर निवडून आलेल्या व शासन नियुक्त सदस्यांपैकी मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ मधील नियम १२ मधील तरतुदीप्रमाणे सभापती व उपसभापती पदी नेमणुक करण्यासाठी दि. ३०.११.२००२ रोजी मतदान घेण्यात आले त्यात श्री. मुरली रोहडा यांना तेथील सभापती व आर. पी. आयचे नेता शहर प्रमुख श्री. महादेव सोनावणे यांची उपाध्यक्ष म्हणुन आणि इतर सदस्यांची शिक्षण मंडळावर नेमणुक झाल्याने त्यांचे अभिनंदन करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ५४ ब दिनांक:-२०.१२.२००२.

सुचकाचे नाव :- श्री. शांताराम निकम

अनुमोदकाचे नाव :- श्री. नाना पवार

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शिक्षण मंडळावर निवडुन आलेले मा. सभापती श्री. मुरली रोहडा व मा. उपसभापती श्री. महादेव सोनावणे आणि इतर सदस्य यांचे अभिनंदन करीत आहे.

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

**शोक प्रस्ताव :-**

उल्हासनगर महानगरपालिकेचे नगरसेवक श्री. पृथ्वी वलेचा यांचे बंधु श्री. परसराम वलेचा यांचे नुकतेच निधन झाले आहे. त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्त्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र.** ५४ क **दिनांकः-२०.१२.२००२.**

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.
अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. परसराम वलेचा यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**एकमताने**

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

**विषयः-** श्री. आर.के. सोनवणे यांना उल्हासनगर महानगरपालिका सेवेत प्रतिनियुक्तीने अतिरिक्त आयुक्त पदावर नेमणुकीस मान्यता देणे बाबत.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. युएमसी/२००२/१८३४/प्र.क्र.२४७/नवि-२४, दिनांक २१ नोव्हेंबर, २००२अन्वये उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर ''अतिरिक्त आयुक्त'' या पदनामाचे एक पद निर्माण करणेस मान्यता देवून श्री. आर. के. सोनवणे, उप-आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांची वरील पदावर प्रतिनियुक्तीने नेमणुक केली आहे. त्यानुसार आयुक्त कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी त्यांचेकडील आदेश क्र. सेवाप्र १४०२/प्र.क्र.१६५३/साप्र.मुका/०२, दिनांक २२.११.२००२ अन्वये श्री. आर.के. सोनवणे यांना कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सेवेतुन दि. २२.११.२००२ रोजी मध्यान्होत्त्तर कार्यमुक्त केले आहे. त्यानुसार श्री. आर. के. सोनवणे यांनी वरील पदाचा कार्यभार दिनांक २५.११.२००२ पासून स्विकारलेला आहे.

तथापी उपरोक्त शासन निर्णयात असे नमुद केले आहे की, श्री. आर. के. सोनवणे यांची ''अतिरिक्त आयुक्त'' उल्हासनगर महानगरपालिका यापदावरील नेमणुक ही कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व उल्हासनगर महानगरपालिका यांच्या अनुमती दर्शक ठरावास अधीन राहून करण्यात येत आहे. करिता श्री. आर. के. सोनवणे, अतिरिक्त आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांच्या प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस शासनाचे आदेशाप्रमाणे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अनुमती दर्शक ठरावास

अधिन राहून अनुमती देण्यासाठी मान्यता मिळणेकामी महापालिकेच्या महासभेपुढे विषय प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र.७४ ड</u>　　　　<u>दिनांक:-२० ११ २००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.
अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

ही महासभा वरील प्रस्तावा संबंधिचा विषय आजच्या सभेच्या कार्यसुचीवर समाविष्ट करण्यास संमती देत नाही.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>बहुसंख्येने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>शोक प्रस्ताव :-</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. २५ (अ) मधुन निवडुन आलेले व उल्हासनगर जिल्हा कॉंगेसचे अध्यक्ष श्री. मोहन बेहरानी यांचे चुलत बंधु श्री. रमेश बेहरानी यांचे दोन दिवसापुर्वी अकस्मित निधन झाले. त्यांचे कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी होत असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र.</u>　७४ इ　　　　<u>दिनांक:-२६ ११ २००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. हरदास माखिजा.
अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलेरजा

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. रमेश बेहरानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

विषयः- श्री. आर.के. सोनवणे यांना उल्हासनगर महानगरपालिका सेवेत प्रतिनियुक्तीने अतिरिक्त आयुक्त पदावर नेमणुकीस मान्यता देणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. युएमसी/२००२/१८३४/प्र.क्र.२४७/नवि-२४, दिनांक २१ नोव्हेंबर, २००२अन्वये उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर ''अतिरिक्त आयुक्त'' या पदनामाचे एक पद निर्माण करणेस मान्यता देवून श्री. आर. के. सोनवणे, उप-आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांची वरील पदावर प्रतिनियुक्तीने नेमणुक केली आहे. त्यानुसार आयुक्त कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी त्यांचेकडील आदेश क्र. सेवाप्र <u>१४०२/प्र.क्र.१६५३/साप्र.मुका/०२</u>, दिनांक २२.११.२००२ अन्वये श्री. आर.के. सोनवणे यांना कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सेवेतुन दि. २२.११.२००२ रोजी मध्यान्होत्तर कार्यमुक्त केले आहे. त्यानुसार श्री. आर. के. सोनवणे यांनी वरील पदाचा कार्यभार दिनांक २५.११.२००२ पासून स्विकारलेला आहे.

तथापी उपरोक्त शासन निर्णयात असे नमुद केले आहे की, श्री. आर. के. सोनवणे यांची ''अतिरिक्त आयुक्त'' उल्हासनगर महानगरपालिका यापदावरील नेमणुक ही कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व उल्हासनगर महानगरपालिका यांच्या अनुमती दर्शक ठरावास अधीन राहून करण्यात येत आहे. करिता श्री. आर. के. सोनवणे, अतिरिक्त आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांच्या प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस शासनाचे आदेशाप्रमाणे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अनुमती दर्शक ठरावास अधिन राहून अनुमती देण्यासाठी मान्यता मिळणेकामी महापालिकेच्या महासभेपुढे विषय प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र.५५</u> <u>दिनांकः-२६.१२.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.

महानगरपालिका ठराव क्र. ५४ दिनांक. १६.११.२००२ अन्वये अतिरिक्त आयुक्त पद निर्माण करण्यास शासनास केलेल्या विनंती वरून सदर पद निर्माण करण्यास शासनाने मंजुरी दिली व त्यावर सक्षम अधिका-याची नियुक्ती करणे बाबत केलेल्या विनंती वरून श्री. आर. के. सोनवणे उप-आयुक्त कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांची प्रतिनियुक्तीने नियुक्तीस ही महासभा मान्यता देत आहे व श्री. आर. के. सोनवणे यांना उल्हासनगर महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर पाठविण्यास अनुमती दयावी अशी विनंती कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस ही सभा करीत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>बहुसंख्येने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

